
# साप्ताहिक माणूस

शनिवार । २२ मे १९७६ । एक रुपया



निरपेक्ष व निःस्वार्थी
लोकसेवक
पुढे येत नाहीत
तोपर्यंत
ग्रामीण समाजपरिवर्तनाला
वेग येणे
अशक्य आहे.

साप्ताहिक माणूस

वर्ष पंधरावे – अंक : पन्नासावा (५१)

२२ मे १९७६

मूल्य । एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
□
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
□
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
□
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
□
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
□
दूरध्वनी : ४३४५९
□

**' ग्रामायन ' + इंद्रायणी कॉलेज, तळेगाव यांनी संयुक्तपणे योजलेल्या कामशेत-नायगाव येथील विद्यार्थी-शेतकरी शिबिरानिमित्त (दि. १८ ते २३ मे) खास लेख**

# ग्रामीण समाजातील परिवर्तन

प्रा. गुरुनाथ द. नाडगोंडे

### १. सामाजिक परिवर्तनाची व्याख्या

मानव समाजाचा इतिहास हे स्पष्ट करतो की, मानवसमाज हा सतत बदलत असतो. नित्य परिवर्तन हा मानवी समाजाचा जणू स्थायीभाव आहे. समाजजीवन एखाद्या नदीप्रमाणे लहान लहान वळणे घेत पुढे पुढे जात असते. बदलत्या काळाबरोबर समाजजीवनात लहानमोठे बदल घडून येत असतात. हे लहानसहान बदल चटदिशी आपल्या लक्षात येत नाहीत. त्यामुळे कित्येक वेळेला आपल्यात परिवर्तन होत आहे याची जाणीवही आपल्यात नसते. अशा तऱ्हेचे संथपणाने समाजात होत असणारे लहानसहान बदल आपल्यात अस्वस्थता निर्माण करीत नाहीत. त्याचबरोबर समाजात डोळ्यांत भरण्याजोगेही बदल घडून येत असतात. मानवाचे रीतिरिवाज, आचारविचार, रूढी, परंपरा, सामाजिक संस्था, संघटना इत्यादींमध्ये आमूलाग्र स्वरूपाचे बदल घडत असतात. या सर्वांचा एकूण परिणाम म्हणजे समाजरचनेतच बदल होत असतो. म्हणूनच डॉ. हॅरी जॉन्सन यांनी ' सामाजिक परिवर्तन म्हणजे मूलभूत अर्थाने, समाजरचनेतील बदल होय. ' अशी व्याख्या केली आहे.[1] व्यक्ती, समूह, समस्या या समाजाच्या विविध भागांत विशिष्ट व स्थिर स्वरूपाचे संबंध असतात. या परस्पर संबंधांच्या एकत्रित वा स्थिर स्वरूपालाच समाजाची रचना म्हणतात. त्यामुळे व्यक्ती, समूह, संस्था यांसारख्या समाजाच्या विविध भागांत किंवा कोणत्याही एका भागात जेव्हा बदल घडून येतात, तेव्हा सामाजिक परिवर्तन घडून येते. किंग्जले डेव्हीस व एम्. गिन्सबर्ग यांनासुद्धा सामाजिक परिवर्तनाचा हाच अर्थ अभिप्रेत आहे. किंग्जले डेव्हीस म्हणतात, ' समाजरचनेत व कार्यात म्हणजेच सामाजिक संघटनेत होणारा बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय '[2] गिन्सबर्गनी सामाजिक परिवर्तनाचा असाच अर्थ केला आहे. ते म्हणतात, ' समाजाचा आकार, सामाजिक संघटना

1. ' In its basic sense social change means change in social structure. ' —Harry Johnson

2. ' Social change means only such alterations as occur in social organisation i. e. the structure and functions of society. ' —Davis

प्रकार व समाजातील विविध भागांतील संतुलन यांत होणाऱ्या बदलाला म्हणजेच समाजरचनेतील बदलाला सामाजिक परिवर्तन असे म्हणतात. '[3]

भारतीय ग्रामीण समाजातही अशाच तऱ्हेचे आमूलाग्र स्वरूपाचे बदल घडून आलेले आहेत व येतही आहेत. कालाच्या ओघात समाजाचे स्वरूप व रचना यांमध्ये बदल घडून येत असून ग्रामीण समाज नवे रूप धारण करीत आहे. जुन्या परंपरागत संस्था कोलमडल्या, जुनी मूल्ये बदलली, जुन्या जीवनपद्धतीत बदल झाला व त्या जागी नव्या संस्था, नवीन मूल्ये, नवीन जीवनपद्धती निर्माण झाली. सामाजिक स्थित्यंतराची वाटचाल वेगाने घडू लागली. परिवर्तनाची ही प्रक्रिया ग्रामीण समाजात सतत चालू असल्याचे दिसून येते. प्राचीन काळच्या भारतीय खेड्यांचे चित्र पूर्णतया पालटून गेले आहे. स्वायत्त, बलशाली, स्वयंपूर्ण व स्वतंत्र अशी प्राचीन काळची खेडी आज अस्तित्वात नाहीत. प्राचीनकाळी खेडी इतर जगापासून पूर्णतया तुटलेली होती. त्यामुळेच प्राचीन ग्रामवासीयांना सर्वार्थानेच स्वयंपूर्ण असणे अगत्याचे होते. नव्हे ! ती काळाची गरजच होती. ब्रिटिशांच्या आगमनाने या परिवर्तनक्रियेला जोर चढला. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत विलक्षण वेगाने कायापालट घडून येऊ लागला. ब्रिटिशांनी आपला पराभव केवळ रणांगणातच केला आहे असे नाही, तर जीवनाच्या सर्व क्षेत्रांत त्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले. सारांश, पाश्चात्य संस्कृती व विचारसरणी, यांत्रिकीकरण, नागरीकरण व त्यामुळे नवीन निर्माण होणारी अर्थव्यवस्था यांचा प्रभाव ग्रामीण जीवनावर झाल्याविना राहिला नाही. ग्रामीण जीवन तळापासून ढवळून निघाले यात काहीच शंका नाही. स्थितीशील, परंपरागत ग्रामीण समाजरचनेत व जीवनव्यवस्थेत झपाट्याने बदल घडून येवू लागले.

प्राचीन खेडी ही बलशाली, स्वयंपूर्ण व स्वायत्त होती. अभूतपूर्व अशा लोकशक्तीवर आधारित असलेल्या ग्रामीण संस्थांनी भारतीय जीवनाला विलक्षण सामर्थ्य व स्थैर्य दिले. अनेक राजकीय व सामाजिक उलाढालीतसुद्धा स्वायत्त व स्वयंपूर्ण भारतीय खेडी अभंग राहिली हे याचे बोलके उदाहरण आहे. विविध राजांच्या अमदानीत भारतीयांचे सामाजिक व राजकीय जीवन ढवळून निघत असताना भारतीय खेड्यातील व्यक्तीचे स्वतःचे व सामाजिक जीवन निर्वेधपणे चालू होते. पण या स्वायत्त, स्वयंपूर्ण खेड्यांना नंतरच्या काळात सत्ताधीशांकडून योग्य ते प्रोत्साहन मिळू शकले नाही. मुसलमानी अमदानीत भारतीय ग्रामीण संस्था दुर्लक्षिल्या गेल्या, तर ब्रिटिशांच्या राजवटीची सुरुवात म्हणजेच भारतीय खेड्यांचे जाणीवपूर्वक घडवून आणलेले विघटनच होय. म्हणूनच या सर्व बाबींचा आढावा घेताना ग्रामीण जीवनात मूलभूत प्रकारचे बदल घडवून आणणाऱ्या घटकांचा विचार करणे जरुरीचे आहे.

---

3. ' By social change I understand a change in social structure i. e. the size of society, the composition or balance of its parts or the type of organisation. '

—Ginsberg. M.

## २. ग्रामीण समाजपरिवर्तन घडवून आणणारे घटक

१. दळणवळणाच्या साधनांत व औद्योगीकरणात वाढ, २. सामाजिक कारण, ३. राजकीय कारण ४. सांस्कृतिक कारण, ५. अचेतन कारणे.

**(१) दळणवळणाच्या साधनात वाढ व औद्योगीकरण :** खेड्यांचा सर्वांगीण बदल घडवून आणणारा हा प्रभावी घटक आहे. प्राचीन खेडी स्वयंपूर्ण होती याचे कारण ती खेडी इतर जगापासून पूर्णतया तुटलेली होती. या खेड्यांशी संपर्क साधणे दळणवळणाच्या साधनाअभावी केवळ अशक्य होते. त्यामुळे प्राचीन खेड्यांची अवस्था एखाद्या बेटासारखी होती. म्हणूनच प्रत्येक खेड्याला आपल्या लोकांच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी स्वतंत्रपणे योजना करावी लागली. ही परिस्थिती ब्रिटिशांच्या भारतात आगमनापर्यंत होती. इतकेच नव्हे तर, आजसुद्धा ज्या खेड्यांशी संपर्क साधणे शक्य झाले नाही त्या खेड्यांची परिस्थिती अजूनही तशीच आहे. महाराष्ट्रातील सातपुडा भागातील खेडी, म्हैसूर राज्यातील रामपुरा खेड्यासारखी खेडी ही याची उदाहरणे आहेत. ब्रिटिशांच्या अमदानीत दळणवळणाची साधने वाढल्याने खेड्यांची अलगता संपुष्टात आली. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीचे प्रमुख कारण दळणवळणाच्या साधनांची उपलब्धता आहे हे लक्षात घेतल्यास वाहतुकीच्या साधनांनी भारतीय खेड्यांत बदल घडून आला याचे आश्चर्य वाटण्याचे काहीच कारण नाही. खेड्यांचा बाह्य जगाशी संबंध प्रस्थापित होऊ लागल्याने अनिवार्य असलेली आर्थिक स्वयंपूर्णताही संपली. खेड्याखेड्यांमधील देवाण–घेवाण यांची वाढ अभावितपणे याच कारणाने घडू लागल्याने खेड्याचा तोंडवळा बदलू लागला. या परिवर्तनाच्या प्रक्रियेला ब्रिटिशांनी विलक्षण वेग दिला.

शेती हाच प्रमुख व्यवसाय भारतीयांचा होता व आहेही. पण ब्रिटिशपूर्व भारतीय खेड्यात शेती व शेतीशी संबंधित इतर लहान लहान उद्योगधंदे संयुक्त कुटुंबामार्फत केले जात. सर्व लोकांच्या मर्यादित गरजा खेड्यातच पूर्ण केल्या जात. त्यामुळे खेड्यातील समाजजीवन साधे व समाधानी होते. औद्योगीकरणाची सुरुवात म्हणजे या साध्या व समाधानी जीवनाचा शेवट होता. ब्रिटिशांच्या औद्योगीकरणाचा प्रचंड आवाका, उत्पादित मालाची सुबकता, उत्पादनाचा कमी खर्च या सर्वांचा विलक्षण परिणाम प्राचीन खेड्याच्या स्वयंपूर्ण अर्थव्यवस्थेवर झाला. इतकेच नव्हे तर, उत्पादनाच्या हेतूतही बदल घडून आला. स्थानिक लोकांच्यासाठी उत्पादनाचा हेतू राहिला नाही. औद्योगीकरणामुळे प्रचंड उत्पादन शक्य झाल्याने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांसाठी उत्पादन हे उत्पादनाचे लक्ष्य राहिले. त्यामुळे प्राचीन अर्थव्यवस्थेचा पायाच उखडला गेला. जातिसंस्था व बलुतापद्धती यांवर ग्रामीण अर्थव्यवस्था उभी होती. औद्योगीकरणामुळे जातीचा ठराविक व्यवसाय, कामाची अपरिवर्तनीय अशी विभागणी, शेती व हस्तव्यवसायाचे एकत्रीकरण इत्यादींमध्ये मूलभूत प्रकारचे बदल घडून आले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामीण आर्थिक जीवनात परिवर्तन करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू झाले. संपूर्ण देशाच्या आर्थिक जीवनात कायापालट घडवून आणण्यासाठी पंचवार्षिक योजना आखण्यात आल्या. शेतीचा व इतर उद्योधंद्यांचा विकास घडवुन आणण्यासाठी

निश्चित पावले टाकण्यात आली. शेतीच्या उत्पादनपद्धतीत, साधनांत, बदल घडून यावा म्हणून अनेक योजना कार्यान्वित केल्या. त्यामुळे परंपरागत पद्धतीने शेती करणारा शेतकरी सुधारित बी–बियाणे, रासायनिक खते, पिकावरील रोगनिवारणासाठी औषधे, यांचा वापर करीत आहे. त्याबरोबर कुक्कुट–पालन, डुक्करपालन, दुग्धव्यवसाय यांसारखे शेतीला पोषक असे जोडधंदे यांची वाढ ग्रामीण क्षेत्रात होत आहे.

भूमिहीन मजुरांना जमीन कसण्यास मिळावी यासाठी शासकीय पातळीवरून प्रयत्न चालूच आहेत. पडित–जमीन वाटप–योजना महाराष्ट्र सरकारने हाती घेतली आहे. या योजनेमुळे १४,९०३ मजुरांना व ४० सहकारी संस्थांना ४०,३०४ हेक्टर जमीन देण्यात आली आहे. या जमिनींची मशागत करण्यासाठी सरकारने २ कोटी रुपयांचे साहाय्य केले आहे. त्याबरोबर सहकारी संस्था प्रस्थापित शेतीमालाची खरेदी-विक्री व निश्चित भाव देऊन शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षितता तर मिळालीच; पण त्यांच्या आर्थिक स्थितीतही चांगला बदल घडून येत आहे. पतपुरवठ्याच्या नवीन योजनांमुळे आजच्या शेतकऱ्याला कर्जासाठी सावकाराकडे जाण्याचे काहीच कारण उरले नाही. महाराष्ट्रातील साखर–कारखान्यांनी खेड्यांचे आर्थिक चित्र बऱ्याच प्रमाणात बदलले आहे. खेड्यातील लोकांना साखर–कारखान्यांनी नोकऱ्यांची उपलब्धता करून दिली आहे. साखर कारखान्यातील तांत्रिक दृष्टीने महत्त्वाच्या असणाऱ्या जागा सोडल्या तर बाकीच्या सर्व जागा कारखान्याच्या आसपास वसणाऱ्या खेड्यातील लोकांनाच दिल्या जातात. त्यामुळे खेड्यातील लोकांच्या जीवनमानात, जीवनपद्धतीत परिवर्तन घडत असल्याचे दिसून येते. कारखान्यात काम करणारा कामगार खेड्यात राहूनसुद्धा आपल्या पोषाखासंबंधी, सायकलीसंबंधी विशेष काळजी घेऊ लागला आहे. कारखान्याचे हे जसे चांगले परिणाम आहेत तसेच या परिसरात राहणाऱ्या शेतकऱ्यांपुढे काही आर्थिक समस्याही उभ्या राहिल्या आहेत. शेतीसाठी मजुरांची वानवा भासू लागली आहे. शेतमजूर आपल्या कामाच्या वेळा ठरवून मागत आहेत. आपल्या मजुरीच्या वाढीसाठी ते प्रयत्नशील आहेत. कारखान्यातील कामगार ज्या पद्धतीने आपल्या समस्या सोडवतात त्या पद्धती हळू हळू शेतीच्या क्षेत्रात येत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यात भूमिहीन मजुरांनी १९७३–७४ साली काढलेला मोर्चा हे याचे उत्तम उदाहरण आहे.

औद्योगीकरणाचा अभावित परिणाम म्हणजे शहरीकरण होय. औद्योगिककरणामुळेच नवीनवीन शहरे अस्तित्वात येऊ लागली. ग्रामवासियांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यास हेही कारण तितकेच जबाबदार आहे. ग्रामीण भागातील लोक शहराच्या रोखाने वाटचाल करतात व बहुतांशी शहरातच वास्तव्य करतात. खेड्यातील कुशल कामगार, बुद्धिजीवी, कल्पक असे समाजातील महत्त्वाचे घटक शहराकडे धाव घेतात. एकप्रकारे हा खेड्यांचा ब्रेनड्रेनचा प्रश्न आहे. त्याबरोबर दळणवळणाच्या साधनांची उपलब्धता असल्याने शहर व खेडे यांतील अंतर फार झपाट्याने कमी कमी होत आहे. दोन्ही समाजात याचमुळे घनिष्ठता निर्माण होत आहे. म्हणूनच ग्रामवासियांना शहरी आचार-विचारांचे जबरदस्त आकर्षण निर्माण झाल्याने त्यांची परंपरागत जीवनपद्धती मागे पडत आहे. ग्रामीणवासीयांच्यातील समुदायभावना परस्परातील बिकट्ता, आत्मीयता नाहीशी होऊन हे संबंध व्यक्तिनिरपेक्ष, करारप्रधान व साधनरूप झाले आहेत.

(२) **सामाजिक कारण :** ग्रामीण समाजपरिवर्तनात सामाजिक कारण हे तितकेच महत्त्वाचे आहे. प्राचीन खेड्यांची समाजव्यवस्था भक्कम पायावर आधारित होती. जातिसंस्था, कुटुंबसंस्था व ग्रामपंचायत या तीन मातबर संस्थांमार्फतच साऱ्या खेड्यांची समाजव्यवस्था होत होती. संयुक्त कुटुंबपद्धती हे भारतीय ग्रामीण समाजजीवनाचे वैशिष्टच आहे. तीन पिढ्यांपर्यंत सर्व आप्तसंबंध एकत्र राहत असत. कुटुंबाची मालमत्ता एकत्रच असे. ही एकत्र राहण्याची पद्धत ब्रिटिश येईतोपर्यंत भारतात टिकून होती. पण ब्रिटिशांनी जाणीवपूर्वक अंमलात आणलेली शिक्षणपद्धती व इतर योजना यांमुळे संयुक्त कुटुंबपद्धतीला हादरे बसू लागले. औद्योगीकरणाने खेड्यातील लोक शहरात जाऊन उदरनिर्वाहाची साधने धुंडाळू लागले. नव्या शिक्षणपद्धतीने व्यक्तीचे महत्त्व अनन्य मानल्याने संयुक्त कुटुंबपद्धती टिकून राहण्यास पोषक वातावरण राहिले नाही. प्राचीन काळी शिक्षण हे व्यावसायिक स्वरूपाचे होते. हे शिक्षण कुटुंबामार्फतच दिले जाई. सर्व कुटुंबीयांच्या गरजा कुटुंबाकडूनच पूर्ण केल्या जात असल्याने कुटुंबाबद्दल विलक्षण अभिमान, सर्वांच्याबद्दल आपलेपणा, कुटुंबाबद्दल आदर व कुटुंबाबद्दलची कर्तव्याची जाणीव सर्वांच्यात दिसून येत होती, पण ब्रिटिशांच्या नवीन धोरणाने कुटुंबाचे हे महत्त्व लयाला जाऊ लागले. सामाजिक, राजकीय व आर्थिक गरजा पुरविण्याचे काम करण्यासाठी स्वतंत्र संस्था अस्तित्वात आल्या. त्याचबरोबर पाश्चिमात्य विचारसरणीचा जबरदस्त प्रभाव ग्रामवासीयांच्यावरही पडल्याने ग्रामवासीयांच्यात व्यक्तिवादी दृष्टिकोण पडल्याने ग्रामवासीयांच्यात व्यक्तिवादी दृष्टिकोण विकसित झाला. त्यामुळे भारतीय ग्रामीण समाजजीवनातील महत्त्वाची म्हणून गणली जाणारी कुटुंबसंस्था बदलून गेल्याचे स्पष्ट दिसते. आजच्या वाढत्या जीवनमानाच्या कालात तर खेड्यातील लोकांना शेतीवर पूर्णतया अवलंबून राहणे शक्य होत नाही. त्यामुळे कुटुंबीय शहरात जाऊन विविध व्यवसायांची कास धरीत आहेत. नवीन कमाल भूधारणा–कायद्यान्वये कुटुंबाच्या मालमत्तेचे कुटुंबीयांमध्ये विभाजन होत आहे. या सर्वांचा परिणाम म्हणजे व्यक्ती व कुटुंब यांमधील तादात्म्यस्वरूप संपुष्टात आले व कुटुंबाबद्दल वाटणारा वात्सल्य अभिमानही इतिहासजमा झाला.

संयुक्त कुटुंबसंस्थेप्रमाणे प्राचीन ग्रामीण समाजातील जातिसंस्थेचे परिवर्तन घडून आले. ग्रामीणसमाजरचना पूर्णतया जातिसंस्थेवर आधारित होती. जातीमुळे व्यक्तीचे व्यवसाय, व्यक्तीचा दर्जा व व्यक्तीचा आचार ठरत असत. ब्रिटिशपूर्व भारतात जात हीच एक सर्वार्थाने प्रभावी शक्ती होती, पण ब्रिटिशांच्या आगमनाने जातिसंस्थेचे महत्त्व हळूहळू ओसरू लागले. व्यक्तिस्वातंत्र्य, भौतिकविकास व उच्च प्रतीचे जीवनमान साध्य करण्यासाठी आधुनिक शिक्षणाचे बीजारोपण ब्रिटिशांनी भारतात केले. त्यामुळे जातीचे निर्बंध आपोआपच लयाला गेले. आजच्या स्वतंत्र भारतातील समाजजीवनात जातीला कोणतेच स्थान नाही. व्यवसायनिवडीसाठी जातीचा आधार आज राहिलेला नाही.. बलुतेदारी व्यवस्था आज जवळजवळ नाहीशी

झाली आहे. खाणे-पिणे व विवाहसंबंधाच्या बाबतीत जातीची बंधने आज शिथिल झाली आहेत; याबाबतीतील एकेकाळचा कडवा विरोध आज राहिला नाही. जातिवाद जरी आज कमी झाला नसला, तरी जातीचे महत्त्व मात्र कमी झाले आहे.

प्राचीन ग्रामीण समाजात असलेले बालविवाहाचे प्राबल्य आज कमी झाले आहे. बालविवाहाकडे पाहण्याचा ग्रामवासियांचा दृष्टिकोणही आज पूर्णतया बदलून गेला आहे. स्त्रीशिक्षण व १९५५ चा हिंदुविवाहविषयक कायदा यामुळे बालविवाहाला आळा बसला आहे. स्त्रियांना कायद्याने समानता मिळाल्याने व प्रौढ मतदानाचा हक्क लाभल्याने त्या भारताच्या स्वतंत्र नागरिक ठरल्या आहेत. आज ग्रामीण भागात त्यांच्यासाठी पंचायतीत व इतर शासनसंस्थांत काही जागा राखीव ठेवलेल्या आहेत. ग्रामपंचायतीतील सर्वच्या सर्व जागा स्त्रियांनी जिंकल्याची उदाहरणे आहेत. हे जरी खरे असले, तरी आजची ग्रामीण स्त्री दास्यत्वातून पूर्णतया मुक्त आहे असे म्हणता येत नाही. ग्रामीण भागातील स्त्रिया अर्थोत्पादन करीत असल्या तरीसुद्धा त्यांना कोणत्याही प्रकारचे मतस्वातंत्र्य व आचारस्वातंत्र्य नाही. ग्रामीण भागातील व नागरी भागातील आजच्या स्त्रीत 'विकास–अंतर' कितीतरी वर्षांचे आहे. स्त्रियांचे सामाजिक स्थान व त्यांचा व्यावसायिक दृष्टिकोण व अडचणी, त्यांचे कौटुंबिक जीवन लक्षात घेतल्यास हे अंतर स्पष्ट होते. श्रीमती दुर्गाबाई देशमुख यांनी ग्रामीण स्त्रीच्या जागृतीसाठी 'अखिल भारतीय समाज कल्याण मंडळ' स्थापन करून द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या काळात प्रयत्न केला. म. गांधींच्या ग्रामविकास कार्यक्रमाने ग्रामीण स्त्रीच्या दयनीय परिस्थितीचा विचार केला होता. पण आजच्या ग्रामीण स्त्रीची अवस्था लक्षात घेता हे सर्व प्रयत्न अपुरे पडल्याचे सिद्ध झाले आहे. म्हणून एवढेच म्हणता येईल की एकाकीपणा, निराधारपणा व दास्यत्वाची वृत्ती कमी कमी होत चालली आहे, यात काहीच शंका नाही.

**(३) राजकीय कारण :** "प्राचीन खेडी स्वतंत्र व स्वायत्त व स्वयंशासित होती. मध्यवर्ती शासनाची ढवळाढवळ प्राचीन खेड्यांच्या कारभारात नव्हती. खेड्यांचा सर्व कारभार ग्रामपंचायतीमार्फतच होत असे. शासकीय, न्यायालयीन स्वरूपाची कार्ये ग्रामपंचायतीच करीत असत. सर्व खेड्यांची निगा राखणे, संरक्षण करणे, लोकांचे तंटेबखेडे सोडविणे इत्यादी कामे ग्रामपंचायतीच पार पाडीत असत. मुसलमान अमदानीत या ग्रामपंचायतीच्या महत्त्वाला ओहोटी लागली. ब्रिटिशांनी ग्रामपंचायतीचे सर्व हक्क व अधिकार काढून घेऊन पंचायतीला जबरदस्त हादरे दिले. ब्रिटिशांनी आत्यंतिक केंद्रीकरणाचे धोरण अनुसरल्यामुळे शासनव्यवस्थेची सर्व सूत्रे ब्रिटिशांनी आपल्या ताब्यात घेतली. न्यायदान व इतर शासकीय कार्यांसाठी स्वतंत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. शेतसारा पंचायतीमार्फत वसूल करण्याची पद्धती ब्रिटिशांनी बंद केली. शेतसारा वसूल करण्यासाठीसुद्धा स्वतंत्र सरकारी अधिकारी नेमण्यात आले. इतकेच नव्हे तर एकूण शेतसाऱ्यापैकी पंधरा टक्के उत्पन्न पंचायतीला देण्याची वहिवाट थांबविण्यात आली. साहजिकच ब्रिटिशांनी ग्रामपंचायती व ग्रामिणी यांना निष्प्रभ करून टाकले.

स्वातंत्र्योत्तर काळात मात्र ब्रिटिशांचे हे चुकीचे धोरण टाकून देण्यात आले. प्राचीन ग्रामपंचायतींचा तेजस्वी कालखंड स्मरणात ठेवून ब्रिटिशकालात निष्प्रभ झालेल्या ग्रामपंचायती पुनरुज्जीवित करण्याचा नियोजित प्रयत्न आजही चालू आहे. स्वतंत्र भारत सरकारने विकेंद्रीकरणाच्या धोरणाचा स्वीकार केला व ग्रामपंचायती बळकट व कार्यक्षम करण्यासाठी निश्चित पावले टाकण्यास सुरुवात झाली. भारत सरकारच्या या धोरणामुळे ग्रामीण राजकीय जीवन ढवळून निघत आहे. नवीन स्थानिक नेतृत्व निर्माण करण्याची व ग्रामीण जनतेस राजकारणात भाग घेण्याची संधी या पंचायती राज्यामुळे मिळालेली आहे. त्यामुळे ग्रामीण जनता देशाच्या राजकीय जीवनाबाबत हळूहळू जागृत होत आहे. तरीसुद्धा पंचायती राज्याच्या निवडणुकापद्धती, निवडणुकीसाठी उभे राहिलेले उमेदवार हे पाहिले असता पंचायती राज्याने प्रजातंत्रात्मक नेतृत्व खऱ्याखुऱ्या अर्थाने निर्माण केले असे म्हणता येत नाही. मातब्बर जमीनदार व धनिक लोकच ग्रामपंचायतीतील नेतृत्वासाठी एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात असतात. जात, पंथ, धर्म या आधारावर आपले वर्चस्व मजबूत करण्यातच या तथाकथित नेत्यांची शक्ती वाया जात असते. त्यामुळे पंचायती राज्य म्हणजे विविध राजकीय पक्षांचे निवडणुकीचे आखाडेच झाले आहेत. साहजिकच जनहितापेक्षा पक्षीय राजकारणाचे स्तोमच या ग्रामीण राजकीय जीवनात माजले आहे.

**(४) सांस्कृतिक कारण :** ग्रामीण समाजपरिवर्तन घडवून आणण्यात सांस्कृतिक व्यवस्थेचाही मोठा वाटा आहे. संस्कृती ही परिवर्तनशीलच असते. सांस्कृतिक मूल्यात बदल हा कालौघात होतच असतो. प्रत्येक कालाच्या काही श्रद्धा, विश्वास व मूल्ये असतात. याच मूल्यांचा प्रभाव त्या कालातील सामाजिक जीवनावर पडत असतो. प्राचीन ग्रामीण समाजाचे विहंगमावलोकन केले असता असे दिसून येते की, सहकार्य, सामूहिक भावना, परस्परावलंबन, एकमेकांबद्दलची आत्मीयता यांवरच प्राचीन ग्रामीण समाज उभा राहिलेला होता. कुटुंबसंस्था, जातिसंस्था व ग्रामसंस्था यांचा प्रभाव त्यांच्या सर्व जीवनावर असण्याचे प्रमुख कारण म्हणजे वर नमूद केलेली मूल्येच होत. या सर्व मूल्यांचा आविष्कार कुटुंबसंस्था, जातिसंस्था व ग्रामसंस्था यांतून प्रगट होत होता. प्राचीन काळची परंपरेने चालत आलेली बलुता–पद्धती त्या कालच्या लोकांमधील ऐक्यभावना, सहकार्य, एकमेकांवरचा दृढ विश्वास व बंधुभाव या मूल्यांवरच आधारित होती. त्यांच्या ग्रामपंचायतीत व इतर सर्व सामाजिक संस्थांत खेड्यातील वरिष्ठ मंडळींनाच मानाचे स्थान दिले जात असे. इतकेच काय पण प्रत्येक घरातील महत्त्वाच्या समारंभात सर्व बलुतेदारांचा, कारागिरांचा सन्मान केला जात असे. सामूहिक भावना हा प्राचीन ग्रामीण समाजाचा स्थायीभाव होता.

पण प्राचीन ग्रामीण समाजातील या मूल्यांचे परिवर्तन ब्रिटिशांनी घडवून आणले. पाश्चिमात्य संस्कृती व शिक्षणपद्धती यामुळे भारतीय समाजजीवनांवर विलक्षण परिणाम झाला व्यक्तिवादी प्रवृत्तीला प्रोत्साहन देणारी शिक्षणपद्धती ब्रिटिशांनी भारतात सुरू केली. त्यामुळे वैयक्तिक महत्त्वाकांक्षा, वैयक्तिक सुख याच भावना बळावल्या. परिणामतः सामूहिक भावनेवर आधारलेले प्राचीन खेड्यातील सामाजिक जीवन उद्ध्वस्त झाले. जातिसंस्था, कुटुंबसंस्था व ग्रामसंस्था यांचा पायाच यामुळे उखडला गेला. त्याचबरोबर पाश्चात्य संस्कृती व शिक्षणाने ग्रामवासीयांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टि-

कोणच बदलून गेला. राज्याचे ध्येय व राज्यकारभार, कुटुंबाची विधिनिष्ठ बैठक, शिक्षणाची ध्येये यावरील धर्मसंस्थांचा पगडा कमी होत गेला. बुद्धिवादाला महत्त्व प्राप्त झाल्याने अंधविश्वास व रूढींचे प्राबल्य घटत चालले. ग्रामीण क्षेत्रातून धर्माचे उच्चाटन पूर्णतया झाले आहे असे जरी म्हणता येत नसले, तरीसुद्धा ग्रामीण समाजातील धर्माचे एकेकाळचे अनन्यसाधारण महत्त्व आज राहिले नाही हे निःसंशय. अर्थात हे खरे की, सर्व सुशिक्षित व अशिक्षित भारतीयांच्यात आढळून येणारी धर्माविषयीची द्विधा वृत्ती ग्रामवासीयांच्यातही आढळून येते. आजचे भारतीय समाजमन धड वैज्ञानिक नाही, धड धार्मिक नाही. ग्रामवासीयांची मनोवृत्ती अशीच घडत चाललेली आहे.

ग्रामीण समाजाची आजची मनोरंजनाविषयीची दृष्टीही पालटलेली आहे. मनोरंजनाची कल्पना व मनोरंजनाची साधने यांतही बदल झाल्याचे दिसून येते. प्राचीनकाळी मनोरंजनाचे प्रमुख केंद्र कुटुंबच होते. भजन, कीर्तन, प्रवचने, लोकगीते, नृत्य, कुस्त्या, कोंबड्यांच्या-झुंजी, तमाशा इत्यादी मनोरंजनाची स्थाने होती. आजही बऱ्याच प्रमाणात खेड्यांमध्ये मनोरंजनासाठी याच प्रकारांचा वापर केला जातो. त्याचबरोबर सिनेसंगीत, रेडिओ, नाटक, जुगार इत्यादी शहरी मनोरंजनाचे प्रकार खेड्यातही आढळून येत आहेत.

**(५) अचेतन व चेतन कारणे** (Unconscious or Conscious): डॉ. ए. आर. देसाई यांच्या मते ग्रामीण समाजात मूलभूत प्रकारचे परिवर्तन अचेतन व चेतन कारणांनी घडून येत आहे. यांतील काही प्रमुख घटकांचा विचार खालीलप्रमाणे करता येईल—

**अचेतन कारणे** : या कारणांमध्ये अशाच घटकांचा विचार आपणास करता येईल की, जे घटक अत्यंत नैसर्गिक अगर स्वाभाविक आहेत. हे बदल आपोआपच घडून येत असतात. यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात नाहीत.

**(१) नैसर्गिक अगर भौतिक परिस्थिती** : भौतिक पर्यावरणात होत असलेले बदल मानवी जीवनावर सतत परिणाम करीत असतात. पूर, भूकंप, दुष्काळ, वादळ, ज्वालामुखी इत्यादी आकस्मिक स्वरूपाचे बदल घडून येत असतात. त्यांचा परिणाम तेथील समाजजीवन बदलण्यात होतो. पूर, वादळे, भूकंप, ज्वालामुखी यांसारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे अनपेक्षितरीत्या नवीन परिस्थिती निर्माण होते. मनुष्यस्वभावाप्रमाणे या बदलत्या परिस्थितीशी समाज मिळतेजुळते घेत असतो. महाराष्ट्रातील कोयना परिसरात भूकंपाचे प्रमाण वाढल्याने अनेक परिणाम या परिसरातील ग्रामीण जीवनावर झालेले आहेत. अनेक शेतकऱ्यांच्या विहिरींचे पाणी आटल्याने तेथील शेतीवर अनिष्ट परिणाम झाला आहे. १९७२–७३ साली सर्व देशभर पडलेल्या दुष्काळाने ग्रामीण जीवन अक्षरशः पोळून निघाले. अनेक ग्रामवासीयांना या काळात उदरनिर्वाहासाठी शहराच्या दिशेने वाटचाल करणे अपरिहार्य झाले.

या नैसर्गिक परिस्थितीत असा बदल घडून आल्याने ग्रामीण जीवन बदलले, तसेच या नैसर्गिक परिस्थितीवर मात करण्याचे प्रयत्नही चालू झाले. दुष्काळातील काळात पाझर तलाव बांधणे, ताली बांधणे, विहिरी खोदणे यांसारख्या कामांना विलक्षण वेग आला. या कार्याची फळे लगेच एका वर्षात ग्रामीण जनतेला मिळाल्याची उदाहरणे आहेत. महाराष्ट्रातील कोल्हापूर, सांगली जिल्ह्यांत पाझर तलावाच्या परिसरातील विहिरींना भरपूर पाणी लागल्याचे वृत्त आहे.

**(२) तांत्रिक कारण** : ग्रामीण समाजपरिवर्तनातील हे एक मनुष्यनिर्मित कारण आहे. आपले जीवन सुखावह होण्यासाठी मनुष्य नेहमीच नवनवीन साधनांचा शोध लावत असतो. नवीन साधनांचा शोध लावत असताना त्या साधनांच्या दूरगामी परिणामाची कल्पना मानवाला नसते. पण हे तांत्रिक शोधच मानवाचे जीवन ढवळून काढत असतात. बाष्पयंत्र, मोटारगाडी, टेलिफोन, रेडिओ व टेलिव्हिजन यांसारख्या शोधांनी सामाजिक परिवर्तनाला वेग दिला. प्रा. ऑगबर्न यांनी दाखवून दिले की, रेडिओच्या शोधाने सामाजिक जीवनात १५० प्रकारचे बदल घडून आले. भारतीय ग्रामीण समाजजीवनसुद्धा या तांत्रिक शोधाच्या परिणामापासून मुक्त राहू शकले नाही. शेतीच्या क्षेत्रातील संशोधनाने आजचे ग्रामीण जीवन पूर्णतया पालटत आहे. विहिरीचे पाणी ओढण्यासाठी इंजिन अगर विजेवर चालणाऱ्या मोटारींचा वापर, सुधारित बी-बियाणे, नवीन रासायनिक खते, पिकांचे रोगापासून संरक्षण करण्यासाठी औषधांचा वापर, गाई म्हशींसाठी कृत्रिक गर्भधारणा पद्धतींचा अवलंब इत्यादी साधनांनी ग्रामीण आर्थिक जीवन परिवर्तित झाल्याविना राहिले नाही. त्याचबरोबर नवीन दळणवळणाच्या साधनांनी सर्व खेड्यांच्यात संपर्क निर्माण झाला आहे. महाराष्ट्रातील राज्य-वाहतूक साधनाने बहुतांशी खेड्यांत प्रवेश केला आहे त्यामुळे नागरी समाज व ग्रामीण समाज यांमधील अंतर झपाट्याने कमी होत आहे. म्हणून तांत्रिक घटनांमुळे भारतीय ग्रामीण समाजाचा आर्थिक विकासच केवळ साधला आहे असे नाही, तर ग्रामीण समाजातील मूल्ये व आचार यांमध्येही परिवर्तन झाल्याचे दिसून येते.

**चेतन कारणे** (Conscious Resources) : ग्रामीण समाजाचे परिवर्तन घडवून आणण्यासाठी जाणूनबुजून जे प्रयत्न केले जातात त्यांचा समावेश यात करण्यात होतो. हे प्रयत्न पूर्ण विचार करून नियोजनबद्धरीत्या केले जातात. ज्या तऱ्हेचा बदल अपेक्षित आहे, त्या दिशेने या प्रयत्नाची वाटचाल होत असते. अशा तऱ्हेचे प्रयत्न खालील पद्धतीचे आहेत :

**(१) अनुनयात्मक पद्धती** (Persuasive Method) : या पद्धतीप्रमाणे जीवनाच्या सर्व क्षेत्रांत परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रचाराचे माध्यम वापरले जाते. तांत्रिक, आर्थिक, सामाजिक व इतर बाबींत सुधारणा करण्यासाठी प्रचाराची संघटित मोहीम हाती घेतली जाते. ग्रामीण समाजाची पुनर्बांधणी सर्वांगदृष्टीने होण्यासाठी विविध सुधारणा ग्रामवासीयांच्या गळी उतरविण्यासाठी प्रयत्न केले जातात. दारूबंदी, संततिनियमन, साक्षरता, अधिक धान्य पिकवा मोहीम, रासायनिक खताचा वापर, स्वच्छता याबाबतीत जोमाची प्रचारमोहीम आजही चालू आहे. प्रचाराच्या सर्व मार्गांचा अवलंब यासाठी केला जात आहे. प्रचाराचे मुख्य उद्दिष्ट ग्रामवासीयांच्या मनोवृत्तीत बदल घडवून आणणे हे आहे. स्वाभाविकपणे परंपरेत रुतलेले ग्रामीण मन नवीन बदलाला नेहमीच विरोध करीत असते. म्हणूनच ग्रामीण पुनर्रचनेसाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याचे काम या प्रचाराने साधते.

**(२) प्रात्यक्षिक पद्धती** (Demonstration Method) : या पद्धतीतसुद्धा प्रचाराचे तंत्र थोड्याशा फरकाने वापरले जाते.

प्रचारात प्रात्यक्षिकावर जास्त भर दिला जातो. एखाद्या सुधारणेचे प्रात्यक्षिक दाखवून लोकांच्या मनावर ती सुधारणा बिंबवली जाते. या प्रचारतंत्रात प्रात्यक्षिके असल्याने हे माध्यम जास्तीत जास्त परिणामकारक व प्रभावी होते. ग्रामीण समाजजीवनात बदल घडवून आणण्यात हे तंत्र यशस्वी झाले आहे. समाजविकास योजनांद्वारे एका खेड्यात विवक्षित खताचा व सुधारित बियाण्यांचा वापर करून येणारे भरघोस पीक साऱ्या शेतकऱ्यांना दाखविले जाते. उत्तम बी-बियाणे, चांगली जनावरे, मशागतीची नवीन तंत्रपद्धती यांविषयीचे प्रदर्शनही आयोजित केले जाते. शैक्षणिक व आरोग्य केंद्रे खेड्यांत उभी करून शिक्षण व स्वच्छता यांचा प्रसार केला जातो.

(३) अनिवार्य पद्धती (Compulsory Method) : या पद्धतीत ग्रामीण लोकांच्या इच्छेला विशेष मान न देता काही बाबींची सक्ती केली जाते. शासन काही बाबतीत पुढाकार घेऊन जेथे परिवर्तन आवश्यक आहे तेथे कायदा करून परिवर्तन घडवून आणते. युद्धकालात अमेरिकेत कायदे करून सक्तीने उत्पादन घडवून आणले, वस्तूंचे दर निश्चित केले, मजुरांच्या कामाच्या वेळा निश्चित केल्या. भारतीय ग्रामीण समाजातसुद्धा कायद्याच्या द्वारे असे अनेक बदल घडवून आणले आहेत. सतीपद्धती, बालविवाहपद्धती, बहुपत्नीकत्व या अनिष्ट रूढी कायदा करून सक्तीने दूर सारल्या. १९५५ चा विवाहविषयक कायदा, विधवाविषयक कायदा, अस्पृश्यतेसंबंधीचा कायदा, असे विविध कायदे करून सक्तीने परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न शासकीय पातळीवरून चालू आहेत.

(४) सामाजिक दबाव पद्धती (Method of social pressure) : राज्यकर्त्यांवर अगर संबंधित व्यक्तींवर सामाजिक दबाव आणून अपेक्षित परिवर्तन घडवून आणले जाते. मोर्चा, सामूहिक सत्याग्रह, उपोषण, हरताळ, दहशत अशा अनेक मार्गांनी राज्यकर्त्यांवर अगर संबंधित व्यक्तीवर दडपण आणले जाते. भारतीय ग्रामीण समाजात या दबावपद्धतींचा वापर केला जात आहे. समाजवादी पक्षाची जमीन-बळकाव-मोहीम, हरिजन-सुधार-आंदोलन, मंदिर-प्रवेश-आंदोलन, अस्पृश्यतानिवारण आंदोलन, भूमिहीन मजुरांची मजुरी निश्चित करण्यासाठी केलेले आंदोलन ही याची उदाहरणे आहेत. बंगालमधील ग्रामीण क्षेत्रात जमीनदारांचे व सावकारांचे झालेले खून यामुळे भलतीच दहशत निर्माण झाली. अलीकडे या सामाजिक दबावपद्धतीला ग्रामीण समाजात उधाण येत चालले आहे.

(५) संपर्क व शैक्षणिक पद्धती (Contact and Educational Methods) : सामाजिक परिवर्तनात या दोन पद्धती अत्यंत परिणामकारक ठरल्या आहेत. प्राचीन खेड्यांमध्ये स्थित्यंतर न घडण्याचे कारण म्हणजे खेड्यांचा बाह्य जगाशी आवश्यक असणाऱ्या संपर्काचा अभाव होय. पण आधुनिक वाहतुकीच्या साधनाने खेड्यांचा संपर्क बाह्य जगाशी येऊ लागल्याने खेड्यांच्या सर्वांगीण जीवनात बदल घडून येऊ लागला. खेड्यांतील लोकांचा संबंध नागरी संस्कृतीशी येऊ लागल्याने ग्रामवासीयांच्या आचार-विचारात, पोषाखात, जीवनविषयक दृष्टिकोणात विलक्षण बदल घडून येऊ लागले आहेत.

ग्रामीण क्षेत्रात स्वातंत्र्योत्तर काळात शाळा व महाविद्यालये स्थापिली जात आहेत. या शैक्षणिक प्रसारामुळे ग्रामीण समाजातील परिवर्तन दृग्गोचर होत आहे. शिक्षणाने त्यांना अंधश्रद्धेतील फोलपणा कळू लागला आहे. वैज्ञानिक दृष्टी त्यांना हळूहळू येत आहे. इतकेच नव्हे तर, समाजातील परंपरागत असे सामाजिक भेद हे मनुष्यनिर्मितच आहेत याची जाण त्यांच्यात निर्माण होत आहे. भारतीय ग्रामीण समाजात होत असणारे हे परिवर्तन निश्चितच स्वागतार्ह आहे.

सारांश, ब्रिटिशांचे आगमन भारतात होण्यापूर्वी कित्येक शतके भारतीय समाज स्थितिशील, परंपरागत व अगतिक होऊन राहिला होता. भारतीय खेड्यांच्या वैशिष्ट्यात कोणताच फरक न पडता दीर्घकाळपर्यंत भारतीय खेड्यांचा तोंडवळा आहे तसाच राहिला. स्वायत्त, स्वयंपूर्ण खेड्यांच्या शरीरात कोणताच फरक न पडण्याचे प्रमुख कारण म्हणजे वाहतुकीच्या साधनांच्या अभावी ही खेडी एखाद्या बेटासारखी इतर जगापासून पूर्णतया सुटलेली होती. त्यामुळे इतर जगातील परिस्थिती कितीही जरी बदलली तरीसुद्धा या बदलत्या परिस्थितीचा प्रभाव खेड्यांवर मुळीच पडू शकला नाही. बाह्य परिस्थितीशी संपर्क नसल्याने भारतीय खेडी बदलत्या परिस्थितीच्या प्रभावापासून दूर राहिलीच; पण त्याचबरोबर आपण बदलले पाहिजे ही अंतःप्रेरणाही भारतीय समाजात निर्माण होऊ शकली नाही. त्या काळातील संपूर्ण भारतीय समाजाचे चित्र हे असेच स्थितिशील होते. अज्ञान, दारिद्र्य, धर्मभोळेपणा, असंख्य अंधश्रद्धा व रूढी यांच्या मगरमिठीत सर्व भारतीय समाज सापडला होता. त्यामुळेच धर्म व जाती यांचे वर्चस्व असणाऱ्या भारतीय समाजात कित्येक शतके सामाजिक स्थित्यंतर होऊ शकले नाही.

ब्रिटिशांच्या आगमनाने सामाजिक परिवर्तनाची वाटचाल सुरू झाली. त्यानंतरच पाश्चिमात्य सुधारणांचे वारे भारतीय भूमीत जोरात वाहू लागले. पाश्चिमात्य संस्कृती व शिक्षणपद्धती यामुळे भारतीय समाज तळापासून ढवळून निघाला. धर्म, अंधश्रद्धा, रूढी, जाती इत्यादींचा भारतीय समाजावर असणारा पगडा कमी होऊन भारतीय समाजरचनेत आमूलाग्र परिवर्तन होण्याच्या क्रियेला सुरुवात झाली. ही परिवर्तनाची गती प्रथम प्रथम कमालीची संथ होती. इंग्रजी सत्ता भारतीय भूमीत पक्की रुजल्यानंतर या पराक्रमी पुरोगामी ब्रिटिश संस्कृतीने भारतीय समाजजीवन व्यापून टाकले. बुद्धिनिष्ठ, पुरोगामी व विज्ञानवादी अशा पाश्चात्य संस्कृतीशी अगदी जवळचा संबंध प्रस्थापित झाल्याने भारतीय समाज परिवर्तनाबाबत क्रियाशील झाला. हळूहळू ब्रिटिशांच्या केंद्रीकरणाच्या धोरणामुळे भारतीय ग्रामसंस्था निष्प्रभ झाल्या व कुटुंबसंस्था व जातिसंस्था यांचे प्राबल्यही घटत चालले. समष्टीपेक्षा व्यक्तिविकासाला महत्त्व प्राप्त झाल्याने परंपरागत भारतीय खेड्यांचे सामूहिक जीवन विस्कळीत झाले.

स्वातंत्र्योत्तर काळात मात्र ग्रामीण पुनर्रचनेच्या संदर्भात ग्रामीण परिवर्तनासाठी जाणीवपूर्वक प्रयत्नाला सुरुवात झाली. संपूर्ण देशाचा विकास खेड्यांच्या विकासावर अवलंबून आहे या सत्यस्थितीचे भान ठेवूनच परिवर्तनाचा कार्यक्रम आखला गेला. भौतिक समृद्धीसाठी पंचवार्षिक योजना कार्यान्वित झाल्या. आर्थिक व सामाजिक परिवर्तन व्हावे म्हणून अनेक कायदे करण्यात आले. अज्ञान व दारिद्र्य निपटून काढण्यासाठी जोराचे प्रयत्न झाले. परिणामतः भारतीय खेड्यांचा तोंडवळा भौतिक दृष्टिकोणातून हळूहळू बदलू लागला.

पृष्ठ ३१ वर

# भारत–पाक संबंध

## इस्लामाबाद फेरीचे फलित

वा. दा. रानडे

भारत आणि पाक यांच्यातील काही अनिर्णित प्रश्नांवर इस्लामाबाद येथे दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांमध्ये बोलणी होऊन या प्रश्नांवर समाधानकारक तडजोड झाली. १९७१ च्या युद्धापासून गेली पाच वर्षे खंडित झालेले दोन्ही देशांतील राजकीय संबंध वकिलातीच्या पातळीवर पुनः सुरू होत आहेत हा सर्वांत महत्त्वाचा निर्णय आहे. चीनशी वकिलातीच्या पातळीवर संबंध पुनः प्रस्थापित करण्याचे भारताने ठरविले. त्यानंतर पाकिस्तानशी राजकीय संबंध प्रस्थापित करण्याचा निर्णय हे शेजाऱ्यांशी संबंध सुधारण्याच्या दृष्टीने टाकलेले दुसरे महत्त्वाचे पाऊल आहे. या दोन देशांशी संघर्षातून जो एक ताण व तणाव निर्माण झाला होता तो कमी होण्यास या निर्णयांमुळे निश्चित मदत होईल.

राजकीय संबंध प्रस्थापित करण्यास पाक उत्सुक होता, भारताचीच तयारी नव्हती, दोन्ही देशांतील अनिर्णित प्रश्न आणि त्यांतून निर्माण होणारे कटुतेचे व संघर्षाचे वातावरण तसेच राहणार असेल तर, केवळ राजकीय संबंध प्रस्थापित करण्यात काय अर्थ अशी भारताची भूमिका होती. सिमला करारात ठरल्याप्रमाणे अनिर्णित प्रश्न वाटाघाटींनी सोडविण्याची इच्छा पाकने दर्शविली पाहिजे व अशी सदिच्छा व्यक्त करणारी काहीतरी कृती केली पाहिजे, तरच आपण याबाबत बोलणी करू अशी भारताची अट होती. सदिच्छेचे एक प्रतीक म्हणून आंतर्राष्ट्रीय नागरी विमानवाहतूक संघटनेकडे पाकने भारताविरुद्ध केलेली तक्रार मागे घ्यावी अशी मागणी भारताने केलेली होती. पण ही तक्रार मागे घेण्याचे पाकने नाकारल्यामुळेच वाटाघाटीत खंड पडला होता. सध्याच्या वाटाघाटीची तयारी पंतप्रधान श्रीमती गांधींनी दर्शविण्यापूर्वी पाकचे पंतप्रधान भुट्टो यांनी त्यांना पाठविलेल्या पत्रात आंतर्राष्ट्रीय नागरी विमानवाहतूक संघटनेकडे भारताविरुद्ध केलेली तक्रार मागे घेण्यास पाक तयार आहे असे श्री. भुट्टोंनी कळविले होते. भारतास हवी असलेली ही सदिच्छादर्शक हालचाल होती. ती दिसताच अनिर्णित प्रश्नांवर वाटाघाटींची सूचना भारताने केली व ती मान्य होऊन इस्लामाबादची बोलणी झाली. आंतरराष्ट्रीय नागरी विमानवाहतूक संघटनेकडे दोन्ही देशांनी संयुक्त पत्र पाठवून आपली तक्रार–प्रतितक्रार मागे घेत असल्याचे कळवावे असे इस्लामाबादला ठरले. वास्तविक भारत व पाकने संयुक्त पत्र पाठविण्याची आवश्यकता नव्हती. तक्रार पाकनेच केली, तेव्हा पाकनेच ती मागे घ्यायला हवी, पण तडजोडीसाठी भारताने याबाबतीत फारसे ताणून धरले नाही असे दिसते.

हा प्रश्न निर्माण झाला तो भारताचे फोकर फ्रेंडशिप विमान पाकच्या चाच्यांनी श्रीनगरहून पळवून लाहोरला जाळले या घटनेतून. विमानाच्या या नुकसानीबद्दल भारताला योग्य नुकसानभरपाई मिळायला हवी. तशी मागणीही भारताने त्यावेळी केली होती. पण सिमला कराराच्या वेळी ती सोडली. वास्तविक ही न्याय्य मागणी सोडण्याचे कारण नव्हते.

दोन्ही देशांच्या प्रदेशावरून विमानोड्डाणे सुरू करणे, दोन्ही देशांच्या दरम्यान विमानवाहतूक, रेल्वेवाहतूक आणि रस्तावाहतूक सुरू करणे हे निर्णय इस्लामाबादच्या बैठकीत घेण्यात आले. विषयपत्रिकेत एवढेच मर्यादित विषय होते व त्या सर्वांचा समाधानकारक निर्णय लागला. दोन्ही देशांतील बाकीचे अनिर्णित प्रश्न सुटण्यासाठी वाटाघाटी करण्यास अनुकूल वातावरण त्यामुळे निर्माण होईल.

पाकशी या वाटाघाटी सुरू होण्यापूर्वी 'माणूस'मध्ये लिहिलेल्या एका लेखात एका प्रश्नाकडे मी लक्ष वेधले होते. बांगलादेशमधील नव्या राजवटीशी पाकचे मैत्रीचे संबंध आहेत. बांगलादेशमध्ये पाकच्या हस्तकांच्या कारवाया आणि भारतविरोधी प्रचार चालू आहे. बांगलादेश पुन्हा पाकचा भाग बनविणे शक्य नसले तरी, तेथे आपल्याला अनुकूल व भारतविरोधी राजवट स्थिर करावी असे पाकचे प्रयत्न होते. बांगलास पाकची लष्करी मदत होण्याचाही संभव आहे. अमेरिकेकडून मिळणाऱ्या शस्त्रांपैकी काही शस्त्रे पाक बांगलादेशास पाठवू शकेल. बांगलादेशला सरळ लष्करी मदत करण्यापेक्षा पाकमार्फत ती करणे अमेरिकेलाही सोयीचे आहे. तेव्हा भारतीय प्रदेशावरील विमानोड्डाणांचा उपयोग बांगलादेशास विमानांनी शस्त्र-मदत करण्यासाठी पाक करणार नाही याची काय हमी ? वाटाघाटीत हा प्रश्न उपस्थित झाला तेव्हा भारताने काही हमी मागितली का ? पाकिस्तानने काही आश्वासन दिले का ? संयुक्तपत्रकात त्यासंबंधी काहीही उल्लेख नाही. वाटाघाटीत विमानोड्डाणे व हवाईवाहतूक पुनः सुरू करण्यास भुट्टोंनी सर्वांत जास्त महत्त्व दिले होते. हा प्रश्न गेली तीन–चार वर्षे चर्चिला जात होता, पण आंतरराष्ट्रीय विमानवाहतूक संघटनेकडे केलेली तक्रार मागे घेण्यास पाकने सतत नकार दिल्याने प्रगती खोळंबली होती. बांगलादेशात भारतविरोधी आणि पाकला अनुकूल अशी राजवट स्थापन झाल्यावरच भुट्टोंनी या प्रश्नावरची आपली भूमिका बदलली, हे लक्षात घेतले पाहिजे. विमानोड्डाणे पुन्हा सुरू करण्यामागे बांगलादेशला मदत करणे सुकर व्हावे, हा भुट्टोंचा उद्देश असावा, या तर्काला त्यामुळे बळकटी येते.

वाटाघाटीत आपणास पाहिजे तेवढे पदरात पाडून घ्यावयाचे आणि बाकीचे प्रश्न दीर्घकाळ आणि अनिर्णित ठेवावयाचे असे भुट्टोचे आतापर्यंतचे धोरण होते. भारताशी राजकीय संबंध पुनः प्रस्थापित करणे आणि विमानोड्डाणे व विमानवाहतूक पुनः सुरू करणे या दोन गोष्टी भुट्टोंना मुख्यतः साधावयाच्या होत्या त्या साधल्या आहेत.

आणखी अनिर्णित प्रश्नांवर यापुढे होणाऱ्या वाटाघाटीत भुट्टो कोणती भूमिका घेतात ? यावर भारत–पाक संबंध सुधारणे आणि उपखंडात टिकाऊ शांतता प्रस्थापित होणे बऱ्याच प्रमाणात अवलंबून आहे. सिमला कराराबद्दल आपण मोठ्या आशा बाळगल्या पण प्रत्यक्षात त्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने फारच मंद प्रगती झाली. इस्लामाबाद वाटाघाटीत काही अनिर्णित प्रश्न सुटले असले, तरी दोन्ही देशांचे संबंध सुधारण्याच्या बाबतीत फार मोठ्या आशा बाळगणे घाईचे होईल. आपल्या देशाच्या हितसंबंधांना कोणत्याही प्रकारे बाध न आणता वस्तुनिष्ठ दृष्टी ठेवून पाकशी संबंधांच्या प्रश्नाचा आपणास विचार करावा लागेल. संबंध सुधारण्यात आतापर्यंत पाकच्या आडमुठेपणामुळेच इंच इंच प्रगती झाली हे लक्षात घेऊनच पुढची वाटचाल आपणास करावी लागणार आहे. □

# सोलकढी

## एक बहुगुणी वस्त्रविशेष

सुसंस्कृत दिसण्यासाठी माणसाला, माणसासारखे वागावे लागले नाही, तरी माणसासारखे कपडे अवश्य करावे लागतात. कोणी हे, कोणी ते, कोणी असे, कोणी तसे, कोणी इतके, कोणी तितके कपडे करतात आणि सुसंस्कृत होतात. तेव्हा साहजिकच आपले कपडे इतरांपेक्षा अधिक सुसंस्कृत आहेत असे मानायचा मोह होतो. निदान मला तरी होतो. कपड्यात का कोठे सुसंस्कृतपणा–असंस्कृतपणा असतो ? (तो तर माणसाच्या हृदयात असतो), असे काही गोडगुरुजीमाणसे म्हणतात, पण ते संशयास्पद दिसते. गोडगुरुजींना असे फाटेफोड श्लेष काढत बसायची सवयच असते. असो. भारतीय स्त्रिया बहुतेक साडी नेसतात. साडी म्हणजे स्त्रैण अंग झाकव(दाखव)णारा एक वस्त्रविशेष होय. एकच साडी, पण ती भारतीय स्त्रीचे अंग वेगवेगळ्या तऱ्हांनी झाकत असते, आणि तिला (म्हणजे साडीला नव्हे; भारतीय स्त्रीला) सुसंस्कृत ठेवत असते.

अशा या साडीची लांबी किती असावी, असा एक गंभीर प्रश्न काही दिवसांपूर्वी राज्यसभेत निघाला होता. (राज्यसभेत बरे. लोकसभेत नव्हे. सध्याच्या अपर्यायी काळात तो लोकसभेत निघणे अधिक योग्य, उचित आणि स्वाभाविक झाले असते.) मागे, द. पां. खांबेटे यांनी लिहिलेल्या एका कथेच्या अनुरोधाने, चोळी वा ब्लाऊझ वा पोलका या उत्तरीय वस्त्रविशेषांच्या लांबी (हिलाच कधी कधी 'रुंदी' म्हणतात.) वरून केवढी तरी चर्चा महाराष्ट्रात आम्ही केली होती. त्यावेळी काही काळ पो. टि. मा. (पोटावर टिचकी मारावी, असे पोलके) ही आद्याक्षरे ग. दि. मा. या आद्याक्षरांइतकीच प्रसिद्ध होऊन राहिली होती. पुढे महाराष्ट्रीय महिला उत्तरीय म्हणून खमीज वा कुडता वा झब्बा वापरू लागल्या आणि टिचकी मारावी असे वाटायला लावणारी उघडी पोटे दिसेनाशी झाली. (हाय हाय.) वाचकहो, साडीचे सुटलेले टोक आपण पुन्हा एकदा पकडावे हे बरे. तर साडीच्या आदर्श लांबीचे काय ? साडी नेसणाऱ्या स्त्रीच्या आकारमानावर साडीची आदर्श लांबी अवलंबून असावी, असे मार्मिक उत्तर उद्योगमंत्री टी. ए. पै यांनी दिले.

हे अगदी खरे आहे : आम्ही पाहतो ना, एकाच लांबीची साडी भिन्नभिन्न आकारमानाच्या स्त्रियांच्या अंगावर किती वेगवेगळी दिसते. हेच सत्य आगळ्या दृष्टिकोनातून सांगायचे तर, एकाच लांबीच्या साडीत भिन्नभिन्न आकारमानाच्या स्त्रिया किती वेगवेगळ्या; म्हणजे एक डोलकाठीसारखी, तर दुसरी अख्ख्या गलबतासारखी, अशा दिसू शकतात. अर्थात भारतात वेगवेगळ्या लांबीच्या साड्या वेगवेगळ्या ढंगाने नेसल्या जातात. मात्र साडीशिवाय इतर जे स्त्रैण वस्त्रविशेष आहेत त्यांत जेवढे रंगढंग करता येतात तेवढे नेसत्या साडीत करता येत नाहीत.

त्यामुळे साडीऐवजी अन्य काही वस्त्रविशेष भारतात रूढ व्हावा, असे कित्येकांना वाटते. असे वाटणे माझ्या मते उगाच उंडगे होय. कारण साडी मोठी बहुगुणी आहे : जगात सर्वत्र ती नेसली जाते. ती शिंप्याकडून शिवून घ्यावी लागत नाही. (त्यामुळे वाचणारा वेळ बायकांना साडी-खरेदी करताना उपयोगी पडतो.) साड्यांमध्ये अमर्याद वैचित्र्य असू शकते. (त्यामुळे बायकांचेही समाधान व्हावे अशा काही साड्या असतात.) साडी वापरायला सोपी. (गुंडाळली की झाले.) उसनी द्यायला घ्यायला सोयीची. (कोणीही कोणाचीही सहज वापरावी.) नेसणारणीच्या चातुर्याच्या प्रमाणात अंग दाखवणारी आणि सहज झाकवणारी. (ते चातुर्य ध्यानी येण्यासाठी अनंतरावांच्या डोळसपणाने पुष्कळ नेसलेल्या साड्या काळजीपूर्वक न्याहाळायला हव्यात.) साडी टिकाऊ असते. (असेही माझ्या कानावर आले आहे.) भारतातल्या हवामानात साडी सोयीची असते.

एकूण साडीला आयुर्विमा, कठोर परिश्रम, अष्टांगयोग इत्यादी अनेक गोष्टींप्रमाणे, बऱ्यापैकी पर्याय दिसत नाही. म्हणूनच मोठ्या प्रमाणात जगातल्या स्त्रिया परंपरेने दिलेली वस्त्रेप्रावरणे फेडून, आता, भारतीय साडी वेढून घ्यायला लागल्या आहेत.

–अनंतराव



# जेवढे शहर मोठे तेवढे प्रदूषण जास्त

प्रकाश बुरटे

प्रदूषण समस्या दिवसेदिवस जास्तच गुंतागुंतीची होत आहे यावर आता दुमत आढळत नाही. प्रदूषणाचे दुष्परिणामसुद्धा तीव्रतर रूप घेत आहेत. 'जेवढे शहर मोठे तेवढे प्रदूषण जास्त' हा अलिखित आंतरराष्ट्रीय नियम झाला आहे, तसेच या प्रश्नावर विचारमंथनही मोठ्या प्रमाणात चालू आहे.

प्रदूषणाच्या प्राकृतिक (Physical), रासायनिक, तांत्रिक आदी अंगांचा विचार करून, त्यावर संशोधन करून त्याच्या नियमनासाठी स्वस्त आणि सुलभ तंत्रे शोधता येतात. तसे संशोधन आज होत देखील आहे. त्यामुळे नियमनासाठी सध्या अनेक तंत्रे उपलब्ध आहेत.

परंतु प्रदूषण समस्या ही केवळ विज्ञानाची अथवा तंत्रज्ञानाची नाही, तर तिचा संबंध उत्पादन, अर्थशास्त्र, नागरी–विकास शास्त्र, व्यापार अशा अनेक सामाजिक अंगांशी आहे. म्हणूनच ही समस्या जटिल होत आहे.

ज्ञात अशा प्रदूषण प्रतिबंधक तंत्रांचा स्वेच्छेने वापर खालील तीन अटींवरच होऊ शकतो.

१. प्रतिबंधक तंत्रे वापरात आणण्यासाठी लागणारा खर्च प्रदूषणाने होणाऱ्या सरळ (Direct) नुकसानीपेक्षा कमी असला पाहिजे.

२. प्रदूषणामुळे विवक्षित कारखान्यातील कामगारांच्या प्रकृतीवर आणि कार्यक्षमतेवर विपरित परिणाम होतो. त्याप्रमाणात जास्त वेगाने कराव्या लागणाऱ्या कामगारांच्या भरतीमुळे होणारे नुकसान, बेकारी, अर्धबेकारीमुळे कमी पगार देऊन भरून काढणे अशक्य असले पाहिजे, आणि

३. सार्वत्रिक प्रदूषणामुळे समाजाची एकूणच कार्यक्षमता आणि आरोग्य खालावल्यामुळे समाजास (सरकारमार्फत अथवा इतर मार्गांनी) शिक्षणावर आणि आरोग्यावर करावा लागणारा खर्च प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांकडून उत्पादित वस्तूंचे भाव न वाढविता वसूल करता आला पाहिजे.

या तिन्ही अटी कारखानदारांच्या नफ्यावरच गदा आणतात. आणि कारखानदार तर जास्तीत जास्त नफ्यासाठीच सारी उलाढाल करतो. हा मेळ बसावा कसा ?

उत्पादन सामाजिक उपयोगापेक्षाही प्रथमतः नफ्यासाठी आहे. जास्त उत्पादन करून भाव खाली आल्याने जर नफा घटत असेल तर कमी उत्पादन करून भाव वाढवून जास्त नफा मिळविला जात असल्याची अनेक उदाहरणे आहेत. जास्त नफा मिळविला जात असल्याची अनेक उदाहरणे आहेत. जास्त नफा मिळविण्यासाठी उत्पादन क्षेत्र बदलणे हा तर सर्रास प्रकार आहे.

'जास्त नफ्यासाठी उत्पादन' या नियमाचा सिद्धान्त म्हणून जेथे पाणी, वीज, जागा, कुशल कामगार स्वस्तात मिळतात आणि कच्च्या व तयार मालासाठी बाजारपेठ आहे तेथे कारखानदारी वाढते. खेड्यापेक्षा शहरे कारखानदारीस उत्तम हे अनुभवसिद्ध तत्त्व आहे. त्यामुळे शहरे 'स्नो–बॉल' प्रमाणे सतत वाढतात. 'खेड्यात चलण्याच्या' घोषणांचा उपयोग होत नाही. मोठ्या शहरात मोठ्या, मध्यम शहरात मध्यम, तर खेड्यात लघु अशा उद्योगांतून प्रमुख उत्पादन होते. शहर–खेडे ही दरी वाढत जाते आणि खेड्यांची फरपट होऊन काही अंशी ही दरी सांधलीही जाते. 'प्रगतीचा असमान वेग' हा शहरीकरणाचा गाभा बनतो.


या प्रक्रियेतून होणाऱ्या सर्वच मोठ्या शहरांच्या समस्या वाढतात. राहण्याच्या जागेचा, परिवहनाचा, अगदी सांडपाण्याचा प्रश्नसुद्धा उग्र स्वरूप धारण करतो. प्रदूषण हे त्या सर्वांगीण समस्येचे केवळ एक अंग आहे. सारे प्रश्न मुंबईच्या रस्ता खोदकामाच्या कारणांसारखे एकमेकांत अडकलेले. ड्रेनेज दुरुस्तीसाठी रस्ता खोदताना टेलिफोन लायनिंग बिघडते, ते दुरुस्त करताना वीज लाईन, बिघडते तर तेवढ्यात पाण्यासाठी नवी पाईप लाईन टाकण्याचा प्लॅन येतो. तात्पर्य म्हणजे सदैव रस्ता खोदलेला आणि वाहतूक विस्कळित ! असा शहरी समस्येचाही गुंताडा ! प्रदूषण प्रतिबंधासाठी कारखाने कायद्याने बंद करावेत अथवा हलवावेत तर बेकारीचा प्रश्न अथवा ते बंद पडण्याचा प्रश्न !

या गुंताड्याला एकमेव पर्याय म्हणजे प्रत्यक्षात उतरविता येण्याजोगे, 'विकासाचा समान वेग' साधणारे नवे अर्थशास्त्र ! त्यामुळे साऱ्या समस्या विभागल्या जातील, त्यांची सोडवणूक सोपी होईल. देवनार खाटिकखान्यात जाणाऱ्या जनावरांच्या तांड्यासारखे शहरी जीवनाच्या यांत्रिकतेमध्ये बळी द्यायला खेड्यातून निघालेले शहराकडे जाणारे तांडे आढळणार नाहीत. कारखान्यांचे केंद्रीकरण नसल्याने प्रदूषण वाढणार नाही. शिवाय, आज मुंबईत एका नव्या माणसाला आवश्यक त्या सेवा पुरविण्यास जेवढा खर्च येतो तेवढ्याच खर्चात त्याच सेवा इतरत्र जास्त लोकांना देता येतील, हा फायदा आहेच.

अर्थात हे अर्थशास्त्र 'स्वयंपूर्ण ग्राम' या म. गांधींच्या कल्पनेप्रमाणे असणे अशक्य आहे. कारण आज प्रत्येक गाव त्याला लागणारे अन्नधान्य, लोखंड, रेडिओ, कपडे इत्यादी गोष्टी तयार करू शकत नाही. प्रत्येक गाव तर सोडाच पण आज असा सर्वार्थाने स्वयंपूर्ण असा कोठलाही देशसुद्धा नाही. अमेरिकेसारख्या संपन्न देशाला पेट्रोल आणि तयार मालाची बाजारपेठ यांसाठी इतर देशावर अवलंबून राहावे लागत आहे. तेव्हा या कल्पनेचा त्याग करून, जेथे ज्या गोष्टीचे उत्पादन जास्त प्रमाणात होऊ शकेल तेथे तेच उत्पादन केले पाहिजे. नव्या अर्थशास्त्राचा पाया समाजोपयोगी वस्तूंचे जास्तीत जास्त आणि नियोजित उत्पादन असा असू शकेल. त्याचे ध्येय मात्र विकासाचा समान वेग हेच असावयाला पाहिजे.

नव्या अर्थशास्त्राचे ध्येय 'विकासाचा समान वेग' हे असले पाहिजे, कारण त्यामुळे समाजातील उत्पादनाचा आणि ते करणाऱ्या घटकांचा, पर्यायाने सर्व माणसांचा निकटचा संबंध प्रस्थापित होऊ शकेल. 'जीवनासाठी की कलेसाठी कला' असा वाद उत्पादनात बिलकूल संभवत नाही. उत्पादन हे मानवाच्या उपयोगासाठी, उपभोगासाठी, जीवनाच्या समृद्धीसाठीच असते. त्यामुळे या अर्थशास्त्रात उत्पादनाचे आणि उपभोगाचे स्वतंत्र निर्देशांक असू शकणार नाहीत. उत्पादनवाढीचा वेग आणि दरडोई उत्पन्न अथवा खर्च अशा स्वतंत्र निर्देशांकातून काहीही अर्थबोध होत नाही. या उलट 'समाधानी जीवन निर्देशांका'सारखे निर्देशांक येथे अर्थप्रद आहेत. या निर्देशांकात स्वच्छ हवा-पाणी, निर्भेळ सकस अन्न, चांगले राहणीमान, मानसिक स्थैर्य, शिक्षण, आरोग्य, उत्पादनक्षमता अशा साऱ्या गोष्टींचा समावेश असेल.

असे अर्थशास्त्र आणि असे निर्देशांक आज तरी स्वप्नांच्या दुनियेत आहेत. ही स्वप्निलनगरी प्रत्यक्षात येण्याची गरज मात्र तीव्र आणि वास्तव आहे. प्रदूषणामुळे ती तीव्रता नजरेस येते इतकेच. □



# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

## पु. ल. इनामदार

### प्रकरण आठ : तर्कनिवेदने ( आर्ग्युमेन्ट्स् )

अभियोगातल्या पक्षकारांच्यावतीने त्या त्या पक्षाच्या अभिभाषकांनी-वकिलांनी केलेल्या तर्कनिवेदनांच्या भाषणांचा वृत्तान्त देण्यापूर्वी, मला हे स्वीकारले पाहिजे की, माझ्यासारख्या अभिभाषकाच्या तो वरच्या वकिलीव्यवसायाच्या अपराधासंबंधी अभियोगाच्या अनुभवात एवढा मोठा कागदपत्रांचा ढीग हाताळायचा नि त्यावर विचार करायची ही पहिलीच वेळ होती. अभियोगपक्षाने १४ जून १९४८ रोजी दाखल केलेल्या साक्षीदारांच्या नामसूचीमधल्या २७५ साक्षीदारांपैकी अभियोगपक्षाने केवळ १४९ साक्षीदारांचेच कथन न्यायालयासमोर करविले होते. हे परीक्षणकथन दि. २४ जून १९४८ ला आरंभ होऊन ६ नोव्हेंबर १९४८ पर्यंत चालले होते आणि त्या कथनलेखांची न्यायालयाने छापलेल्या पुस्तकांची तावभर आकाराची ३२६ पाने भरली होती. पुराव्यामध्ये अभियोगपक्षाच्यावतीने एकूण ४०४ प्रदर्श वस्तू, बहुतांशी कागदपत्र, कोर्टामध्ये दाखल झाले होते. त्यांची छापील पुस्तकांतली २८० तावपाने भरली होती. बचावपक्षाकडून अशा ११९ प्रदर्श वस्तू लेखी दाखल झाल्या होत्या व ७२ प्रत्यक्ष वस्तू दाखल झाल्या होत्या. त्यांची ५६ तावपाने भरली होती. याशिवाय, बरकड महत्त्वाची दरखास्ती निवेदने जी वेळोवेळी उभयपक्षांच्यावतीने न्यायालयासमोर दाखल झाली होती तसेच रोजच्या रोज न्यायाधीशांनी लिहिलेले आज्ञा व निर्णयलेख, अशा लेखांची ३२३ तावपाने छापील पुस्तकात होती. याशिवाय आम्हा वकिलांजवळ इतर कागदपत्रे, आमची टाचणे इत्यादींचे कागदपत्र प्रत्येकाजवळ वेगळे कितीतरी होते. ते न्यायालयाच्या कागदपत्रामध्येही होते. ते विशेष महत्त्वाचे नाहीत असे वाटून छापील पुस्तकात छापले नव्हते. पण कोर्टाच्या फायलीमधल्या कोणत्या कागदाचा कोणत्या वेळी संदर्भ सांगण्याची वेळ येईल त्याचा नेम नसतो. यामुळे या सगळ्या ढीगभर साहित्यावर विचार करणे, अभ्यास करणे आम्हा अभिभाषकांना आवश्यक झाले होते.

श्री. सी. के. दफ्तरी, महाअभिवक्ता–अ‍ॅडव्होकेट जनरल, मुंबई यांच्याबरोबर काम करायला म्हणून त्यावेळचे मुंबईचे ज्येष्ठ अ‍ॅडव्होकेट श्री. जे. सी. शाह हेही होते. ते अभियोगपक्षाच्या अभिभाषकांमध्ये दुसऱ्या रांगेत श्री. दफ्तरींच्या मागेच बसायचे. ते नेहमी आपल्या फाईलवजा वहीमध्ये एकसारखे काहीतरी लिहीत असायचे. मुद्यांचे टाचण करीत आहेत असे दिसायचे. लिहिल्या ओळींमध्ये काही अधोरेखांकित करीत असल्यासारखे दिसायचे. श्री. दफ्तरींना आपल्या मुद्यांचे टाचण दाखवायचे, हवे असलेले संदर्भ दाखवायचे. हे सर्व इतक्या त्वरेने की, मला असे वाटायचे की, दफ्तरींना काय लागेल त्याचा या शहांना अचूक अंदाज कसा असतो ! दफ्तरींनी काही हवे म्हणण्याच्या अगोदरच शाह ते दफ्तरींपुढे ठेवायचे, किंवा त्यांना सांगायचे. हव्या असलेल्या न्यायालयीन निर्णयदृष्टान्तांचे संदर्भ अगदी न्यायालय, वर्ष, पृष्ठच काय परंतु हव्या असलेल्या परिच्छेदाचा कितवा नंबर व कितवी ओळ येथपर्यंत सर्व काही त्यांच्या हाताशी व सर्व काही त्यांच्या जिभेवर आहेसे मला वाटायचे. ते स्वत: कोर्टामध्ये किंवा कोर्टाशी बोलले असे जवळजवळ नाहीच. परंतु ते नेहमी पुढे वाकून दफ्तरींना वारंवार काहीतरी सुचवल्यासारखे अगदी हळू आवाजात बोलायचे. पुष्कळ वेळी मी बचावपक्षाच्या अभिभाषकांच्या दुसऱ्या रांगेत त्यांच्याजवळच्या खुर्चीवर शहांच्या उजवीकडे बसलेला असायचा. अशी वेळ अर्थातच मला माझ्या सहयोगी मंडळींच्या इच्छेप्रमाणे किंवा सोयीप्रमाणे मिळायची. पण मला ते आवडायचे. कारण

त्या जागेवर बसून शहांच्या काम करण्याच्या पद्धतीचे, तयारीचे अवलोकन करणे मला शक्य होई व त्यांच्याशी माझे बोलणेही होई. शहा नेहमी शांत, पण दक्ष असे बसलेले, बोलणे अगदी हळू आवाजात, हसणेदेखील ऐकू यायचे नाही, केवळ चेहऱ्यावर किंवा ओठांमध्ये दिसायचे. त्यांच्या सान्निध्याचा लाभ मला जुलैपासून ते डिसेंबर १९४८ पर्यंत मिळाला. दफ्तरींच्या शेजारी डाव्या बाजूला एन. के. पेटीगारा ज्येष्ठ पोलिस अभियोजक–सीनिअर पोलिस प्रॉसिक्यूटर–मुंबई असायचे. हे तसे अगदी दक्ष, पण बोलणे भराभरा नि जरा अधिकच, अगदी हातवारे करून. पण पुष्कळ वेळी ते अनुभवाचे कच्चे आहेत असे मला वाटायचे. पेटीगारांच्या पलीकडे डाव्या बाजूला शेवटच्या जागेवर व्यवहारकर पोलिस अभियोजक–पोलिस प्रॉसिक्यूटर–मुंबई पण दफ्तरींचे व्यक्तिगत अव्वलसाहाय्यक म्हणून काम करीत असायचे. व्यवहारकरांच्या अलीकडे रायबहादुर ज्वालाप्रसादजी मुख्य ज्येष्ठ अभियोजक–चीफ सीनिअर प्रॉसिक्यूटर, पंजाब, बसायचे. कानांवर चंदेरी केस, ओठावर भरघोस चंदेरी मिशा, स्वभावाने व बोलण्यातही शांत, वयाने वृद्ध व डोईवर पांढरा स्वच्छ आर्यसमाजी साफा असे त्यांचे वर्णन. तेसुद्धा कोर्टात क्वचितच असे बोलत. पण मला हे कळले होते की, अभियोगपक्षाच्या बैठकीमध्ये अभिभाषक मंडळींचा जो विचारविनिमय चाले त्यावेळी दफ्तरी हे रायबहादुर ज्वालाप्रसादजींशी फार आदराने वागत व त्यांच्या मताला फार मान देत. दफ्तरींच्या सेवेला अर्थातच पोलिसचे नि सी. आय. डी. चे डी. एस. पी., डेप्युटी डी. एस. पी., सी. आय., एस. आय. इत्यादींची पलटन मुंबई, दिल्ली, पंजाब येथून बोलावलेली असेच. कोर्टामध्ये ही पोलिस अधिकाऱ्यांची पलटन बघून मला सुरुवातीस तर घाबरल्यासारखेच व्हायचे. मला हे माहीत झाले होते की, मुंबईकडली काही मंडळी माझ्या धोतर–टोपीच्या अवताराला बघून माझ्या अपरोक्ष माझी 'भटजी वकील' म्हणून चेष्टाही करीत असत. पण त्यांच्या प्रमुखाच्या म्हणजे दफ्तरींच्या उदाहरणाने नि कदाचित आदेशानेही, ही अधिकारी मंडळी प्रत्यक्ष आमच्याशी तत्परतेने नि सौजन्याने व नम्रतेने वागत. आम्हा दोन्ही बाजूंच्या अभिभाषकांमध्ये एकमेकांशी उत्तेजित वादावादी अशी क्वचितच झाली.

दिल्ली येथे त्या दिवसांत कधी कधी लालकिल्ल्याच्या बाहेर आम्हाला वाळीत टाकलेले किंवा तिरस्कारपात्र म्हणून वागवलेले अनुभवायला मिळायचे नि कुणाशीही मोकळेपणी बोलणे कठीण वाटायचे. पण लवकरच एकदा का आम्ही कोर्टाचे काटेरी कुंपण ओलांडून आत कोर्टात शिरलो की, आम्ही मोकळ्या वातावरणात आलो आहोत असे आम्हाला जाणवायला लागायचे. ही किमया मुंबईचे अॅडव्होकेट जनरल म्हणून त्यावेळी आलेल्या दफ्तरींच्यामुळेच शक्य झाली, हे येथे नमूद करण्यात मला काहीच अडचण वाटत नाही. एवढेच नव्हे तर, मी ते येथे अगदी मोकळेपणी नमूद करतो, भारतातल्या राज्यांच्यावतीने नेमण्यात येणारे महाअधिवक्ते–अॅडव्होकेट जनरल-एका विवक्षित ज्ञातीचे किंवा विवक्षित राजकीय दलाचे असावेत असा निकष पाळण्याचे दिवस त्यावेळी आले नव्हते हे आमचे भाग्यच म्हणावयाचे. मला लवकरच कळून चुकले की, दफ्तरी हे असल्या विचारांपासून अगदी दूर दूर आहेत. ते कोर्टाच्या आवारात आपला अधिकार हसऱ्या चेहऱ्याने वापरीत व आपल्या कामातला चोख व्यवस्थितपणा खिलाडू वृत्तीने सांभाळीत. कोर्टात कधी वातावरण तंग होत आहे असे त्यांना दिसताच, स्वतःच्या एखाद्या निर्मळ, हजरजबाबी विनोदाने ते सर्व टाळावयास ते कधीच चुकले नाहीत. दफ्तरी स्वतः कधी कोणता खेळ खेळाच्या मैदानावर खेळले होते की नाही, हे मला ठाऊक नाही पण वृत्तीने ते शंभर टक्के खिलाडी आहेत असेच मी अनुभवले. कोर्टात व कोर्टाच्या बाहेरही अनुभवले. थोड्याच दिवसांत त्यांनी मला ओळखले नि तेव्हापासून ते माझ्याशी फार सौजन्याने वागले. दिल्ली येथील लालकिल्ल्यातील अभियोगपर्वाच्या तसेच सिमला येथील अपीलपर्वाच्या काळात दफ्तरींच्या कोर्टातल्या सहवासाचा मला जो लाभ झाला, त्याविषयीच्या माझ्या सर्व आठवणी आपल्याला सहानुभूतीने, कौतुकाने व मार्गदर्शक म्हणून वागवणाऱ्या एखाद्या प्रेमळ ज्येष्ठ बंधूविषयी असाव्यात तशाच आहेत.

लालकिल्ल्यातल्या न्यायालयापुढे प्रस्तुत झालेल्या पक्षकारांच्या पर्वतप्राय पुराव्याच्या साहित्याचा उपयोग दफ्तरी अॅडव्होकेट जनरल यांनी ज्या कुशलतेने, ज्या धोरणाने, ज्या सुगरणपणाने केला त्याचे प्रत्ययकारी वर्णन करून सांगणे मला कधीच शक्य होणार नाही. दफ्तरींचे हे तर्कनिवेदनाचे भाषण दिनांक १ डिसेंबर १९४८ ला सुरू झाले ते ९ डिसेंबरपर्यंत चालले होते. त्यांनी आठवड्याच्या सुटीचा ५ तारखेचा रविवार सोडून त्या अगोदर चार दिवस व त्यानंतर चार दिवस असे पूर्ण आठ दिवस भाषण केले. या 'खुनाच्या खटल्या'मध्ये खुनाच्या घटनेविषयीच्या पुराव्याबाबत बोलायचे असे काही नव्हते. अभियुक्त नथूरामने ते सर्व स्वतःच कबूल केले होते. दफ्तरींचे सर्वकष, सर्वव्यापी असे तर्कनिवेदनाचे भाषण मुख्यतः खुनाच्या कटाच्या व कटाला प्रोत्साहन दिल्याच्या आरोपाभोवती एकसारखे फिरत होते. मुंबईच्या किंवा दिल्लीच्या चौकशी अधिकाऱ्यांनी पुराव्यातल्या पुष्कळशा गोष्टी 'आम्ही कशा आमच्या अक्कलहुशारीने शोधून काढल्या,' अशा थाटात कोर्टाच्या समोर आणल्या होत्या. पण खरे म्हणजे ते सर्व पोलिसांना स्वतः नथूरामनेच मोकळ्या मनाने सांगितलेले किंवा पोलिसांनी आपटेकडून त्याच्या 'बोलक्या बुद्धी'च्या क्षणी मिळवलेले, किंवा इतर काही अभियुक्तांकडून पोलिसांच्या सर्वश्रुत अशा परीक्षणपद्धतीने काढून घेतलेले असेच होते. काही गोष्टी पोलिसांना केवळ दैवायत्त अशाही मिळाल्या होत्या. पुष्कळशा केवळ योगायोगाने मिळालेल्या–अगदी काकतालीय न्यायाने मिळालेल्या अशा होत्या. पण या सगळ्या पुराव्याच्या गाठोड्याचा दफ्तरींनी एखाद्या जादूगाराच्या चलाखीने, जादूगाराच्या पोतडीसारखा उपयोग केला असेच मला म्हणावेसे वाटते. आधीच दफ्तरींचे प्रत्युत्पन्न, फर्मास इंग्रजी बोलणे, त्यावर ते वर्तमानपत्राच्या बातमीदाराच्या समक्षदर्शी प्रत्ययकारी भाषेत वर्णून सांगणे आणि मुद्याला धरून अचूक शरसंधान करणे सर्व काही बघण्या–ऐकण्यासारखे होते. हे सर्व करताना दफ्तरींचा रोख अर्थातच अभियुक्त आपटेची मान गळफासात गोवण्यासाठी होता, हे सांगण्याची आवश्यकता नाही. 'आपटे हाच या कटाचा सूत्रधार, बोलविता करविता धनी' असे श्री. दफ्तरींनी आपल्या भाषणात वारंवार नि निरनिराळ्या शब्दांत सांगितले. पुराव्यातल्या साक्षीदारांची कथने करविण्यात दफ्तरींनी हेच तंत्र कौशल्याने वापरून अभियुक्त

आपटेभोवती प्रखर प्रकाशाचा झोत सारखा फिरत ठेवला होता. त्यांच्या तर्कनिवेदनाच्या भाषणातही त्यांनी तेच केले. रस्त्यावर टॅक्सीवाल्याला बोलावण्यापासून ते त्यांचे भाडे देण्यापर्यंत, रेल्वे स्टेशनवर तिकीट काढणे, विश्रांतिस्थानांपैकी जागा मिळविणे, गाडी प्लॅटफॉर्मवर येऊ लागताच नथूरामला घाई करणे, हवाई प्रवासात विमानामध्ये नथूरामला हवा असलेला कॉफीचा कप मागविणे असली एकूण एक कामे आपटे एखाद्या कुशल प्रबंधकाच्या योजकतेने व तत्परतेने करीत आहे असेच दिसावे असा पुरावा दाखल करण्याचा व पुराव्याची कहाणी सांगण्याचा दफ्तरींचा प्रयत्न होता हे स्पष्ट होते. पुराव्यातली एखादी अगदी क्षुल्लक घटना, पण ती पुराव्यात अशा कौशल्याने दाखविली गेली की, बघणाराला–ऐकणाराला वाटावे की, साऱ्या पुराव्याचे वर्म याच घटनेत आहे! दिनांक २०–२१ जानेवारीच्या रात्री कानपूर स्टेशनवर नथूराम नि आपटे गाडी बदलण्यावेळची घटना. हे सांगायला आलेल्या अभियोगपक्षाच्या साक्षीदार कुमारी अंजेलिना कोलेस्टन या बाई. साक्षीदाराच्या पिंजऱ्यात बाईंनी आपल्या उंच स्वराच्या बायकी आवाजात प्लॅटफॉर्मवर गाडी येताच आपटेने नथूरामला कसे नथूराम, नथूराम! गाडी आली! म्हणून बोलाविले ते जेव्हा वर्णन करून सांगितले तेव्हा तर मला, थिएटरमध्ये एखाद्या नटीच्या अभिनय कौशल्यावर व स्वरांच्या फेकीवर खूष होऊन, दाद देणाऱ्या प्रेक्षक श्रोत्याच्या अभिनिवेशाने उभे राहून, टाळ्या वाजविण्याचाच मोह झाला होता! बरे झाले. आपल्याबरोबरचा कदरदान रसिक कोणी आहे का हे बघण्याच्या भरात मी जज्ज आत्मचरणजींकडेच बघितले म्हणून! त्यांच्या चेहऱ्यावरचे आवळलेले ओठ व वटारलेले डोळे बघून माझ्या उतू जाणाऱ्या साऱ्या रसिकतेवर वेळेवर पाणी पडले! नाहीतर न्यायाधीश महोदयांचा मला फटकारा बसण्याचीच वेळ होती. सांगायचे ते असे की, एखाद्या क्षुल्लक गोष्टीला नाटयमय महत्त्व कसे दिले जाते, याचा तो पुरावा आदर्श होता व त्याचे सर्व चीज दफ्तरींनीही आपल्या भाषणात केले होते. असे किती तरी क्षुल्लक प्रसंग पुराव्यात काय नि दफ्तरींच्या भाषणात काय, न्यायालयासमोर नाटयमय पद्धतीने दाखवले– सांगितले होते व ते सर्व काम दफ्तरींनी चोखपणे, चोखंदळपणे केले होते.

विद्वान ॲडव्होकेट जनरलांनी आपल्या अभिभाषणात एक–दोन घटनांच्या संबंधात मात्र औचित्याची उंची पुरती पाळली नाही असे मला नाइलाजाने म्हणावेसे वाटते व त्याचे अजूनही वाईट वाटते. दफ्तरींनी असे करायला नको होते असे माझे अजूनही प्रामाणिक व नम्र मत आहे. पहिला प्रसंग २० जानेवारी १९४८ च्या बॉम्बस्फोटाच्या घटनेच्या अगोदरच्या आठवडयात पुणे सोडायच्यावेळी नथूरामने आपल्या विमा पॉलिसींपैकी एक पॉलिसी आपटेच्या तरुण पत्नीच्या नावे नामांकन– नॉमिनेट करून दिली होती त्याबद्दलचा. हा विषय एक पुराव्यातली घटना म्हणून, त्या घटनेमध्ये नथूरामची आपल्या सहकाऱ्यांविषयी साहानुभूती दाखविलेली दिसते अशा स्तरावरून सांगणे पुरेसे होते– झाले असते. पण दफ्तरींनी ते सर्व अशा काही शब्दांत नि आविर्भावात नथूरामकडे बघत सांगितले की, ऐकणाऱ्या–बघणाऱ्याला नथूरामच्या हेतूंविषयी– आपल्या मित्राच्या बायकोकडे बघण्याच्या दृष्टिविषयी नानाप्रकारच्या शंका वाटाव्यात! मी तर ते ऐकून चकितच झालो. नथूरामकडे बघितले तर, त्याचा चेहराही लालबुंद झालेला मला दिसला! असे कोणाच्याही बाबतीत ध्वनित करणे हेच मुळी कुलीनपणाचे नाही पण तेही नथूरामच्या बाबतीत ध्वनित करणे हा तर सत्याचा नि निरागसपणाचा क्रूर विपर्यास होता असेच म्हणावे लागते. दफ्तरींनी असे करावयास नको होते. पुराव्यातल्या साखळीचा एक दुवा एवढ्याच दृष्टीने त्याचा उल्लेख करणे पुरेसे होते असे मला अजूनही वाटते. नथूरामला याचे फार वाईट वाटले. एखाद्याच्या मनातल्या निर्मळ, निष्पाप विचारांना, दुष्टपणाचे किंवा पापिष्टाच्या लालसेचे स्वरूपही येऊ शकते, या नुसत्या कल्पनेनेच नथूराम व्यथित झाला होता हे मी पाहिले. अभिभाषणांतून असा शिंतोडा सगळी सोडून नथूरामवर उडावा हे नथूरामच्या बाबतीत अन्यायाचे होते.

अभियुक्त गोपाळ गोडसेच्या बाबतीत दफ्तरींच्या भाषणाचा सूर अगदी वेगळ्या जातीचा होता हे माझे नशीबच. दफ्तरींनी गोपाळ गोडसेचे चित्र म्हणजे आपल्या मोठया भावाचा आज्ञाधारक लहानभाऊ, मोठया भावाच्या इच्छेबरहुकूम वागण्याचा प्रयत्न करणारा, मोठा भाऊ म्हणेल तेच योग्य, आपण त्या विरुद्ध ब्रसुद्धा म्हणायचा नाही, अशा भावनेने वागणारा असेच रंगविलेले मला वाटते. गोपाळ गोडसेने जे काही केले ते त्याचे स्वतःचे असे काही नव्हते. कोणत्याही गोष्टीत त्याची स्वतःची इच्छा, हेतु, काय हे कोणी सांगत नव्हते. हे बघून मी स्वतः गोपाळ गोडसेची बाजू कोणच्या तऱ्हेने मांडावयाची याबाबत पुष्कळच शिकलो असे म्हणावयास हवे. कारण स्वतः दफ्तरींनी गोपाळच्या बाबतीत पुराव्यात आलेल्या घटना सांगितल्या त्या एक–एक करूनच. पण त्यामध्ये कोणच्याही तऱ्हेचा अभिनिवेश दफ्तरींनी दाखविला नाही. पण इतके करूनसुद्धा दफ्तरींनी एके ठिकाणी पुन्हा गोपाळच्या पुराव्यातली घटना घेऊन नथूरामवर हल्ला केला. तो हल्ला आडूनच केला, पण केला. २० तारखेला तिसऱ्या प्रहरी मरीना हॉटेलमधल्या खोलीत बसून कटवाल्यांनी बडगेच्या 'सामग्री'तल्या वस्तूची जुळवाजुळव केली व एकमेकांना ती 'प्राणघातक' हत्यारे वाटली हा अभियोगपक्षाचा माफीच्या साक्षीदाराच्या तोंडून वदविलेला तोंडी पुरावा. त्याला पुष्टी करणारा दुसरा कोणताही पुरावा नाही. तरीपण यावेळी नथूरामने आपल्या धाकटया भावाला नव्या दिल्लीतल्या मरीना हॉटेलमधून बाहेर काढून जुन्या दिल्ली रेल्वे स्टेशनवर फ्रॉंटिअर हिंदू हॉटेलकडे पाठविण्याची धूर्तता दाखविली यामध्ये नथूरामचा उद्देश आपल्या धाकटया भावाला प्राणघातक हत्यारांच्या वाटणीमधून बाजूला काढून दूर ठेवण्याची दूरदृष्टी ठेवण्याचा होता व हे नथूरामने आपल्या कोणाही साथीदाराला विश्वासात न घेता योजिले असा ध्वनी दफ्तरींनी आपल्या अभिभाषणात उमटविला. हे बघूनही नथूराम व मीही चकित झालो होतो. नथूरामला यानेही वाईट वाटले होते. नथूरामच्या दानतीविषयी

## ॲडव्होकेट जनरल यांच्या भाषणातून उडालेला शिंतोडा

कुणीही असा संशय घ्यावा याचा त्याला राग येण्याऐवजी अशा लोकांची त्याला कीव करावीशी वाटली होती. ' हे लोक मला समजतच नाहीत, समजून घेण्याचा प्रयत्नही करीत नाहीत. ' असे म्हणून ते तळमळले. अशाच काही विचाराने या मुद्यांचे उत्तर आपल्या वकिलांकरवी देण्यापेक्षा आपण स्वतःच द्यावे, आपल्या बचाव तर्कसमर्थनाचे सगळे भाषण आपणच करावे असे नथूरामच्या मनाने घेतले.

डॉ. परचुऱ्यांच्या विरुद्ध कोर्टापुढे आलेल्या अभियोगपक्षाच्या पुराव्याबद्दल दप्तरी यांच्या अभिभाषणाचा स्वर फारसा अभिनिवेशाचा आहे असे मला वाटले नाही. अभिनिवेश असला तरी तो फारच थोडा होता. ते आपण कशाबद्दल बोलत आहोत याकडे लक्ष ठेवून व त्या धोरणानेच किती सांभाळून बोलायचे हे ठरवूनच बोलत आहेत असे मला वाटले. डॉ. परचुऱ्यांच्याविरुद्ध आलेल्या पुराव्याचे मुख्य दोन भाग. एक तर कबुलीजबाबाचा पुरावा आणि दुसरा त्यात वर्णिलेल्या घटनांच्या पुष्टीकरणाचा पुरावा. यावर दप्तरींचे बोलणे मी लक्षपूर्वक ऐकताना मला जाणवले की, दप्तरींनी हे पुरेपूर ओळखले आहे की, पुष्टीकरणाचा पुरावा अगदी फोलकट, कवडी किमतीचा, अविश्वसनीय असा झाला आहे. पण कबुलीजबाबाच्या पुराव्याबद्दल ते काय सांगतात हे मी ऐकायला लागलो तर दप्तरी कबुलीजबाबाच्या मजकुराबद्दल चर्चा करायचे टाळीत आहेत असे मला वाटले. ' हा कबुलीजबाब म्हणजे शंभर नंबरी सोन्याचा दागिना. त्याला पारखायची आवश्यकताच नाही, ' अशा थाटात ते कबुलीजबाबाबाबत जास्ती काही बोलले नाहीत. त्यांचे सारे भाषण निरनिराळ्या शब्दात ' हे चोख नाणे ' आहे. डॉक्टरांसारख्या प्रौढ व सुशिक्षित माणसाने न्यायाधीश अधिकाऱ्यासमोर स्वतः सात कागदावर सात सह्या करून दिलेला हा कबुलीजबाब आहे. तो कसा लिहून घेतला हे सांगायला तो न्यायाधीश अधिकारी स्वतः कोर्टात उभा राहिला आहे. त्या न्यायाधीश अधिकाऱ्याच्या दानतीविषयी, विश्वसनीयतेविषयी आक्षेप घेणारा एक प्रश्नही अभियुक्ताकडून विचारला गेला नाही. तो न्यायाधीश अधिकारी पूर्ण जबाबदारीने एखाद्या अनुभवी न्यायाधीशाच्या निःपक्षतेने वागला आहे. त्याने आवश्यक ती सर्व काळजी घेऊन कबुलीजबाब राजीखुशीने व दबाब किंवा प्रलोभनाशिवाय दिला आहे अशी खात्री करून घेतली आहे ' वगैरे, अशा तऱ्हेचे फिरून फिरून सांगणे होते. तरी पण दप्तरी हे मॅजिस्ट्रेट महोदयांच्या साक्षीवर अधिक भरवसा ठेवीत आहेत की कबुलीजबाबाला एक दस्तवेज म्हणून अधिक किंमत देत आहेत हे मला त्यांच्या भाषणावरून नीटसे उमगले नाही. माझ्या बचावाच्या तर्कनिवेदनाचा आराखडा डांगे यांना माहीत होता. ते त्यावेळी वारंवार मला चिमटे काढल्यासारखे डिवचून माझ्याशी काहीतरी विनोदाचे बोलत. पण मी तिकडे बिलकुल लक्ष दिले नाही व गंभीरपणे दप्तरींच्या भाषणाकडे लक्ष देत होतो. दप्तरींनी किल्ल्यावरचे सैनिक अधिकारी मेजर छत्रे, किल्ल्यावरचे डॉक्टर, ग्वाल्हेरचे पोलिस श्रेष्ठ मिस्टर मार्श स्मिथ ग्वाल्हेरचे सी. आय. डी. सुपरिंटेंडेंट श्री. खिज़र मुहम्मद यांना पुराव्यात उभे का केले नाही याचा काही खुलासा केला नाही. ' डॉ. परचुऱ्यांना किल्ल्यावर सैनिक अधिकाऱ्याच्या ताब्यात ठेवले होते, पोलिसांच्या ताब्यात नाही. तेव्हा पोलिसांच्या जुलूमजबरदस्तीचा प्रश्न नाही, ' असा अभियोगपक्षाचा तर्क असावा. पण दप्तरींनी असे कोर्टासमोर कधीच म्हटले नाही. डॉक्टरांच्या कसल्याही त्रासापासून मुक्त असल्याचा, म्हणजे जबाब राजीखुशीने लिहून दिल्याच्या अभियोगपक्षाच्या दाव्याबद्दल अधिकारवाणीने सैनिक अधिकारी मेजर छत्रेच सांगू शकले असते. डॉक्टरांच्या प्रकृतिस्वास्थ्याविषयी किल्ल्यावरचे डॉक्टरच सांगू शकले असते. विशेष करून डॉक्टरांचे प्रश्नपरीक्षण ' इस्पितळाच्या एका खोलीमध्ये ' केले असे खुद्द देऊळकर पोलिस साक्षीदारांनी सांगितले होते. असे असूनसुद्धा दप्तरींनी याविषयी काही खुलासा देखील करू नये याचे मला राहून राहून आश्चर्य वाटत होते व हळूहळू रागही यायला लागला होता. अभियोगपक्षाच्या वेपर्वाईचे सडकून हजेरी घ्यावी याबद्दल माझा विचार पक्का झाला तो याच दिवसात. संस्थानी राजसत्ता असूनदेखील ग्वाल्हेर येथे दिल्ली मुंबईच्या पोलिसांनी चौकशीची कारवाई कोणाच्या हुकुमाने केली या प्रश्नाचे उत्तर द्यायला ग्वाल्हेरचे पोलिसश्रेष्ठ मिस्टर मार्श स्मिथ तसेच दुसऱ्या राजसत्तेशी परस्परांच्या अभियुक्तांची देवाण-घेवाण व चौकशी ज्या अधिकाऱ्याच्या आज्ञेने करायची असते तो अधिकारी यांच्या पुराव्यात कथन करवणे आवश्यक होते. पण त्याबाबतही श्री. दप्तरींनी मौन पाळले ! परंतु जेव्हा डॉक्टरांच्या ' मी ब्रिटिश राजसत्तेचा नागरिक नाही ' या आक्षेपाबाबतच्या पुराव्याबाबत बोलायला श्री. दप्तरींनी तोंड उघडले ते अभिभाषण अगदी फॉर्मल केल्यासारखे ! त्यांनी अभियोगपक्षाचा एकएक पुरावा अथपासून इतिपर्यंत वाचून दाखवला. अभियुक्ताच्यावतीने माझे कूटपरीक्षण कसे फुसके आहे, अभियोगपक्षाच्या जन्मपत्रिकांच्या नि अभियुक्ताच्या वडिलांची दाट ओळख असलेल्या साक्षीदाराच्या पुराव्याला मुळीच धक्का न लावणारे आहे, वगैरे म्हणून ' डॉक्टर परचुऱ्यांच्या या आक्षेपात किंचितसुद्धा तथ्य नाही. दिल्लीच्या कोर्टापुढे चाललेली कार्यवाही पूर्णतया वैध आहे, ' असे ठामून सांगितले. श्री. दप्तरींनी डॉ. परचुऱ्यांच्या प्रकरणासंबंधी केलेल्या सगळ्या अभिभाषणावरून मात्र मला हे जाणवले की, ' जसे आपटेच्या बाबतीत अभियोगपक्षाने अगदी कंबरेचा शेला आवळून युद्ध पुकारले आहे, तसे डॉ. परचुऱ्यांच्या बाबतीत अभियोगपक्ष करीत नाहीत. ' अभियोगपर्वाच्या त्या काळात मला एवढ्याशा विचारानेच किती हायसे वाटले होते म्हणून सांगू ? ' श्री. भोपटकरांच्या मताप्रमाणे नथूराम नि आपटेबरोबर डॉ. परचुरेही नक्की फासावर चढणार असे अभियोगपक्षाला वाटत नाही. भोपटकरांचे मत म्हणजे न्यायवाणी नव्हे तर ? एवढेच काय कमी आहे, ' असे मी माझ्या मनाला समजावू लागलो होतो.

अभियुक्त सावरकरांच्या विरुद्ध पुराव्याबाबतचे दप्तरींचे अभिभाषण हे वक्त्याला आत्मविश्वास नसला म्हणजे त्याच्या बोलण्याला जशी धार येत नाही तसे अगदीच ' बोथट ' झाले. आणि याला कारण दप्तरी ज्या पुराव्याच्या आधारावर बोलत होते तो पुरावाच मुळी ' बोथट ' होता. दप्तरी आपल्या परीने त्या पुराव्याला अगदी शक्य तितक्या नाट्यमय पद्धतीने रंगविण्याचा प्रयत्न करीत होते. पुरावा असा केवळ होता माफीचा साक्षीदार बडगेचाच. पण बडगेचे पुराव्यातले ते चित्र पाहून मला तर ' वनराज केसरी आपल्या गुहेमध्ये स्वस्थ विश्रांती घेत पडले असताना एखाद्या मशकाने त्या वनराजांच्या कानाशी आवाज करीत त्यांच्यावर तुटून पडण्याचा-

त्यांना चावा घेण्याचा–त्यांच्या निद्रेचा भंग करण्याचा प्रयत्न करावा.' या इसापच्या कहाणीचीच आठवण झाली. सावरकरांच्या संबंधात बडग्याचे व्यक्तित्व क्षुद्र मशकाच्या लायकीचेच होते. पण मला दफ्तरींच्या भाषणामधली एक गोष्ट येथे आवर्जून सांगायला हवी. दफ्तरींनी सावरकरांच्या विरुद्ध केलेले भाषण नुसते अभिनिवेशाचे नव्हते एवढेच नाही, तर दफ्तरींच्या भाषणात त्यांनी सावरकरांच्या व्यक्तित्वाविषयी एकही वावगा विचार–वावगा शब्दही उच्चारला नाही. सावरकरांच्या व्यक्तित्वाला उपमर्दकारक किंवा लांछन लावणारे असे काहीही दफ्तरी मुळीच बोलले नाहीत. नेहमी कुणाच्याही लक्षात येईल अशी आदराचीच भाषा त्यांनी वापरली. पण सावरकरांच्या त्यावेळच्या मन:स्थितीत त्यांना न राहवून, सावरकरांनी अगोदरच आपल्यावतीने भोपटकर, जमनादास मेहता यांच्यापेक्षा आणखी मोठी तोफ कोर्टाच्या मैदानावर आणून 'मशकाचा हल्ला परतवून लावण्याची' तयारी सुरू केली होती. बिहार–पाटण्याचे नामवंत बॅरिस्टर पी. आर. दास सावरकरांच्यावतीने पक्षसमर्थन करावयास येणार आहेत असे बोलले जात होते. श्री. दफ्तरींचे तर्कनिवेदनाचे भाषण ९ डिसेंबर १९४८ ला तिसऱ्या प्रहरी सुमारे चार वाजता संपले. त्या दिवशीच पी. आर. दास हे दिल्लीला दि. १६ किंवा १७ ला येणार असल्याचे आम्हाला कळले.

दुसऱ्या दिवशी म्हणजे १० डिसेंबरला अभियुक्त आपटेचे वकील श्री. मेंगळे यांचे भाषण सुरू झाले व बचावपक्षाच्या तर्कनिवेदनांची सुरुवात झाली. मेंगळे आपले भाषण सावकाश, प्रकरणातल्या संबंधित साक्षीदारांचे कथन अथपासून इतिपर्यंत वाचीत करीत होते. खरे बोलायचे तर, हे सर्व लेख दफ्तरींनी स्वत: कोर्टामध्ये समग्र वाचून दाखवले होते व ते पुन्हा सगळे वाचण्याची काही आवश्यकता नव्हती. थोडक्यात सांगायचे म्हणजे अभियुक्त आपटेचे व्यक्तित्व जितके डोळ्यात भरण्यासारखे नेत्रदीपक होते, त्याच्या साक्षेपात आपटेच्या वकिलांचे तर्कसमर्थन तितकेच रंगहीन, न दिसण्यासारखे झाले, असेच मला म्हणावेसे वाटते. मला अजून आठवते की, श्री. मेंगळे एखाद्या साक्षीदाराचे कथन वाचायला आरंभ करीत, मधून मधून त्या साक्षीदाराच्या पुराव्यावर काही टीकात्मक बोलत नि मी, श्री. मेंगळे काय नवीन मुद्दा–तर्क या टीकेमधून काढणार आहेत याची अति उत्सुकतेने वाट पाही. पण शेवटी यावरून मी अगदी ठासून निवेदन करतो की, हा साक्षीदार अगदीच बेभरंवशाचा आहे, विश्वास ठेवण्याच्या लायकीचा नाही, एवढेच ऐकायला मिळायचे. मला हे कळायचे नाही की, श्री. मेंगळ्यांचा मुद्दा मी ऐकला नाही, की मला त्यांचा मुद्दा समजलाच नाही? माझ्या मते अभियोगपक्षाने अभियुक्त आपटेला 'खुनाच्या गुन्ह्याचा सूत्रधार कटवाला' म्हणून दाखविण्यासाठी जो पुरावा कोर्टासमोर आणला होता त्यामध्ये अशा कितीतरी जागा होत्या की, त्या घटनांच्या बाबतीत अभियोगपक्षाने सत्याचा विपर्यास केला आहे, राईचा पर्वत केला आहे, नकटीला नटवले आहे, उत्तराला अर्जुन बनविले आहे, सुंदरीचा नखरा दाखविणारे 'हे तो घटिंगण' असे नाना तऱ्हेने बोलून अभियोगपक्षाच्या पुराव्याची रेवडी उडविता आली असती! अभियोगपक्षाचा पुरावा किती फुसका आहे, कसा बनावटी आहे, आडंबराच्या आड सामान्य, किरकोळ गोष्टीला अति महत्त्वाच्या म्हणून दाखविण्याचा प्रयत्न करणारा आहे इत्यादी बोलता आले असते. असो.

अशा तऱ्हेचे श्री. मेंगळ्यांचे भाषण दि. १० ला सकाळी सुरू झाले ते दिनांक ११ ला व आठवड्याच्या सुटीनंतर दिनांक १३ ला होऊन दिनांक १४ ला मधल्या विश्रांतीपूर्वी संपले. विश्रांतीनंतर अभियुक्त शंकर किस्तय्याच्यावतीने सरकारी खर्चाने मिळालेले वकील श्री. हंसराज मेहता यांचे भाषण झाले. श्री. हंसराजजी हे पंजाबी पाकिस्तानातले निर्वासित होते. गरीब स्वभावाचे सालस गृहस्थ. वयाने माझ्यापेक्षा थोडेसेच मोठे. दिल्लीच्या धावपळीच्या वातावरणात आपला वकिलीचा व्यवसाय करू पाहणाऱ्या निर्वासित वकिलांपैकी एक. श्री. हंसराजजींनी शंकर किस्तय्याचे चित्र, माफीच्या साक्षीदाराची रिक्षा चालवणारा नोकर, निरक्षर, तेलगूशिवाय इतर कोणतीही भाषा न समजणारा व याचकरता इतर अभियुक्तांशी कोणत्याही कटाच्या विचार सहमतीमध्ये भाग न घेऊ शकणारा असे दाखविले व महात्माजींबद्दल काही आकस ठेवण्याची, महात्माजींच्या राजकारणाबद्दल काही भूमिका घेऊन त्यामध्ये आपले डोके तापवून-फिरवून घेण्याची पात्रता नसणारा क्षुद्र जीव शंकर किस्तय्या होता यावर भर दिला. त्यांनी अभियोगपक्षाच्या पुराव्यावरूनदेखील शंकर किस्तय्याने असे कोणतेही कृत्य, 'तो हत्येचा अथवा कटाचा गुन्हा आहे ही जाणीव' राखून केल्याचे सिद्ध झाले नाही हे दाखविले. शंकर किस्तय्याने जे काही केले असे म्हणता येईल ते आपल्या धन्याची 'सामग्री' इकडून तिकडे नेण्या–आणण्याचे काम एवढेच. हे काम तो पूर्वीही बडगेसाठी म्हणून करीत होताच. ती सामग्री कशासाठी? त्याच्याशी शंकरचा काही संबंध नाही, काही माहीत होण्याचाही संभव नाही. तो आपल्या धन्याच्या हुकुमाचा केवळ ताबेदार होता वगैरे श्री. मेहताजींनी सांगितले.

शंकर किस्तय्याविषयी कहाणी सांगताना एका गोष्टीचा आणखी उल्लेख मला करावयाला हवा तो येथेच करतो. शंकर किस्तय्याला जसे सरकारी खर्चाने वकील मिळाले होते, तसेच त्याला सरकारी खर्चाने कोर्टात चालणारे कामकाज कळावे, आपला बचाव करण्याविषयी कोर्टाच्या प्रश्नांची उत्तरे देणे, वकिलाला आपली बाजू सांगणे, इत्यादी सोयीसाठी एक दुभाषी कुमारी कमलम्मा नावाची बाई मिळाली होती. ही बाई वयाने तरुण, पंचवीसाच्या आतबाहेरची, वर्णाने गोरी, डोळे मोठे व रेखीव, काळेभोर, तसेच केस कुरळे, काळे व लांबसडक, अशा रूपाची–देखणीच होती. तिचे हावभाव, बोलणे, हसणे, मद्रासी कॉलेज-कन्यकेसारखे आनंदी व लाघवी. ती कोर्टामध्ये शंकरजवळ बसून किंवा उभी राहून हळू आवाजात त्याला तेलगू भाषेमध्ये काय चालले आहे, कोण काय म्हणते आहे, कोर्ट काय विचारते–सांगते आहे वगैरे सांगत असायची. शंकरच्या सांगण्याप्रमाणे वकिलालाही माहिती द्यायची, फुरसतीच्या वेळी न्यायाधीशांनाही सांगायची. ही आमच्याशी गप्पा मारण्यात, थट्टा-विनोद करण्यात

**अभियोगपक्षाच्या पुराव्याची रेवडी उडवता आली असती**

अग्रेसर. तिची व्यक्तिगत अशी माहिती आम्हाला–मला कधीच कळली नाही–मीही विचारली नव्हतीच, पण तिचे माझ्याशी, सगळ्यांशीच वागणे, कसे मनमोकळे पण अंतर ठेवून असायचे! दिल्लीसारख्या शहरात, लालकिल्ल्यात येऊन कोर्टासमोर रीतसर शपथ घेऊन–करायचे काम हसत खेळत पण चोखपणे करणाऱ्या या मुलीविषयी मला नेहमी कौतुक वाटायचे. कोर्टाच्या आवाराच्या बाहेर तिच्याशी बोलण्याची वेळ आम्हाला–मला कधीच आली नाही. असो. मी सांगत होतो ते हंसराजजी मेहतांचे भाषण दि. १४ डिसेंबर १९४८ लाच कोर्ट संपावयाच्या वेळी संपले.

दिनांक १५ डिसेंबर १९४८ रोजी बुधवारी सकाळीच नथूराम तर्कसमर्थनाचे भाषण करावयास उभा राहिला. दिनांक १५ डिसेंबरला सकाली कोर्टात येताना नथूराम अंगात एक पांढरा स्वच्छ ड्रील कापडाचा शर्ट व त्यावर एक जुना लोकरी स्वेटर घालून आला होता. नथूरामने आपले भाषण अभियुक्तांच्या पिंजऱ्याच्या कमरेएवढ्या उंच कठड्याजवळ उभे राहून, मायक्रोफोन समोर ठेवून केले. भाषण करताना, नथूराम आपले दोन्ही हात कठड्यावर ठेवी. मधून मधून भाषणाच्या ओघात उजवा हात उचलून काही भाव दाखवी. प्रकरणाच्या काही लेखांचा संदर्भ सांगण्यासाठी आपल्या बसण्याच्या जागेकडे वळून तेथून कागदपत्र उचली व संदर्भ सांगून होताच कागद खाली ठेवून देई. इंग्रजीमध्ये, मला वाटते पहिल्यानेच तो बोलत होता! इंग्रजी बोलताना तो इंग्रजी शब्द 'प्रिझम्शन'चा त्या शब्दातल्या दुसऱ्या 'प'चा उच्चार स्पष्टपणे करीत 'प्रिझम्पशन' असे उच्चार करी हे मला आठवते. दिनांक १५ ला बुधवारी नथूराम दिवसभर–विश्रांतीचा वेळ सोडून बोलला. पण त्याच्या चेहऱ्यावरची ऋजुता, वाणीतली सत्यशीलपणाची शुचिता शेवटपर्यंत केव्हाही, कुठेही झाकोळली नाही. दिवसभराच्या बोलण्याने जणू काही तो थकलाच नव्हता! विचार एक नि उच्चार दुसरा अशा वृत्तीचा त्याच्या चेहऱ्यावर 'ओवळा' भाव मला तरी कधीच दिसला नाही! बोलताना नथूराम प्रेक्षक–श्रोतृवर्गाकडे बघत नव्हता, वकील वर्गाकडे बघत नव्हता, पिंजऱ्यामध्ये शेजारीच बसलेल्या अभियुक्तांकडेही बघत नव्हता. नथूरामने आपले भाषण जवळ जवळ सारावेळ न्यायाधीशांकडे–आत्मचरणजींकडे बघत केले. कधी कधी तो संदर्भाने अॅडव्होकेट जनरल दफ्तरींच्याकडे बघून बोलायचा एवढेच. नथूरामने आपल्या तर्कनिवेदनात पुराव्यात आलेल्या सगळ्या संबंधित साक्षीदारांबद्दल काही ना काही साधकबाधक टीका केली. अधिकारी साक्षीदारांविषयी, गांधी टोपीवाल्या साक्षीदारांविषयी, दोघा गुजराथी गोस्वामी महाराजांविषयी, ओळख परेडचे काम करणाऱ्या न्यायिक अधिकाऱ्याविषयी तसेच टॅक्सीचालक, रेल्वेचे व हॉटेलमधले कर्मचारी यांच्याविषयी, अगदी बिर्लाभवनाच्या माळी साक्षीदाराविषयी नथूरामने बोलताना काही न काही, पण सारख्याच संयत शब्दात सांगितले. (माळी साक्षीदाराविषयी त्याने एवढेच म्हटले की, 'खरी गोष्ट अशी आहे की, मी गोळ्या झाडल्यावर माझ्या डोक्यावर मारणारा हा माळी नव्हता. सैन्यातल्या दुसऱ्या एका मनुष्याने माझ्या डोक्यावर मारले होते.' हे सुद्धा नथूरामने सांगितले ते का हे मला समजले नाही. कारण नथूरामच्यावतीने दि. ३० जानेवारी संध्याकाळच्या घटनेच्याबाबत कुणाही साक्षीदारांना कूटपरीक्षणाचा एकही प्रश्न विचारला गेला नव्हता! नथूरामने हे जरी आपल्या लेखी जवाबात लिहिले होते, तरी तर्कनिवेदनाचे वेळी त्याचा उच्चार करणे बरोबर नव्हते असे मला वाटले.) पण नथूरामने आपल्या सगळ्या भाषणात कुठेही अभियोगपक्षाच्या पुराव्यातल्या महिला साक्षीदारांविषयी अवाक्षरही सांगितले नाही. ज्या साक्षीदारांचा नथूरामने उल्लेख केला त्यांच्यावर टीका करताना नथूरामने कधीही अपमानास्पद किंवा टिंगल करणारे शब्द कुणाहीविरुद्ध वापरले नाहीत. बोलताना कुठे कुठे तो, अतिरंजक शब्दांत किंवा उत्तेजित हावभावाने बोलला. पण ते त्याचे बोलणे किंवा वागणे शहरी वातावरणातली 'सभ्यता' न शिकलेल्या नि गावढ्या गावातल्या अडाणी खेडवळासारखे निर्व्याजपणे होत होते असेच मी म्हणेन.

दुसरे दिवशी म्हणजे दि. १६ डिसेंबरला नथूराम कोर्टात आला तो अंगावर एक जुनासा तपकिरी रंगाचा, लोकरमिश्रित कापडाचा-उघड्या गळ्याचा कोट व गळ्याभोवती जाड लोकरीचा पंचरंगी पट्ट्याचा गळपट्टा गुंडाळून. त्याने दिनांक ३० जानेवारीला सकाळी दिल्ली रेल्वे स्टेशनच्या वेटिंगरूममध्ये बसून लिहिलेल्या व नारायण आपटेला पुण्याच्या पत्त्यावर पाठवलेल्या पत्राचा संदर्भ देऊन, त्याने कोर्टापुढे निवेदन केले की, पुराव्यातल्या तीन कागदांपैकी एक फोटोचित्र असलेल्या प्रदर्शात त्याच्या अंगावर जो कोट व गळपट्टा दिसतो आहे तो 'हाच;' असे म्हणून त्याने आपल्या अंगावरच्या कोट व गळपट्ट्याकडे बोट दाखविले-अगदी लाजलेल्या मुलाच्या आविर्भावाने! ते पत्र, त्या पत्राचा पोस्टाचे शिक्के असलेला लिफाफा व त्या पत्रात उल्लेखिलेला फोटो हे तिन्ही कागद बचावपक्षाच्यावतीने कोर्टामध्ये वस्तु प्रदर्श क्र. ११५–११६ व ११७ नावाने दाखल झाले होतेच. त्या प्रदर्श फोटोचित्राविषयी नथूरामने कोर्टाला निवेदन केले की, ग्वाहेरहून दिल्लीला आल्यावर दिनांक २९ ला वेटिंगरूममध्ये सामान ठेवून दुपारी तो दिल्ली शहरातल्या निर्वासितांच्या वस्तीमधून हिंडत असता त्याला एक निर्वासित फोटो चित्रकार भेटला होता व त्या चित्रकाराने नथूरामला सभ्य शब्दांत पण काकुळतीच्या स्वरात, माझ्याकडून एक फोटो काढवून घ्या, आताच तयार करून देतो असे विनविले व 'किंमतही फार घेणार नाही माझ्या व माझ्या मुलांच्या पोटपाण्यापुरतीच' अशी ग्वाही दिली होती. म्हणून नथूरामने रस्त्यावरच उभे राहून त्या निर्वासिताकडून आपला फोटो काढवून घेतला व त्या निर्वासिताला 'भरपूर' पैसे देऊन फोटोची ओली प्रत त्याच्याकडून घेतली 'तीच ही पत्र वस्तु प्रदर्श ११७ असे नथूरामने कोर्टाला सांगितले! आणि हे म्हणून होताच नथूरामने घाईघाईने आपल्या अंगावरून तो कोट व गळपट्टा काढून घेऊन आपल्या जागेवर ठेवून दिला व पुन्हा ड्रील शर्ट नि जुन्या स्वेटरच्या कपड्यात आपल्या भाषणाचे सूत्र घेऊन निवेदन पुढे चालू केले.

नथूरामने आपल्या भाषणात कधी त्रासिकपणा–चीड शब्दांत नाही पण चेहऱ्यावर दाखविली असे म्हणावयाचे तर ते, नथूरामने आपली विमा पॉलिसी सौ. आपटेच्या नावाने करून दिली त्या प्रसंगाबद्दल बोलताना दाखविली, असे कुणी म्हणावे हवे तर, पण त्या संदर्भातदेखील नथूरामने जे शब्दप्रयोग, वाक्यप्रयोग उच्चारले ते अभियोगपक्षाच्या–श्री. दफ्तरींच्या दृष्टिकोनाबद्दल कीव करणारे असेच होते. अभियोगपक्षाला-दफ्तरींनादेखील एखादा अगदी मनष्यहत्या करणारा

माणूसदेखील मनात आपल्या भावजयीसदृश महिलेबद्दल मायेची भावना बाळगू शकतो हे कसे समजत–कळत नाही? एवढीच नथूरामची प्रतिक्रिया होती.

दिनांक १६ डिसेंबर १९४८ च्या विश्रांतिकाळानंतर नथूरामच्या तर्कनिवेदनाचे समारोपाचे भाषण, नथूरामच्या मातृभूमीबद्दलच्या प्रेमाने आणि भरतभूमीच्या निर्घृण विभाजनाविषयींच्या तीव्र कळवळ्याने ओतप्रोत भरलेले असेच झाले. कोर्टाच्या सगळ्या प्रेक्षक श्रोतृवर्गाच्या डोळ्यांतून–न्यायाधीश आत्मचरणजींच्याही डोळ्यांतून अश्रू पाझरविणारे झाले!

लालकिल्ल्यातील अभियोगपर्वात पुष्कळजण मजजवळ पुष्कळ काही बोलत. त्यांचे बोलणे पुष्कळसे, किंवा लक्षात ठेवण्यासारख बोलणे शब्द अन् शब्द पुन्हा लगेच बोलून किंवा लिहून ठेवण्याची माझी सवय, तयारी असे; अजूनही आहे. पण त्यादिवशीचे नथूरामचे तिसऱ्या प्रहराचे समारोपाचे भाषण कितीही प्रयत्न केला, आठवून पाहिले तरी शब्द लक्षात न येता केवळ त्या भाषणाचा ऐकणाऱ्याच्या हृदयाचा ठाव घेणारा अमोघ नादच मला आठवतो. नथूरामचा भाव संकुलित शब्दांचा कंप व नितळ डोळ्यांतले सत्याचे तेजच दृष्टीसमोर उभे राहते नि वाटते की, अजूनही त्याजागी मी गेलो तर, त्या नादाचा स्वर मला तेथे ऐकू येईल.

भाषण संपवून नथूरामने शेवटी जज्ज आत्मचरणजींचे, न्यायाधीशमहोदयांनी सर्व अभियुक्तांना व विशेष करून नथूरामला दिलेल्या सौजन्याच्या वागणुकीबद्दल मनःपूर्वक आभार मानले. अॅडव्होकेट जनरल दफ्तरींबद्दल नथूरामच्या तोंडून भाषणाच्या ओघात अधिक उणा शब्द बोलला गेला असला तर, त्याबद्दल त्याने त्यांची क्षमा मागितली, आणि अॅडव्होकेट जनरल, अभियोगपक्ष व पोलिस अधिकारी यांच्या सौजन्याबद्दल त्या सर्वांचे आभार मानले आणि न्यायालयाला अभिवादन करून नथूराम खाली बसला. असे करताना नथूरामने वादविवादाचा फड जिंकू पाहणाऱ्या सराईत वक्तेबाजाच्या अभिमानाने दाद मिळविण्यासाठी कुणाकडेही बघितले नाही. नथूराम आपल्या जागेवर ठेवलेले कागद व कोट मफरल बाजूला सारून आपल्या जागेवर बसला व त्याने आपल्या सावरीच्या कापसासारख्या मऊ हाताने आपल्या कोटाची नीट घडी घालण्यास आरंभ केला!

ह्या असल्या दृश्याकडे एकदा बघितल्यावर ती विसरणे कधी शक्य आहे का? ग्रीक किंवा शेक्सपिअरनिर्मित साहित्यातल्या शोकपर्यवसायी नाटकापेक्षा कमी नाट्यमय किंवा कमी मर्मस्पर्शी हे दृश्य खचितच नव्हते. त्यादिवशीच्या कोर्टातल्या प्रेक्षक श्रोत्यांना हे सहज समजले की, नथूरामने गांधीजींसारख्या महात्म्यालाच आपल्या मातृभूमीच्या–नथूरामच्या अखंड भरतभूमीच्या विभाजनाबाबत दोषी ठरवले व त्यांची हत्या केली. हिंदुस्थान आणि पाकिस्तानचे जनक गांधीजीच आहेत असे समजूनच नथूरामने महात्म्याच्या हत्येचा कलंक पत्करूनही त्या दोषाचे न्यायसंमत प्रायश्चित म्हणून फासावर चढण्याचे स्वीकारलेले आहे. 'मी ज्या माणसाची हत्या केली त्याला मी दया दाखविली नाही. मला स्वतःसाठी दयेची मागणी करण्याचा अधिकार नाही. मी स्वतः दयेची मागणी करीत नाही. माझ्यावतीने इतर कुणीही माझ्यासाठी दयेची भीक मागू नये. तसा प्रयत्नदेखील करू नये! हे नथूरामचे निश्चयी स्वराने उच्चारलेले शब्द ऐकून तेथे जमलेल्या अनेक प्रेक्षकश्रोत्यांनी स्वतः होऊन मृत्यूला सामोरे जाणाऱ्या खुनी माणसासाठी त्याकडे बघत अश्रू ढाळले होते!

नथूराम खाली बसला त्यावेळी कोर्टाची वेळ संपायला थोडा अवकाश होता. तेव्हा अभियुक्त करकरेचे वकील श्री. डांगे उभे राहिले–त्यांना उभे रहावेच लागले! ते जणू गुंगीतून शुद्धीवर आल्यासारखे वाटले. त्यांनी स्वतःला जागे करून बोलावयाला सुरुवात तर केली. पण ते काय म्हणत आहेत हे तेथे कोण ऐकत होते कोण जाणे! डांगे जज्ज आत्मचरणजींकडे बघून बोलायचा प्रयत्न करून त्यांचे ध्यान आकर्षित करण्याचा प्रयत्न करीत होते. जज्ज आत्मचरणजी डांग्यांकडे डोळे उघडे ठेवून पहात होते पण ते त्यांचे काही ऐकत आहेत असे मुळीच वाटत नव्हते. हे बघून डांग्यांनी कोर्टासमोर साक्षीदारांचे परीक्षणलेख एकामागून एक वाचायला सुरुवात केली. अधून मधून ते एखादी टीका सांगत. अशा रीतीने त्यांनी आलेला वेळ घालविला व कोर्ट उठले. आम्ही मंडळी बाहेर येताच डांगे मला म्हणाले. नथूरामने आपले आर्ग्युमेंट इतक्या लवकर का संपविले? नथूरामचे भाषण ऐकल्यावर मी स्वतः आर्ग्युमेंट करण्याच्या मनःस्थितीत नव्हतो. आणि त्यावेळी माझे आर्ग्युमेंट कोण ऐकून घेणार होते? त्यावर मी काय बोलणार? मी नुसते त्यांच्या पाठीवर हात ठेवून त्यांना धीर दिल्यासारखे केले!

दुसऱ्या दिवशी १७ डिसेंबरला सकाळी मात्र, श्री. डांगे सुरुवातीपासूनच अगदी फॉर्मात आल्यासारखे बोलायला लागले होते. ते आपल्या पक्षकार अभियुक्ताच्यावतीने तर्कनिवेदन सांगत नि मधून मधून संदर्भित घटनेविषयी किंवा साक्षीदाराविषयी काही तरी विनोदी टीका करून अभियोगपक्षाची टर उडवीत सगळ्या श्रोतृवर्गाला हसवीत. बिर्लाभवनामधील प्रार्थना प्रांगणाच्या पडवीमागे असलेल्या खोली नंबर तीनमधल्या रहिवासी नोकरसाक्षीदाराबद्दल बोलताना डांग्यांनी सांगितले की, अभियोगपक्षाच्या कहाणीप्रमाणे खोली नंबर तीनमध्ये राहणाऱ्या साक्षीदाराला विचारून एक अभियुक्त फोटो काढण्याच्या मिषाने त्या खोलीमध्ये गेला होता व तेथे त्याचा विचार महात्माजींवर जाळीच्या झरोक्यातून गोळी मारण्याचा किंवा हातगोळा फेकण्याचा होता. 'पण मग हा बेत सिद्धीला का गेला नाही? त्या अभियुक्ताने का आपले काम केले नाही?' असे विचारून त्यांनी गंभीर चेहऱ्याने सांगितले की, 'अभियुक्तांच्या इतक्या डोकेबाज बेताचा फज्जा कशामुळे झाला याचा विचार करताना मला आठवले की, त्या कमरा नंबर तीनचा रहिवासी साक्षीदार 'एकाक्ष' आहे नि याच शनिदेवाचे दर्शन उंबरठ्यावर त्या अभियुक्ताला घडले होते! पण या अनुभवावरून मला आणखी एक विचार मान्यवर न्यायाधीश महोदय, आपल्याकरवी भारत सरकारला कळवायचा आहे. विरोधी वातावरणात फिरावे लागणाऱ्या कॉंग्रेसी

## श्री. डांगे सुरुवातीपासूनच अगदी फॉर्मात होते

मंत्र्यांचे अंगरक्षक म्हणून असे एकाक्ष लोकच शासनाने नेमावेत; म्हणजे आपोआपच या शनिमहाराजांच्या दर्शनानेच मंत्र्याविरोधी कटवाल्यांचा असाच फज्जा होत राहील नि मंत्रीमहाशयांनादेखील धोका पत्करावा लागणार नाही. कशाला हवेत अहिंसावादी काँग्रेसी मंत्र्यांना पिस्तूल-बंदुकधारी अंगरक्षक? 'खर्च नको नि हिंसा नको!' सगळ्या कोर्टभर उसळलेल्या हास्याच्या लाटांनी डांग्यांच्या लटक्या गंभीरपणाचा वाळूचा किल्ला पार धुवून गेला.

डांगे आपल्या तर्कनिवेदनात बडगेचा उल्लेख पुष्कळ वेळी संदर्भाने 'बंडोपंत' या बडगेच्या कटाच्या कहाणीतल्या नावाने करीत पण लगेच म्हणत की, मी बडगेमहाशयांना दुष्ट, खुनी नाही म्हणत अं! छे छे छे! बडगे यांच्या 'बंडोपंत' या मराठी नावाचा अर्थ 'सभ्य बंडवाला' असा आहे. म्हणजे मवाळ राजकारणी बंड करणारा-खुनाबिनाशी त्याचा काय संबंध? या कथित कटामध्ये बडगे महाशयांनी स्वतःचे गुप्त नाव बंड्या न घेता 'बंडोपंत' घ्यायचे ठरविले ते उगीच नव्हते हे मला कळले! या सगळ्या विनोदातली माफीच्या साक्षीदाराच्या व्यक्तित्वावरील अनेकार्थी टीका सूज्ञ वाचकांना उघड करून सांगण्याची आवश्यकता नाही. डांग्यांनी कोर्टामध्ये माफीच्या साक्षीदाराची कहाणी कशी धूर्त, ढोंगी, खोटारड्याची आहे हे विशद करून दाखवले. डांगे आपल्या भाषणात गांधीजींचा नामोच्चार नेहमी, छातीला हात लावून नमस्कार केल्याच्या कृतीने 'पूज्यजी, महात्माजी, बापूजी, गांधीजी' असा मंत्र म्हटल्याप्रमाणे करीत. एखादे वेळी चार नामांपैकी केवळ दोन किंवा तीन नावेच मुद्दाम म्हणत नि मग चूक उमगल्याच्या चेहऱ्याने जीभ चावीत ना, ना, ची मान हलवीत, कानाचे पाळे धरीत व पुन्हा छातीला हात लावून चारी नावांचा पूर्ण मंत्रोच्चार करीत. डांगे यांनी अभियोगपक्षाच्या पुराव्यातील महिला साक्षीदार, मुंबईच्या कुमारी शांताबाई मोडक, मराठी चित्रपटतारका 'बिम्बा', कानपूर विश्रांतिकक्षाच्या प्रौढ कुमारी अंजेलिना कोलेस्टन, दिल्लीच्या बिर्लाभवनाच्या श्रीमती सुलोचनाबाई यांच्यावरही टीकास्त्र सोडले, तेदेखील त्यांच्या आवाजाची नक्कल करीत. तारकेचे मान वेळावणे, ख्रिस्ती प्रौढ कुमारिकेचे 'लावण्याच्या नव्हाळीचे' अंगविक्षेप नि बिर्लाभवनाच्या सेवक वर्गातल्या महिलेचे भित्रे भ्रूनर्तन हे सगळे काही अभिनयाने दाखवीत. त्यामुळे साक्षीदारांच्या कहाणीतला फुसका पुरावा सहज उघड होई. डांग्यांनी आपल्या विनोदाच्या धारेतून अभियुक्त आपटेचांनाही सोडले नाही. आपटेचाचे हवाईप्रवासात नथूरामच्या कॉफी प्रेमाच्या बादरायणी कारणाचे निमित्त करून हवाईसुंदरीशी 'घसट' वाढवून, त्या सुंदरीला दोघांही अभियुक्तांच्याविरुद्ध साक्षीदार बनविण्याच्या मंडनाने अलंकृत करणे याचे रसभरीत वर्णन केले व पुढे एवढे करूनच आपटे थांबला नाही, तर आपटेचाच्या आर्जवी बोलण्याने मुंबईच्या धनिकांकडून आपटेचाने पैसे गोळा करून त्या धनिकांना आपल्या साक्षीत रकमेच्या फुगवट्याबरोबर कहाणीचा फुगवटा वाढविण्याची संधी देण्याची, कशी कृतज्ञता दाखवली हे व्याजोक्तीने सांगितले आणि मुंबईच्या पोलिस अधिकाऱ्यांपैकी खुद्द एका अधिकाऱ्याच्या कुमारी कन्येला आपल्या लाघवी बोलण्याच्या जाळ्यात गोवून तिला तिच्या घरच्या-आधीच पोलिसांनी ध्वनिमुद्रणाचे यंत्र जोडलेल्या-दूरध्वनीवर 'तेरे इसलामका बंदा'च्या चरणाचा दूरध्वनी आळवून स्वतःला पोलिसांचा बंदी बनवून घेतले याचे वर्णन करून आपटेच्या इष्काची तारीफ करण्यासही डांग्यांनी कमी केले नाही. अशा रीतीने डांग्यांनी आपल्या पक्षकार करकरेच्या बचावामध्ये तर्कनिवेदनाच्या ढालेची आड घेऊन, विनोदी टीकास्त्राचा चौफेर हल्ला चढवून अभियोगपक्षाच्या पुराव्याला महाभारतीय युद्धाच्या शेवटी हताहतांच्या राशींनी भरलेल्या कुरुक्षेत्री रणमैदानाचे स्वरूप देण्याचे नाटच करून दाखविले. डांग्यांच्या त्या तर्कनिवेदनाच्या विनोदी विक्रमाचे यथातथ्य अथवा संपूर्ण वर्णन मला शक्य होत नाही याचेच वाईट वाटते.

डांग्यांनी आपले निवेदन केवळ तर्कनिवेदनाला विनोदाची धार देऊन श्रवणीय करण्यात वेळ घालवला असे नव्हते. त्यांनी कोर्टामध्ये आलेल्या पुराव्यावरूनच करकरेचे जे व्यक्तित्व रंगवून दाखविले ते मला वाटते की, फारच परिणामकारक होते. डांग्यांच्या म्हणण्याचा सारांश असा की, करकरे हा अहमदनगर शहरात हॉटेल चालवणारा धंदेवाईक पण हाडाचा कनवाळू. म्हणूनच आपल्या धंद्याचे निमित्त करून गरजूंना मदत करण्याचे, देशाकरता पैशाची व श्रमांची झीज सोसण्याचे त्याचे व्रत होते. अशा वृत्तीनेच मदनलाल अहमदनगरला आल्यावर करकरेने त्याला आसरा देऊन निर्वासितांच्या छावण्यात काम करायला मदत केली. मदतीचा हात करकरेने हैद्राबाद संस्थानच्या जनतेमध्ये चळवळ करणाऱ्या कार्यकर्त्यांनाही दिला व त्यातच राजकारणाच्या होळीत स्वतःची पोळी भाजून घेणाऱ्या बडगेला न ओळखून वारंवार मदत केली. हैद्राबादच्या हिंदूंना आपले जीवन असह्य करणाऱ्या मुस्लिम निझामी राजकर्त्यांविरुद्ध करकरेने पवित्रा घ्यावा याचे नवल नव्हते. पण त्याच तिकिटावर करकरेच्या मदतीचा लाभ घेऊन करकरेला गांधीजींच्या हत्येचा कटवाला ठरविण्याची जी कहाणी बडगेने बनविली, तिचे वाभाडे काढून डांगे यांनी कोर्टाला आवर्जून सांगितले की, आधी करकरे दिल्लीला गेला होता हेच मुळी संशयास्पद-केवळ एकदा पाहिल्याच्या ओळखीच्या साक्षीदारांचा-पुरावाच पुढे आला आहे. करकरेजवळ काही आक्षेपजनक वस्तु कुठेच कधीच सापडली नाही, करकरेने काही वावगे कृत्य केले असे कुणी म्हणत नाही. बिर्लाभवनमध्ये करकरे २० तारखेला संध्याकाळी गेला होता याचा काही पुरावा विश्वासयोग्य असा नाही. त्याला मुंबईला पाहिले-दिल्लीला पाहिले यापलीकडे काही ठोस पुरावा नसताना केवळ माफीच्या साक्षीदाराच्या पुराव्यावर करकरेला खुनाच्या कटाचा एक भागीदार असे ठरविणे अन्यायाचे आहे. ओळखीचे साक्षीदार सारे पढविलेले साक्षीदार आहेत. वरळीच्या पोलिस कार्यालयातला पोलिस पाहुणचार घेतलेले आहेत. बडगे तर काय! 'कवडीचादेखील विश्वास ठेवण्याच्या लायकीचा नाही असे म्हणणेच न्याय्यसंगत आहे' वगैरे. या तऱ्हेचे तर्कनिवेदनाचे भाषण डांगे यांनी २० डिसेंबरला दुपारपर्यंत केले. त्या दिवशी पाटण्याचे श्री. पी. आर. दास बॅरिस्टर ॲट लॉ सकाळपासूनच कोर्टात येऊन बसले होते. डांगे यांचे भाषण संपताच पी. आर. दास सावरकरांच्यावतीने तर्कनिवेदनाचे भाषण करण्यास उभे राहिले.

तसे म्हटले तर पी. आर. दास हे १८ डिसेंबर ४८ ला शनिवारी तिसऱ्या प्रहरी लालकिल्ल्यातील कोर्टात येऊन हजेरी लावून गेले होते. मी रविवारी सकाळी भेटायला त्यांच्याकडे जावे अशी सूचना

मला मिळाली होती. म्हणून मी दुसरे दिवशी सकाळी ते राहात असलेल्या हॉटेलमध्ये १० वाजता गेलो. तेथे मला त्यांना त्यांच्या शयनागारातच भेटावे लागले. कारण ते रात्रीच्या पोशाखात अंथरुणावरच उशागिर्द्यांना टेकून सिगरेटचा धूर सोडीत वर्तमानपत्र वाचीत होते. जवळच शाळकरी मुलांच्या कामाच्या ४०-६४ पानी वह्या चार-आठ पडल्या होत्या. ते वाचीत असलेल्या वर्तमानपत्रावर ठिकठिकाणी लाल-निळच्या पेन्सिलीने खुणा केलेल्या मी पाहिल्या. मी तेथे जाताच किंचित उठल्यासारखे दाखवून त्यांनी माझी ओळख करून घेतली व मला प्रश्न विचारायला सुरुवात केली. कोर्टाबद्दल, जज्ज महोदयांबद्दल, श्री. दप्तरी व त्यांच्या सहकाऱ्यांबद्दल, अभियुक्तांबद्दल, बचावपक्षाच्या वकिलांबद्दल, सावरकरांबद्दल, अभियोगातल्या साक्षीदारांबद्दल, पुराव्यातल्या कागदपत्रांबद्दल, पुराव्यातल्या काही काही उल्लेखांबद्दल, अगदी सावरकरांच्या विरुद्ध झालेल्या पुराव्याबद्दल तुमचे काय मत आहे, सावरकरांचे वकील म्हणून तुम्ही का काम केले नाहीत, येथपासून ते शंकर किस्तय्याला दिलेली दुभाषी कुमारी कमलम्मा कोण आहे, ती पोलिसांच्यावतीने हेरगिरी तर करीत नाही ना, येथपर्यंत किती तरी प्रश्न दासमहाशयांनी मला विचारले. मी यथाशक्ती-यथामती त्यांना उत्तरे दिलीही. काही देण्याचे टाळलेही. कारण मला हे कळेना की ते, मला समजतात तरी काय ? मी ग्वाल्हेरसारख्या ठिकाणचा नवागत व्यवसायी नि ते सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिभाषक ! मी काय त्यांना सांगणार नि त्याची किंमत किती ? पण शेवटी सगळचाच ज्येष्ठ वकिलांची नवशिक्या वकिलांशी बोलण्याची, वडिलकीच्या अधिकाराची जी भाषा असते, त्याचाच प्रयोग ते माझ्यावर करीत आहेत असे समजून मी स्वतः हरभऱ्याच्या झाडावर चढण्याचे कटाक्षाने टाळीत त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. माझ्या काही बोलण्यावरून त्या वह्यामध्ये ठिकठिकाणी त्यांनी काही खुणा केल्या-काही लिहून घेतले. वकिलाने आपल्या 'मिसले'त लिहावयाचे मुद्दे अशा विषयवार वेगळ्या लिहिलेल्या वह्यांमधून लिहिण्याची कल्पना मला आवडलीही, तरीपण त्या वेळी 'शाळकरी मुलांच्या वहीत माझे मत लिहून घेण्याच्या कृतीने मला ते मूर्ख ठरवीत आहेत की ते स्वतःच मूर्ख आहेत' असा गंभीर प्रश्न मला पडला होता हे मी कबूल करतो !

तेथे दासबाबूंच्या दिमतीला एक ३०-३५ वर्षांचा माणूस 'चुस्त पायजमा-अचकन-साफा'च्या वर्दीत जवळच वावरत होता. तो त्यांचा नोकर होता, की खानसामा, की अर्दली, की कारकून, की नवशिका तरुण वकील होता, हे मलाही कळले नाही. नोकर म्हणायला त्याचा चुस्त वेश खचितच वाव देत नव्हता. पण तेथे त्या 'मुनेखाने' (हे त्याचे नाव) माझ्यासमोर काय नि कोणती कामे केली नाहीत म्हणून सांगू ? त्याने मला बसायला खुर्ची देत ती झटकून दिली, दासबाबूंच्या सिगरेटच्या राखेचे तबक स्वच्छ केले, वकीलमहाशयांनी इंडियन लॉ रिपोर्टरचा एखादा कोर्ट, वर्ष, पानाचा हवाला देताच ते पुस्तक एका मोठ्या ट्रंकेमधून काढून त्यात खुणेची चिठ्ठी ठेवीत बाबूजींच्या हातात दिले. बाबूजींनी काही लिहून घ्यायला सांगताच ते उचित ठिकाणी लिहून घेतले. जवळ ठेवलेल्या भाराभर ताज्या दैनिक वर्तमानपत्रांवर नजर फिरवून त्यावर काही ठिकाणी लाल-निळचा पेन्सिलीने खुणा केल्या नि ते बाबूजींनी मागताच त्यांच्या हातात दिले. त्यावेळी आलेले दूरध्वनी-फोनकॉल-घेतले, प्रश्नांची उत्तरे देऊन बाबूजींना भेटण्याच्या वेळा निश्चित केल्या, आतल्या खोलीत जाऊन गरम चहाचे तबकही त्याने तयार करून आणले ! दासबाबूंसारख्या व्यस्त वकिलाला मिळणारी अशी हरकामी मदत पाहून मला त्यांचा हेवा वाटला नि आपणाला अशी मदत मिळाली तर-अशी शेखमहमदी स्वप्नेही माझ्यासमोर तरळली! या सगळ्या परिहासाचा पसारा बाजूला सारून सांगायचे एवढेच की, दासबाबूंच्याजवळ मी जवळजवळ तीन तास होतो व त्यांच्या विविध वजनी व विविधरंगी प्रश्नांची यथायोग्य उत्तरे देत होतो. दासबाबूंच्या एकंदर बोलण्यावरून ते हे काम एक धंदेवाईक म्हणूनच करीत आहेत-अगदी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या वतीने असले तरी, त्यामध्ये भावना, ध्येय, हिरीरी, तळमळ वगैरे कुछ नही ! हे दासबाबू योगी अरविंदबाबूंच्यावतीने काम करून वकिली आयुष्याची सुरुवात केलेल्या देशबंधू चित्तरंजनदासांचे धाकटे बंधू खरेच आहेत का, असा प्रश्न पडावा, इतके पी. आर. दासमहोदय 'अलिप्त' वाटले ! ह्या दासबाबूंचा एकच गुण माझ्या लक्षात राहिला तो म्हणजे वकिली वक्तव्यातला खोचक विनोद ! शेवटी 'आपल्या सेवेसी जेव्हा आज्ञा होईल तेव्हा येईन' असे सांगून मी त्यांचा निरोप घेतला.

दिनांक २० डिसेंबरला सोमवारी श्री. डांगे यांचे भाषण संपल्यावर दासबाबूंनी बोलावयास सुरुवात केली, ती एका 'दे धक्का' विधानाने ! त्यांनी कोर्टाला प्रथमच सांगितले की, 'मान्यवर महोदय, मला क्षमा करावी आपण. पण मला हे सांगायला हवे की, अपराधासंबंधी अभियोगात पक्षसमर्थन करण्याची ही माझी वकिलीच्या व्यवसायातली पहिलीच वेळ आहे !' ते ऐकून माझ्या डोक्यात भर्रकन् विचारचक्र फिरले की, दासबाबूजी आता कुणाला मूर्खात काढणार ? स्वतःला की न्यायाधीशाला, की अभियोगपक्षाला, की सावरकरांच्या विरुद्ध आरोपपत्र दाखल करणाऱ्या सरकारला ? पण बाबूजींचा रोख कोणावर आहे, याचा अंदाज मला येऊ लागला. कारण दुसरे विधानही अशा मासल्याचे होते. 'दे धक्का' नाहीतर 'टवाळीचे !' कारण दासबाबूजी म्हणत होते, 'मी तर एक अधिक अंशी व्यवहारवादाचे काम करणारा वकील आहे. मला आपल्यापुढे विचार-निर्णयार्थ असलेल्या प्रकरणाचे स्वरूप तसेच दिसते आहे. जणू आपल्यापुढे एक लबाड वादी येऊन त्याने आकसाने एखाद्या निर्धन नि निस्सहाय प्रतिवादीविरुद्ध खोटाच वाद उभा करून त्यामध्ये आपल्याकडून साक्षीला शपथेवर मिथ्या बोलणाऱ्याला उभे करून सांगावे की, 'अमुक दिवशी प्रतिवादीला मी असे काही वादीला म्हणताना ऐकले की, ज्याचा अर्थ तो प्रतिवादी वादीचे देणे कबूल करून त्याचे देणे चुकविण्याचे वचन देत आहे असा मी समजतो !' या दासबाबूंच्या विधानाने जो काही प्रकाश आमच्यासारख्या मठ्ठ डोक्यामध्ये पडायचा तो पडला, पण त्याने जज्ज आत्मचरणजींच्या चेहऱ्यावर

स्मित झळकलेले पाहून आमच्या डोळ्यांचे पारणे फिटले ! कारण जज्ज आत्मचरणजींचे कोर्टात न्यायाधीशाच्या खुर्चीवर बसून हसणेही आम्हाला पर्वणीच होती. दासबाबूंच्या आरंभापासूनच्या एकेक विधानाचा रोख अचूकपणे कुणाकुणावर होता, हे एका क्षणात स्पष्ट झाले. दासबाबूंची तर्कनिवेदनाची भाषा अगदी शब्दन् शब्द सावरकरांनी एकदा मजजवळ बोलून दाखवलेल्या पद्धतीची होती हे मला आठवून गंमतही वाटली होती. अगदी साक्षीचे 'कर्ण परंपरायाश्रुतं' पद्धतीचे, पहिली, दुसरी श्रेणी वर्गवारीचे तर्कविच्छेदन. 'मला हे खरोखरीच कळत नाही की, माझ्या पक्षकाराविरुद्ध हा अभियोग उभा करण्याजोगे शासनाला काय मिळाले होते ?' असे वारंवार दासवाबूंनी निरनिराळ्या संदर्भांत निरनिराळ्या शब्दांत सांगितले आणि शेवटी तर समारोप करताना दिलेला धक्का पण उपहासाचा उच्चांक होता असे म्हणावयास हवे. दासबाबूंनी शेवटी अगदी नम्रपणे पण डोळे मिचकावीत म्हटले, 'अभियोगपक्षाने न्यायालयासमोर आणलेल्या पुराव्यावर विचार करतानां मला आता वाटत आहे की, कुठे अभियोगपक्षाने दिलेल्या २७५ साक्षीदारांच्या नामसूचीमधले केवळ १४९ साक्षीदार कोर्टापुढे आणून बाकीचे १२६ साक्षीदार खुशाल सोडून दिले, त्यावेळी कामाच्या व्यापामुळे माझ्या पक्षकाराविरुद्ध असलेला एखाददुसरा महत्त्वाचा साक्षीदार तर चुकून सोडून दिला नाही ना ?' आणि दासबाबूंनी मान ताठ करून जज्ज आत्मचरणजींना म्हटले, 'मान्यवर महोदय, तो साक्षीदार अजूनही अभियोगपक्षाने न्यायालयापुढे आणावा. मी त्याची वाट बघेन नि मान्यवर महोदयांनी आज्ञा देताच आपल्या सेवेशी धावून येईन !' असे म्हणून त्यांनी अगदी मुजरा करण्याच्या आविर्भावाने न्यायाधीश महोदयांपुढे अभिवादन केले ! अगदी शेक्सपीअरच्या ज्युलिअस सीझर नाटकातल्या ब्रूटस, मार्क अँटनीच्या भाषणांची आठवण व्हावी असाच सारा खाक्या दासबाबूजींचा होता ! दासबाबूजींनी २० डिसेंबरला सोमवारी दुपारी सुरू केलेले तर्कनिवेदनाचे भाषण बुधवार दिनांक २२ डिसेंबरला कोर्टाची वेळ संपण्यापूर्वी सुमारे ४० मिनिटे अगोदरच संपविले नि भाषण संपताच 'मला इतर काही काम आहे, क्षमा असावी' म्हणून न्यायाधीश महोदयांना व अॅडव्होकेट जनरलांना अभिवादन करून कोर्टातून लगेच प्रयाण केले. त्यांच्यानंतर भाषण करायचा क्रम मदनलालचे वकील श्री. बॅनर्जींनी घेतला होता. ते उभे राहिले नि उरलेली ३०–३५ मिनिटे आरंभीचे नमन आळविण्यातच घालविली नि कोर्टाची वेळ संपताच कोर्ट उठले.

दुसरे दिवशी २३ डिसेंबरला गुरुवारी श्री. बॅनर्जींचे तर्कनिवेदनाचे भाषण अगदी अभियोग कार्यवाहीत असायला पाहिजे तसे चालू झाले होते. ते अभियुक्त मदनलालच्यावतीने बोलत होते. अवश्य पण मदनलालसंबंधी साऱ्या घटना आपटे, नथूराम नि करकरेच्या संबंधातल्या घटनांच्या–विशेषेकरून २० जानेवारीपर्यंतच्या घटनांच्या–बरोबरीने एकमेकांत गुंतलेल्या अशाच होत्या. करकरे मदनलालचा आश्रयदाता, साहाय्यकर्ता होताच, तसाच थोडाबहुत आपटेपण मदनलालचे कौतुक नि लाड करणारा होता. परंतु मदनलाल आपल्या जवानीच्या अननुभवी नि उसळत्या उत्साहाच्या भरात बंदुकीच्या दारूची हत्यारे व स्फोटक वस्तूंची विक्री करणाऱ्या छलकपटी, मायावी बडग्याच्याही नादी लागलेला होता. हे सांगून बॅनर्जींनी मदनलालच्या पोरक्या जीवाच्या वेदनांचे, वणवण फिरायला लावणाऱ्या निर्वासिताच्या जीवनकलहाचे, एकाकीपणाच्या भरात वाटेल त्याजवळ मन मोकळे करून निवारा शोधू पहाणाऱ्याचे वर्णन, पुराव्यात आलेल्या साक्षीदारांच्या कथनावरूनच दाखविले होते. करकरेच्या आश्रयाला असताना अहमदनगर येथील निर्वासितांच्या छावणीमधून जोरदार निदर्शने करण्याचे तंत्र मदनलाल शिकला होता. याच नेतेगिरीच्या नशेमध्ये महात्मा गांधींच्यासमोर खुद्द दिल्ली येथे जाऊन जोरदार निदर्शने का करू नयेत या कल्पनेने मदनलालच्या मनात घर केले– कुणीतरी करून दिले नि हा कुणीतरी बडगेच असावा असे बॅनर्जींनी न्यायालयासमोर मांडले. एरवी मदनलाल कुणाबरोबर दिल्लीला गेला याचा काहीच पुरावा नव्हता तरी तेथे मदनलालला बडगे भेटला व मदनलालला बडगेजवळची स्फोटक दारूची 'गन कॉटन स्लॅब' लहानशीच पण मिळाली. एक हातगोळाही मिळाला. जशी स्फोटक दारूची वीट हा बॉम्ब नव्हे, तो दगडवीटांची इमारत पाडण्याचा सुरुंग आहे तसेच हातगोळा हा काही आकाशात भिरकावून दूरच्या जमावावर टाकण्याचा बॉम्ब नव्हे. तो समोर उभ्या ठाकणाऱ्या माणसावर फेकण्याचा मिनी बॉम्ब आहे असे म्हणावे. त्यातसुद्धा स्फोटाच्या माऱ्याशिवाय शरीरावर जखमा करणारे पोलादी तुकडे खिळे आदी नसतातच. त्याच्या आमरणाचे तुकडेच जी काही इजा करतील तीच घातक ठरायची. असे जर होते, तर महात्माजींच्या प्रार्थनेला बसायच्या जागेपासून बऱ्याच अंतरावर असलेल्या एका लहानशा आवाराच्या भिंतीजवळ उघड्यावर ठेवून उडवलेली गनकॉटन स्लॅब–सुरुंगाच्या दारूची वीट ही 'मनुष्यवध' करण्याच्या बेताचे–इराद्याचे–सूचक कसे होऊ शकेल ? फारतर गैरफायदा स्फोटक वस्तू बाळगणे व तिचा स्फोट करणे, एवढ्या गुन्ह्याचा दोषी मदनलाल होऊ शकेल. तसेच मदनलालच्या खिशामध्ये सापडलेल्या हातगोळ्याचे. जर तो हातगोळा जमावावर, समोर असणाऱ्या माणसावर फेकायचा इरादा मदनलालचा होता, तर मदनलाल प्रार्थना-सभेच्या आवाराच्या बाहेर कशाला उभा राहिला ? तेथे उभे राहून झालेल्या स्फोटाकडे बघत उभा राहून स्वतःला पोलिस हवालदाराने पकडले तरी, मदनलालने हातगोळ्याला हात लावला नाही. तो बाहेर काढून कुणावर फेकला नाही, एकट्या पोलिसाकडून पकडला गेल्यावर त्याच्या हातून सुटायचा प्रयत्नही केला नाही, याचा अर्थ काय होतो ? येथे श्री. बॅनर्जींनी कोर्टासमोर आलेल्या वीस जानेवारीच्या संध्याकाळी पोलिसठाण्यावर लिहिल्या गेलेल्या अभियोग प्रदर्श क्र. ३५ व प्रदर्श क्रमांक २४७ या दोन्ही लेखांकडे न्यायाधीशांचे ध्यान आकर्षित केले. त्या दोन्ही लेखांवरुन मदनलालविरुद्ध 'स्फोटक दारूची हत्यारे बेकायदा बाळगणे, त्यांपैकी सुरुंगाच्या विटेचा स्फोट उघड्यावर करणे' या गुन्ह्यांचा दोष सिद्ध होतो. पण त्यामध्ये मनुष्यवध करण्याचा–विशेषेकरून महात्माजींच्या हत्येचा–कट किंवा इरादा कसा सिद्ध होतो ? असा बॅनर्जींनी प्रश्न विचारला होता. मदनलाल प्रार्थनासभेच्या प्रांगणाजवळ मोटरकार नंबर डी. एल. एच. ९४३५ या वाहनाने आल्याचे अभियोग प्रदर्श क्रमांक २४७ मध्ये लिहिले होते व हे पाहणाऱ्या दोन व्यक्तींची नावेही मनोहरसिंग व गुरुचरण अशी नावपत्त्यांसहित लिहिली होती व त्या गाडीत आणखी तीन

माणसे होती असेही लिहिले होते. बडगेच्या पुराव्यावरून तो या गाडीने–९४३५ ने बिर्लाभवनात आला नव्हता. मग पोलिसांनी या गाडीचा चालक ड्रायव्हर, त्या गाडीचा मालक, त्या गाडीचे आणखी तीन प्रवासी यांना तर साक्षीत आणले नाहीच, पण त्या नावनिशी-सहित पत्ता सांगणाऱ्या दोन मनोहरसिंग व गुरुचरण यांना का साक्षीत आणले नाही ? हे काय गौडबंगाल आहे ?, असा प्रश्न बॅनर्जींनी विचारला. या दोन्ही प्रदर्श प्रथम-सूचना-लेखामध्ये खुनाच्या कटाचे अवाक्षर नव्हते. कुणाच्या प्रोत्साहनाने किंवा बरोबर दारूच्या विटेचा स्फोट केल्याचे लिहिले नव्हते. पोलिस अधिकाऱ्याच्या पुराव्यावरून हे सांगितले होते की, मदनलालच्या सांगण्यावरून त्याचे 'कुणी' साथीदार मरीना हॉटेलमध्ये उतरले होते असे कळले, म्हणून तेथे जाऊन पाहिले तर, मरीना हॉटेलमध्ये कोणी सापडले नाही. मदनलालकडून मरीना हॉटेलमध्ये उतरलेल्या साथीदारांचा पत्ता लागला नाही, नावे कळली नाहीत. पण करकरेचे नाव तर मदनलालला माहीत नव्हते असे नाही. मग त्याचा मागोवा पोलिसांनी ३० जानेवारीपर्यंत कसा घेतला नाही ! असे नाना प्रश्न विचारून बॅनर्जींनी मदनलालच्याविरुद्ध २० जानेवारीच्या दिवशीच्या पुराव्या-वरून महात्माजींच्या खुनाच्या कटाचा किंवा खुनाचा प्रयत्न केल्याचे मुळीच सिद्ध होत नाही, हे परोपरीने सांगितले नि यामुळेच पोलिसांनी मदनलालच्या दुसऱ्या एका साहाय्यकाचा–मुंबईच्या प्रोफेसर जैनमहाशयांच्या पुराव्याचा उल्लेख केला व त्यांच्याबरोबरीने साक्षीदार माननीय मोरारजीभाई व अंगदसिंग यांच्या पुराव्याबाबत बॅनर्जींनी आपले भाषण चालू केले.

या साक्षीदार त्रयीबद्दल श्री. बॅनर्जींच्या तर्कनिवेदनाचे सूत्रही पोलिसांच्या चौकशीच्या हालचालींना व पुराव्यात आलेल्या कागद-पत्रांना धरून होते. बॅनर्जींनी प्रोफेसर जैन यांचे नाव माननीय मोरारजीभाईंनी पोलिसांना ३० जानेवारीपर्यंत सांगू नये या घटने-बद्दल विलक्षण आश्चर्य दाखवून म्हटले की, केवळ हीच माननीय गृहमंत्री मोरारजीभाईंची त्रुटी त्यांच्या नि प्रोफेसर जैन व अंगदसिंग यांच्या साक्षीबद्दल अविश्वास दाखविण्यास पुरेशी आहे. महात्मा गांधींचा खून करण्याचा कट होता असे मदनलालकडून माहीत होऊन प्रोफेसर जैनांनी ते वृत्त मोरारजींना २० जानेवारीच्या बॉम्ब-स्फोटाच्या घटनेनंतर सांगावे हेच आधी विलक्षण. पण त्या प्रोफेसर-महाशयांचे नाव मोरारजीभाईंनी २ फेब्रुआरीपर्यंत पोलिसांना सांगितले नाही, यावरून 'ही सारी कहाणी खोटी आहे' असे म्हणण्यावाचून गत्यंतर नाही असे बॅनर्जींनी ठासून सांगितले. बॅनर्जींच्या तर्कनिवेदनाची पद्धती, पुराव्यात आलेली घटना घेऊन त्या घटनेचे पर्याय किती निघतात व त्या सगळ्या पर्यायांच्या दृष्टीने पोलिस चौकशीचे काम कसे अपुरे, एक विवक्षित हेतू मनात धरून केलेले व पुराव्याची लपवालपवी, बनवाबनवी करणारे आहे, पोलिसांचे साक्षीदार साध्या घटनेला घेऊन स्वतःच्या कल्पनेने कसा राईचा पर्वत करतात हे विशद करून दाखवायचे, अशी होती व अशा पद्धतीने बॅनर्जींनी दिनांक २२ डिसेंबरला संध्याकाळी सुरू केलेले तर्कनिवेदनाचे भाषण दिनांक २३, २४ व नाताळच्या व रविवारच्या सुटीनंतर दिनांक २७ ला मधल्या विश्रांतीनंतर संपविले. बॅनर्जींच्या भाषणाचा सगळा वृत्तान्त देणे माझ्या आवाक्याबाहेरचे आहे. मी एवढेच म्हणेन की, लालकिल्ल्यात चाललेल्या अभियोगात न्यायालया-मध्ये अपराधासंबंधी प्रकरणाचा विचार करायला हवे तसे कायद्याचे वातावरण उभे करणे अती आवश्यक होते ते बॅनर्जींनी फार योग्य रीतीने केले. बॅनर्जींनी आपले भाषण विश्रांतीच्या मध्यंतरानंतर मध्येच जरी संपवले तरी, मला त्याविषयी काही जड वाटले नाही नि खुशीने माझे भाषण आरंभ करायला मी उभा राहिलो. माझी तयारी अशी झालीच होती. त्या जोडीला माझ्या अंतर्मनात जज्ज आत्मचरणजींकडून चार ऑक्टोबर १९४८ रोजी विश्रांतिकक्षामध्ये मला जे माझ्या बचावाबद्दल सहानुभूतीने विचार करण्याचे आश्वासन मिळाले होते त्याचे शब्दही होते. मी विश्वस्त मनाने माझे तर्क-निवेदनाचे भाषण करायला उभा राहिलो.

[ क्रमशः ]

पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

लेखक
व. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

पुस्तके

# रंजक कथांचा एक संग्रह

सौ. कविता नरवणे यांच्या तेरा कथा या संग्रहात बांधलेल्या आहेत. मराठी कथेने आज पुष्कळच नवेनवे अनुभव धुंडाळलेले आहेत आणि त्या अनुसार नवेनवे आकृतिबंधही तिच्यात निर्माण झालेले आहेत. कविता नरवणे यांच्या कथांतील अनुभवांनाही भिन्नविभिन्न परिमाणे लाभलेली आहेत, पण त्यांचा गाभा मात्र फारसा नावीन्यमय कधी बनलेला नाही. आविष्काराची वेगवेगळी तंत्रे त्यांनी वापरून पाहिलेली असली, तरी स्वतंत्रतेपेक्षा सुतंत्रतेच्या प्रतिभासाधनाची छाप त्यांच्या कथेवर विशेषत्वाने जाणवते. आतून फुटून-उमलून आलेल्या कथारूपापेक्षा परिणामाचा एक समरप्रसंग निश्चित ठरवून त्याच्या मापात कथाविष्कार बेतणे त्यांना अधिक मानवत असावे.

मात्र हे बेतणे सर्वत्र मोठे आकर्षक शैलीने साधले गेले आहे, हे निश्चित. कथेच्या बांधणीचे कविताबाईंचे आडाखे अचूक असल्यामुळे त्यांच्या कथांना रचनेचा सुंदरसा डौल प्राप्त होतो. निवेदनातील सहजरम्य गतीमुळे आणि भाषेच्या मुलायम विलासामुळे या सुडौल कथा मोठ्या लोभस वाटतात.

'हॅलो ऽऽ ट्रंक बुकिंग ?' ही पहिलीच कथा (जिचे नाव या संग्रहाला दिले गेले आहे.) फार उत्कट कल्पनामय अधिष्ठान असलेली आहे; आणि ती अगदी काव्यात्म आविष्कार घेऊन फुलते. तिच्या रचनेतील नावीन्य कथाबीजांच्या सांकेतिकतेला विसरायला लावते आणि संवादांचा गतिमान चटकदारपणा कथेतील भावनांचे दर्शन कृत्रिम बनू देत नाही. 'आता पुन्हा मला फोन केला नाहीस तरी चालेल. फक्त एकदाच फोन कर, तुझं लग्न ठरेल तेव्हा. त्यावेळी तुझी मम्मी येईल आणि कधीतरी तिनंही पाहिलेलं स्वप्न बोहल्यावर चढलेलं पाहून तृप्त होईल–' या हळव्या उत्कट भावदर्शनापाशी कथा संपते ती मनात तरंगवलये निर्माण करीतच.

बऱ्याचशा कथांतील व्यक्तित्वदर्शन सरळधोपट आहे. एखाद्या व्यक्तीच्या स्वभाववैशिष्ट्यांवर व्याख्यानवजा भाष्य करण्याची आणि तसे भाष्य करताकरता कथेचे बीजही (अनवधनाने ?) सरळ सांगून टाकण्याची हौस लेखिकेला आहे. पात्रांच्या मनातील क्रियाप्रतिक्रियांचे साधे सरळ अन्वयार्थ आणि सुसंगत कार्यकारणभाव तिला लावता येतात. परंतु तरीही कथापरिपोष सजगपणाने करून उत्कटतेच्या डोहात सूर मारणारा शेवट करण्याची किमया तिला साधलेली आहे.

'कोणा दुर्वासानं या घराला शापलं आणि पाहता पाहता नियतीच्या मुठीतून ओघळणाऱ्या मोत्यांचे अश्रू बनले...' 'दिवाकरच्या बायकोनं एका कोचावर फतकल मारली. ती पुन्हा उठणं म्हणजे नांगरलेलं गलबत पुन्हा हाकारण्याजोगं होतं...' 'तशी मनोरमा काही वाईट नव्हती. सुरुवातीला अगदी कोवळ्या काकडीसारखी वाटायची. पण या काकडीचं खरबूज कधी झालं त्याचा पत्ताच लागला नाही...' 'स्वच्छ शुद्ध अक्षरांत आयुष्याचा ग्रंथ लिहिला गेला होता. कुठेही खाडाखोड नव्हती की अदलाबदल नव्हती...' अशी चमकदार अलंकारयोजना करीत कविताबाई कथा सांगू लागल्या की, त्यांचे निवेदन आपोआप आकर्षक बनू लागते. कारण ही अलंकारयोजना एकाच वेळी कथानकाची गती आणि भावनांचा स्पर्श सांभाळू शकते. कथेतील प्रसंगांचा 'मूड' ती तोलून धरते, तशीच त्याला दृश्यमानही बनविते. त्यात नर्म विनोदही असतो आणि नेमकेपणाही असतो. पुन्हा अलंकारिकतेचा अतिरेकही कटाक्षाने टाळून बोजडपणा व कृत्रिमपणाचे धोकेही कविताबाईंनी टाळण्याचा प्रयत्न केला आहे.

कविता नरवणे यांच्या कथेला विरोधचित्रांचे फारच आकर्षण आहे. 'रामशास्त्री' या कथेत आरोपीची मान ताठ होणे आणि रामशास्त्रीचा कणा वाकणे ही कथेची प्रभावी परिणती, 'अश्वत्थामा' या कथेत आकाशात स्वच्छंदपणे विहार करणाऱ्या पाखराकडे पाहत त्यांच्या गतीने वेडावून जाणाऱ्या पांगळ्या आनंदाच्या वृत्तीचे चित्रण, 'रामदास' या कथेत दिवाकरच्या बायकोबद्दल अरुणाचा झालेला अपेक्षाभंग सांगताना दिवाकरच्या बायकोचे रंगवलेले 'पात्र', 'कुत्र्याचे शेपूट' या कथेत मालतीबाईंच्या मनाला आलेल्या स्मशानवैराग्याची क्षणिकता दाखविण्यासाठी त्यांच्या मनाच्या बदललेल्या स्थितीचे आंदोलन... इत्यादी अनेक ठिकाणी या ना त्या निमित्ताने त्यांनी प्रभावी विरोधचित्रे रेखाटलेली आहेत. विरोधचित्रांच्या रचनेशिवाय नरवणेबाईंची कथा आकारच घेत नाही, कारण उत्कट नाट्यनिर्मितीचे त्यांचे ते हुकमी हत्यार आहे. काही ठिकाणी विरोधदर्शनात थोडासा अतिरेक झालेला असला आणि त्यामुळे कृत्रिमता आलेली असली, तरी बहुधा या विरोधचित्रांनी प्रभावी नाट्य उभे करण्यास मदत केलेली आहे.

या तेरा कथांतून विविध व्यक्ती आणि त्यांच्या विविध समस्या कविता नरवणे यांनी जिवंत बनविल्या आहेत. दोन्ही वेळा लाल भात खाऊन कशीबशी पोटाची खळगी भरणाऱ्या कुटुंबातल्या केशवला आपल्याला मन नामक काही चीज आहे याचा शोध लावणे अशक्य असते. ('मोर्चा'). तक्रार करायची असते हेच त्याला माहीत नसते. आयुष्यात एकदाच त्याला झिंग चढते आणि स्वतःलाही नकळत त्याचा सारा मोहराच बदलून जातो. दैनंदिन जीवनाच्या बेचवपणाला कंटाळलेले अण्णा अनेक कोंबड्यांत डौलाने फिरणाऱ्या गिरेबाज कोंबड्याप्रमाणे एकच दिवस वागतात. ('थ्रिल'). पण त्यांची शहाणी व्यवहारी बायको त्यांच्या मस्तीचा फुगा फटकन फोडून टाकते. सारी शक्ती विचारावर खर्च झाल्यामुळे भावनांची हाक रेखाला ऐकायला येत नाही. ('बुक क्रिकेट') सगळ्यांची टेहळणी नि गैरसमज पत्करून ती वाईटाचाच विचार करीत यशस्वी जीवनाचे आडाखे बांधत राहते. आपल्या नवऱ्याच्या प्रेयसीच्या मार्गातली धोंड बनल्याबद्दल वृंदा स्वतःचाच द्वेष करू लागते. ('मोहिनीयुद्ध') अशा वैचित्र्यपूर्ण व्यक्ती नि त्यांचे वैचित्र्यपूर्ण जीवनसंघर्ष या कथांतून भेटतात. परंतु या सर्व संघर्षांचे आकर्षक निवेदन करून कथा खुलविणे हा एकच साधा हेतू लेखनात गुंफलेला असल्यामुळे, मी प्रारंभी म्हटल्याप्रमाणे, कथांच्या रूपांत वैचित्र्य आले तरी, त्यांचा गाभा नावीन्यमय बनत नाही.

आकर्षक निवेदन, बांधेसूद रचनात्मकता, भाषाशैली, चटकदार संवाद या लेखनगुणांमुळे या कथा रंजक झालेल्या आहेत. अर्थात त्यात तरतमप्रकार आहेतच. 'तीन तास एक निर्णय' सारखी छान सुरेख कथा आपल्या प्रकृतीप्रमाणे सहज फुलत गेलेली आहे, तर 'आणि बनिहाल लाजला !' यासारखी कथा भाष्य, तत्त्वज्ञान, यांच्या जुगलबंदीत सहजसुंदर मोहकपणाकडून कृत्रिमतेकडे नकळत झुकत गेलेली आहे.

तथापि रंजकता हा प्रत्येक कथेत प्रकर्षाने असलेला ठळक गुण आहे !

—निशिकांत मिरजकर

'हॅलो ऽ ट्रंक बुकिंग ?'
सौ. कविता नरवणे
सुपर्ण प्रकाशन, पुणे,
पृष्ठे १३५, किंमत बारा रुपये.

# मराठवाड्याची संशोधनातील प्रगती

'मराठवाडा संशोधन मंडळ वार्षिक' ह्या नावाने प्रसिद्ध झालेल्या शोधलेख-संग्रहांच्या दोन खंडांचा परिचय येथे करून द्यावयाचा आहे. पहिला खंड १९७४ चा व दुसरा १९७५चा आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील शिरूरताजबंद ह्या गावच्या राधाकृष्ण रामचंद्र प्रकाशनाने हे दोन्ही खंड काढले आहेत. दोन्ही खंडांच्या संपादनाचे कष्टाचे काम, पं. सु. ग. जोशी ह्यांनी केले असून त्यांनी मराठवाड्याची ही जी संशोधनातील प्रगती घडवून आणली, त्याचे श्रेय पूर्णपणे त्यांना दिलेच पाहिजे.

दोन्ही खंडांमध्ये मिळून सुमारे साठ लेख आहेत. त्यांमध्ये वैदिक वाङमय, पुरातत्त्व, मराठी साहित्य, भाषाशास्त्र, इतिहास ह्यांसारख्या विषयांवरील मौलिक लेखांचा समावेश आहे वैदिक वाङमयातील लेखांपैकी पं. लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांनी वैश्विक राज्य आणि देवांचे सामुदायिक राजेपण ह्या विषयाचा ऋग्वेदाच्या आधारे परिचय करून दिला आहे (७५). डॉ. थिटे ह्यांच्या 'शुक्लयजुर्वेद आणि यातुधर्म' ह्या लेखात शुक्लयजुर्वेदातील मंत्रांचा कृत्रिम रीतीने यातुधर्मात्मक विधींमध्ये विनियोग कसा सांगितला आहे त्याची चर्चा आहे (७४). गो. के. भटांनी उपनिषदातील विचारवंत, बाह्य जगातील सत्याचा आणि आंतरिक सत्याचा शोध घेऊन व्यष्टी समष्टी ह्यांचे ऐकात्म्य कसे शोधत त्याचे विवेचन केले आहे (७४).

पुरातत्त्व व तत्संबद्ध विषयांमध्ये अनेक महत्त्वाचे लेख दोन्ही खंडांमध्ये आहेत. प्रा.शां. भा. देव ह्यांनी अश्मयुग, ताम्रपाषाणयुग, प्राचीन ऐतिहासिक युग आणि मध्ययुग ह्यांतून दिसणारे पैठणचे महत्त्व विशद केले आहे (७५). न. शे. पोहनेरकरांनी दौलताबादजवळील गणेशमंदिर आणि एक समाधी ह्यांचा काळ निश्चित केला आहे (७४). म. के. ढवळीकर ह्यांनी 'अजिंठ्यातील एक अवदान-कथा' ह्या लेखात लेणे क्रमांक एकमधील एका चित्रात इतर विद्वान मानतात त्याप्रमाणे शिबीची कथा चित्रित केली नसून सर्वंददराजाची कथा चित्रित केली आहे असे मत मांडले आहे (७५). भ. ना. चापेकर ह्यांनी इ. स. पू. ३ रे शतक ते इ. स. १८ वे शतक येथपर्यंतचा मराठवाड्यातील तेर ह्या गावाचा इतिहास सांगितला आहे (७४). गो. बं. देगलूरकर ह्यांचा 'मराठवाड्यातील मंदिरे व शिल्पे' (७५), हरिहर ठोसर ह्यांचा 'लोहगड येथील लेणी व किल्ल्याचे अवशेष' (७५), प्र. र. देव ह्यांचा 'धर्मापुरी येथील चालुक्य शिल्प स्थापत्य अवशेष' (७५) ह्यांसारखे लेखही उल्लेखनीय आहेत.

मराठी साहित्यविषयक लेखही दोन्ही खंडांमध्ये मिळून मोठ्या प्रमाणावर आहेत. वा. ना. मुंडी ह्यांनी दत्तनाथ उज्जयिनीकर ह्यांचा व त्यांनी केलेल्या साहित्यकृतींचा परिचय घडवला आहे (७४), तर कल्याण काळे ह्यांनी हंसराजस्वामींच्या कृतींचा परिचय घडवला आहे (७४). डॉ. भालचंद्र फडके ह्यांनी बी. रघुनाथ ह्या कथालेखकाची कामगिरी विशद केली आहे (७४). वि.वा. कुलकर्णी ह्यांनी मुकुंदराजकृत विवेकसिंधुच्या एका लक्षणीय हस्तलिखित प्रतीची माहिती दिली आहे (७५). म. रा. जोशी ह्यांनी अच्युताश्रम व त्यांचे ग्रंथ ह्याविषयी चर्चा केली आहे (७५). ह्या सर्व संशोधकांनी ज्यांच्या साहित्याविषयी लिहिले आहे ते सर्व मराठवाड्यातीलच आहेत हे महत्त्वाचे आहे. चूडामणिसुत कवी विठ्ठल चाकूरकर हाही मराठवाड्यातील एक (शके १७३२-१७९७) कवी. त्याचा परिचय सु. ग. जोशी ह्यांनी करून देऊन त्याची काही काव्येही छापली आहेत (७५).

संस्कृत व मराठी साहित्यविषयक लेखांमध्ये श्री. नरहर कुरुंदकर ह्यांनी भरतनाट्यशास्त्रविषयक आपल्या लेखात भरतनाट्यशास्त्राचे शेवटचे संस्करण इ. स. ४ थ्या शतकाआधी घडले असावे असे दाखवले आहे (७४). संस्कृतमधील प्रबोधचंद्रोदयाच्या आधारावर रचलेले पण शब्दशः भाषांतर नसलेले, असे जे मराठी प्रबोधचंद्रोदय नाटक ह्याची माहिती वसंत पारखे ह्यांनी दिली आहे (७५). मल्लिनाथाने संस्कृतग्रंथावर टीका करताना जी विविध ग्रंथांतील अवतरणे घेतली त्यांची एक समग्र सूची श्री. गु. ग. जोशी ह्यांनी केली आहे (७४).

भाषाशास्त्र, व्याकरण इत्यादी विषयांमध्ये शि. द. जोशी ह्यांचा पाणिनी व कात्यायनाच्या समासाच्या विग्रहासंबंधीच्या मतांची चर्चा करणारा लेख (७४) वा. बा. भागवत ह्यांची द्योतना हीं एक शब्दशक्ती आहे असे दर्शविणारा लेख, मु. श्री. कानडे ह्यांचा दासबोधाचा भाषाशास्त्रीयदृष्ट्या अध्ययन करून त्यातील शब्दसंग्रहाचा परिचय घडवणारा लेख (७४) हे लेख उल्लेखनीय आहेत.

इतिहासविषयक लेखांत मराठेशाहीतील मल्ल व मल्लविद्या हा य. न. केळकर ह्यांचा लेख माहितीपूर्ण आहे (७५). तसेच दि. के. देशपांडे ह्यांनी पेशवाईतील आणखी एक तोतया ह्या लेखात बापूजीपंत फडक्यांच्या तोतयाविषयी रंजक माहिती दिली आहे (७५).

अशा रीतीने मराठवाडा संशोधनमंडळाच्या वार्षिकाच्या दोन्ही खंडांत अनेक प्रकारचे महत्त्वाचे लेख आहेत. दोन्ही खंडांमध्ये लेखांचे इंग्लिशमध्ये सारांश छापलें आहेत हे फार चांगले झाले तसेच मुखपृष्ठावर ग्रंथाचे नाव रोमनलिपीतही छापावे अशी सूचना करावीशी वाटते. १९७५ च्या अंकात दिलेली मराठीतील अद्ययावत प्रबंध-सूची तसेच त्या अंकातील ग्रंथपरीक्षणे हीही मोलाची आहेत. ह्या वार्षिकासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, श्रीमान सी. जी. आगाशे ट्रस्ट, मराठवाडा व पुणे विद्यापीठ, राधा दामोदर ट्रस्ट आळंदी ह्यांसारख्या संस्थांनी जी आर्थिक मदत केली, त्याबद्दल त्या संस्थांचे अभिनंदन आहे. पं. सु. ग. जोशी ह्यांनी अतिशय अवघड, मोलाचे पण तरीही ज्याला स्वस्त लोकप्रियता मिळू शकत नाही असे, संशोधनपर लेख प्रसिद्ध करण्याचे हे जे कार्य चालू ठेवले आहे, त्याबद्दल तेही अभिनंदनास पात्र आहेत. अशाच रीतीने ह्या वार्षिकाचे अंक प्रतिवर्षी निघून जोशी ह्यांच्या कार्यास यश येवो व मराठवाड्याची संशोधनात्मक प्रगती होत राहो एवढीच शुभेच्छा.

**-डॉ. गणेश थिटे**

[मराठवाडा संशोधनमंडळ वार्षिक: प्रकाशक-मराठवाडा संशोधनमंडळ शिरूरताजबंद, तालुका अहमदपूर, जिल्हा उस्मानाबाद; अंक २: १९७४ व १९७५. मूल्य प्रत्येकी २० रु. पृष्ठसंख्या ३२८ व ४१०.]

चित्रचक्कर । नीलेशकुमार

# राजा परांजपे

## टू बी ? ऑर नॉट टू बी ?

राजाभाऊ परांजप्यांचा पुन्हा एकदा हॅम्लेट होऊ पाहत आहे. टू बी ऑर नॉट टू बीच्या संघर्षचक्रात ते पुन्हा सापडले आहेत, असे परवाचा त्यांचा सत्कार समारंभ पाहताना सारखे वाटत होते. असा संघर्ष प्रत्येक कर्तृत्ववान माणसाच्या आयुष्यात अनेक वेळा येत राहतो. अशा वेळी तो जे निर्णय घेतो, ते केवळ वैयक्तिक स्वरूपाचे नसतात. त्याच्या कर्तृत्वाने फुलारणाऱ्या त्याच्या कार्यसृष्टीशी संबंधित असतात. म्हणूनच असा निर्णय केवळ वैयक्तिक आशानिराशेतून होतो, का त्या कार्यासंबंधीच्या अंतिम निष्ठेतून होतो हे महत्त्वाचे असते.

राजाभाऊंनी आपल्या चित्रकारकीर्दीची ४० वर्षे पूर्ण केली आणि वयाची ६७ वर्षे पूर्ण करून ६८ व्या वर्षात पदार्पण केले. त्यानिमित्त हा सत्कार झाला. पुण्याची चित्रांजली फिल्म सोसायटी आणि चित्र-नाटक पत्रकार संघ यांनी हा सत्कार आयोजित करून राजाभाऊंचे ऋण अंशतः फेडण्याचे काम केले. त्यांच्या कर्तृत्वाला अभिवादन करण्यासाठी सारे चित्ररसिक जमले होते. पण प्रत्येकाच्या भाषणात एक सूर हटकून लागत होता. अगदी ग. दि. मां.नीसुद्धा आवर्जून हा सूर लावला, तो राजाभाऊंनी चित्रपटात परत यावे हा. गेली काही वर्षे राजाभाऊ चित्रपटात छोट्या भूमिका करत असले, तरी त्यांनी आपला दिग्दर्शन संन्यास मात्र सोडलेला नाही. हा संन्यास सोडून मराठीचा चित्रसंसार त्यांनी पुन्हा करावा. नव्या उमेदीने, जिद्दीने करावा असे त्यांनी विनवले. मराठी चित्रांची कशी कोंडी झालीय ही ऐकवून ही कोंडी फोडायला तरी तुमच्यासारखे समर्थ दिग्दर्शक हवेतच, असे मागणे मांडले. हे सारे खरेतर तुमच्या आमच्या मनातले विचार प्रकटत होते. आता या साऱ्या भाषणांचा नंतर राजाभाऊ एखादे नवे चित्र हातात घेतल्याचे सांगून शेवट गोड करणार असा सगळ्यांचा होरा; पण छे. राजाभाऊंचे याबद्दल चक्क मौन. त्यांनी यावर तोंड उघडले ते तीन दिवसांनंतर. त्यांनी एक छोटेसे निवेदन करून सर्वांना आश्चर्याचा एक धक्काच दिला.सध्याची मराठी चित्रांची कोंडी फोडण्यास आपण असमर्थ आहोत अशी कबूली देऊन आपण संन्यस्तच राहणार असल्याचे सांगितले. त्यांच्या या निवेदनाने चित्ररसिकांची निराशाच झाली.

गेल्यावर्षी राजाभाऊंनी दिलेली मुलाखत ज्यांना आठवत होती त्यांचा मात्र या निवेदनाने चांगलाच गोंधळ उडाला. मराठी चित्रपटातील कोंडी फोडण्यासाठी मी संन्यास सोडून पुन्हा चित्र दिग्दर्शनात उतरणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली होती. राजाभाऊंची कथानिवड चालू आहे वगैरे अफवाही पसरत होत्या. पण शेवटी निराशा झाली, राजाभाऊंनी माघार घेतली. गेले वर्षभर टू बी ऑर नॉट टू बी च्या सीमारेषांवर हिंदकळणारे त्यांचे अस्वस्थ मन अखेर शेवटी नकारावरच स्थिरावले. वैयक्तिक निराशेच्या भावनेने अखेर मराठी चित्रसृष्टीच्या अवकळेवर मात केली. राजाभाऊंनी आणखी एक संधी घालवली.

पूर्वी राजाभाऊंनी अशाच मानसिक संघर्षावस्थेत घेतलेला निर्णय या संदर्भात मला आठवला. म्हणूनच मी सुरुवातीला म्हटले की राजाभाऊंचा पुन्हा एकदा हॅम्लेट होत आहे. आताचा त्यांचा नकार वैयक्तिक निराशेतून आहे. त्यावेळी त्यांनी जो होकार भरला होता तो वैयक्तिक आशावादातून, उत्तुंग झेप घेण्याच्या इर्षेतून आला होता. पण दोन्ही वेळी त्यांच्याकडून घडली ती मराठी चित्रसृष्टीची उपेक्षाच. त्यावेळी नवचित्र संस्था नुकती पाय रोवू पाहत होती. प्रभात-हंसनंतर नवी परंपरा निर्माण करता येईल असे कार्य नवचित्रपुढे वाढून ठेवले होते. ग. दि. मा., राजाभाऊ व सुधीर फडके असे त्रिकुट मस्त जमले होते. पुन्हा मराठीला बरे दिवस येणार म्हणून मराठी कलाकार तंत्रज्ञांच्या व रसिकांच्या आशा पालवल्या होत्या. पण हे घडणे नव्हते. आपल्यापुढे असलेले ऐतिहासिक कार्य नाकारून ग.दि.मा. व राजाभाऊ हिंदी चित्रासाठी मद्रासला निघून गेले. उभी राहत असलेली नवचित्र विस्कटून गेली. मराठी रसिकांची स्वप्ने धुळीला मिळाली. दोघेही मद्रासहून परतले ते पराभूत मनःस्थितीतच. त्यामुळे दोघेही नंतर पूर्वीच्या उभारीने कधी उभेच राहू शकले नाहीत. आणि येऊ पाहणारा सुवर्णकाल त्यांनी आपल्या हातांनी लांबवला. ऐतिहासिक कार्यासाठी मराठी चित्रसृष्टीने दिलेली हाक त्यांनी नाकारली. आताही तेच घडते आहे. ग. दि. मां.सारख्या त्यांच्या सहकाऱ्यांपासून सर्वजण त्यांना विनवत आहेत. मनातली कोंडी फोडण्यासाठी तो सुवर्णक्षण त्यांना परत बोलवत आहे. राजाभाऊ आता तरी साद देणार का ? ◻

## मराठी चित्रपट आणि प्रेक्षक

गेल्या काही दिवसांत ओळीने तीन–चार नवी मराठी चित्रे साफ कोसळल्याने पुन्हा एकदा मराठी चित्रपट व प्रेक्षक यांच्या चर्चेला सुरुवात झाली आहे. तशी आजवर या प्रश्नाची चर्चा अनेक वेळा झाली आहे. आजपावेतो या चर्चेत मुख्यतः टीकेचा रोख असे तो मराठी चित्रनिर्मात्यांवर. मराठीत तमाशापटांशिवाय दुसरे चित्रच निघत नाही अशी ओरड चालू होती. पण आता हा नवा विषय सुरू झाला तो या नव्या मिझरेबल फ्लॉप 'च्या संदर्भात. आणि टीकेची झोड उठवली जाते आहे ती मराठी प्रेक्षकांच्या नावाने.

हे सणसणून आपटलेले चित्रपट तरी कोणते होते ? राजदत्तचे 'ओवाळिते भाऊराया', बाफनाचे 'शांतता खून झाला आहे' आणि ठाकरे–निकलंकर जोडीचे 'शूरा मी वंदिले' हे ते चित्रपट. यापूर्वी येऊन गेलेला

दिनेशचा 'प्रीत तुझी माझी' फारसे यश मिळवू शकला नव्हताच. यांच्या अपयशाच्या पार्श्वभूमीवर ही चर्चा चालू आहे. मराठी प्रेक्षकांनी मराठी चित्रांकडे पाठ फिरवली आहे. अहो, आमचे चित्र पाहून तरी नाकारा असा सूर निर्मितिमंडळींनी लावला आहे. त्याबरोबरच मराठी चित्रांकडे प्रेक्षक आकर्षित व्हावा म्हणून तमाम मराठी चित्रांना करमाफी करावी अशी मागणीही जोर धरू लागली आहे. करपरतीची योजना कार्यवाहीत येऊ लागली असतानाच करमाफीची ही मागणी येणे हे जरा विचित्रच आहे. करातली ही सूट प्रेक्षकाला मिळावी का निर्मात्याच्या पदरी पडावी, यावर थोडा वेगळा विचार होण्यासारखा आहे. पण ही करमाफीची मागणी करताना मराठी प्रेक्षकाला बुद्दू ठरवून, अंडर एस्टिमेट करून त्याला करमाफीची लालूच दाखवण्याचा विचार करणे अन्यायाचे ठरेल. कर माफ असतानाही नाटकाची तिकिटे दोन रुपयांपासून दहा रुपयांपर्यंत खर्चून जो प्रेक्षक घेतो, तो केवळ करमाफीमुळे चित्रपटाकडे वळेल असे समजणे निश्चितच समंजसपणाचे ठरणार नाही. रंगभूमीवरही त्यांतल्या त्यात चांगली नाटकेच चालतात आणि टाकाऊ नाटके पहिल्या फटक्यालाच आपटतात, हे लक्षात घेण्यासारखे आहे. कलामूल्य, कालातीतता वगैरे निकष सोडले तरी सर्वसाधारण चांगले नाटक चालते, भरपूर चालते हे लक्षात येईल. चित्रपटांबाबतही हे खरे आहे. जेव्हा खरोखरच एखादे चांगले चित्र पडद्यावर आले तेव्हा मराठी प्रेक्षकाने भरभरून दाद दिली आहे. पिंजरासारखा अनेक अर्थाने नवे वळण देणारा चित्रपट शांतारामबापूंनी दिला तेव्हा मराठी प्रेक्षकांनी त्याला प्रचंड दाद दिली. दादा कोंडक्यांच्या चारही चित्रपटांनी इतरत्रच काय पण मुंबईतही लागोपाठ रौप्यमहोत्सव घडवले. दादांच्या चित्रांना मिळालेले यश मराठी चित्रनिर्मात्यांच्या डोळ्यात अंजन घालणारे आहे. पिंजऱ्याची सारी रेकॉर्डस् दादांच्या पांडू हवालदारने मोडली. गेल्या वर्षात आलेले 'चंदनाची चोळी', 'ज्योतिबाचा नवस'; 'करावं तसं भरावं', 'पांडोबा पोरगी फसली', 'अजब तुझे सरकार', 'सामना' इत्यादी चित्रांनी चांगले यश मिळवले. म्हणजे प्रकाशित झालेल्या पंधरा चित्रांपैकी निम्म्याहून अधिक चित्रपट चांगले यश देऊन गेले; हे सारे कशाचे निदर्शक आहे ? मराठी प्रेक्षकांनी पाठ फिरवल्याचे ? का त्या निर्मात्यांनी प्रेक्षकांची नस अचूक ओळखल्याचे ?

केवळ तमाशा नसणे हा काही एखाद्या चित्राचा निकष असू शकत नाही. तमाशा नसणे ही या नव्या चित्रांसाठी किमान बाब आहे. ते एक नकारार्थी मूल्य आहे. पण म्हणून त्याचा अन्य दृष्टिकोनातून विचार न करताच ते चित्र डोक्यावर घेतले जावे, अशी अपेक्षा करण्यात काय मतलब आहे ? आता कोसळलेली चित्रे तशी फारशी चांगली नव्हतीच. त्यातून तीच तीच गुलगुलीत नावे देऊन चित्रपट पडद्यावर आणण्याची आमची सवय काही जात नाही. हिंदीचा मालमसाला मराठीत आणायचाच, या प्रतिज्ञेवर बाफनांनी शांतता खूनची निर्मिती केली. मराठी प्रेक्षकाला हेही जरूर हवे आहे. पण केवळ हेच नव्हे तर मुख्य चांगली कथा, त्याची चांगली हाताळणी, मग त्यासोबत त्याला काहीही चालते, अगदी तमाशासुद्धा. सामनाचेच उदाहरण घ्या. सामनामध्ये हिंदी चित्रात शोभावा असा मदिरेचा दरबार आहे. त्यात उत्तान शृंगारिक नृत्य आहे, वासनेला आव्हान करू पाहणारे लालन सारंगचे किंचित दर्शन आहे. फार काय, चक्क एक कॅबरेसुद्धा आहे. पण सामना पाहायला गेला तो या सर्वांसाठी नव्हे तर डॉ. लागू व निळू फुलेंच्या अभिनयाच्या जुगलबंदीसाठी. सामनात हे सारे पाहत असताना त्यामागचे राजकारण, निळू फुलेंची भिरभिरणारी दृष्टी आपल्यावर वचक ठेवत राहते. म्हणून तो मालमसाला राहत नाही. तो असूनही लक्षात राहत नाही. पण केवळ मालमसाल्यासाठी बनवलेले चित्रपट हिंदीतही कोसळतात, मग मराठीत तर नावच नको. हिंदीचे मार्केट प्रचंड असल्याने ते कोसळले तरीसुद्धा तरून जातात. मराठीत कोसळला की संपलाच. म्हणूनच चित्र देताना त्याचा विचार करावा लागतो. म्हणून असे चित्रपट कोसळले म्हणून वाईट वाटत नाही. उलट चालले तर चांगले चित्रपट येण्याऐवजी तमाशापटांनंतर एकदम देमार चित्रांचा जमाना सुरू व्हायचा. तेव्हा एकापरी हे बरेच झाले. शूरा मी वंदिले व ओवाळिते भाऊराया ही चित्रे मात्र इतकी टाकाऊ नव्हती, पण आवर्जून बघावीच अशी खासही नव्हती. अशी चित्रे येतात आणि जातात. अशी चित्रेही पुढे-मागे चालतील, पण त्यासाठी मराठी मार्केट पुन्हा गजबजायला पाहिजे.

करपरतीच्या योजनेमुळे हे घडतंय असे वाटू लागले आहे. कारण ही योजना जाहीर झाली आणि एरवी वर्षाकाठी दहा-पंधरा चित्रपट कसेबसे बाहेर टाकणारी मराठी इंडस्ट्री एकदम तरारून गेली. एकाच वेळी पंचवीसच्यावर चित्रपट सेटवर गेले आहेत. कलाकार, तंत्रज्ञ, वितरक असे सर्व प्रकारचे लोक निर्मितिक्षेत्रात उतरले आहेत. अनेकांनी नव्या वाटा चोखाळायचा चंग बांधला आहे. विश्वास सरपोतदारांचा पाहुणी, सीमा-देवचा या सुखानो या, दादा कोंडक्यांचा तुमचं आमचं जमलं, वसंत पेंटरांचा दगा, असे कितीतरी नवे चित्रपट वितरित होत आहेत. रमेश देव, राजा गोसावी वगैरेंचे चित्रपट निर्मितीअवस्थेत आहेत. निर्मितिक्षेत्रात उतरलेल्या विशिष्ट दृष्टी असलेल्या या मंडळींच्या या नामावलीमुळे प्रेक्षक या चित्रांसाठी विलक्षण उत्सुक आहे. ही मंडळी निदान किमान रेषेवरचे चित्रपट देतील अशी आशा करू या. म्हणूनच आता इंतजार करायचा तो पाहुणी, या सुखानो याचा. म्हणजे तरी मराठी प्रेक्षक समाधानाने या निर्मात्यांना म्हणू शकेल, तुमचं आमचं जमलं.



रंगभूमी

शिरीष सहस्रबुद्धे

दोन निराशाजनक नाटके

# नगरी अंधेरा व नवऱ्याला हवी मैत्रीण

मराठी नाटकांच्या सर्वसाधारण नामकरण-पद्धतीपेक्षा वेगळेपणा दर्शविणारं आणि त्यामुळं नावानंच आकर्षूण घेणारं 'नगरी अंधेरा' हे नाटक म्हणजे प्रसिद्ध जर्मन साहित्यिक मॅक्स फ्रिश यांच्या 'अँडोरा' या मूळ जर्मन नाटकाच्या इंग्रजी अनुवादाचे रूपांतर आहे. पाश्चात्य नाटककारांच्या नावाजलेल्या नाट्यकृतींचे—लेखकाचे ऋण मान्य करूनसुद्धा—रूपांतर करून ती मराठी रंगभूमीवर पेश करण्याची लाट तशी नवी नसली तरी स्वागतार्ह निश्चितच आहे. कै. चिं. त्र्यं. खानोलकरांनी रूपांतरित केलेले 'अजब न्याय वर्तुळाचा' हे नाटक याचं ताजं उदाहरण. (विशेष म्हणजे नगरी अंधेरा-प्रमाणे त्याचंही मूळ जर्मनच आहे; कॉकेशिअन चॉक सर्कल हे ब्रेख्तचं नाटक. अँडोराचा लेखक मॅक्स फ्रिश हा तसा काही बाबतीत ब्रेख्तशी जवळीक सांगणाराच.) आणखी एक समाधानी बाब म्हणजे 'अँडोरा' तसं नवीन नाटक आहे. ते रंगभूमीवर प्रथम आलं १९६१ साली आणि अजूनही जर्मन रंगभूमीवर त्याची लोकप्रियता अबाधित आहे. शंभरावर व्यावसायिक संस्थांनी त्याचे प्रयोग केले आहेत. हे सगळं ठीक असलं तरी, नगरी अंधेराच्या या त्रैभाषिक प्रवासामुळे असेल कदाचित, पण त्याचा आत्मा, त्याची original flavour काही शिल्लक राहिलेली नसावी, असं प्रयोग पाहताना मला राहून राहून वाटत राहिलं; आणि हेच रूपांतरकार रत्नाकर मतकरी यांचं प्रमुख अपयश आहे असं मी मानतो. अर्थात याचा सविस्तर उल्लेख ओघानं येईलच. तत्पूर्वी 'नगरी अंधेरा'चे सादरकर्ते आणि दिग्दर्शक यांच्याविषयी त्यांच्याकडूनच मिळालेली काही महत्त्वाची माहिती देणं अप्रस्तुत ठरणार नाही असं मला वाटतं.

नगरी अंधेराची निर्मिती 'सूत्रधार' या संस्थेने, मॅक्समुल्लर भवन या सर्वज्ञात जर्मन सांस्कृतिक केंद्राच्या साहाय्यानं केली आहे. 'सूत्रधार' हे नाव तसं नवं असलं तरी त्यातले कलाकार 'बालनाट्य'च्या बॅनरखाली गेली तेरा वर्षे कार्यरत आहेत. या कालावधीत त्यांनी अकरा बालनाटचे व सात प्रौढांची प्रायोगिक नाटके सादर केली. आता ते प्रौढांची नाटके 'सूत्रधार' या नावाखाली सादर करतात. 'प्रेमकहाणी', 'आरण्यक', 'शापित', 'चुटकीचे नाटक' ही त्यांची विशेष गाजलेली नाटके. नगरी अंधेरा या त्यांच्या नव्या नाटकाला दिग्दर्शकही जर्मनीचेच डॉ. नॉर्बर्ट जे. मायर हे लाभलेले आहेत. नाट्यक्षेत्रातील भारत-जर्मनी सहकार्याचं हे दुसरं उदाहरण. 'अजब न्याय वर्तुळाचा' या नाटकाच्या दिग्दर्शनाला पूर्व जर्मनीचे दिग्दर्शक डॉ. फ्रिट्झ बेनेविट्झ यांचा हातभार लागला होता. डॉ. मायर हे नाट्यशास्त्रातील तज्ज्ञ आहेत, उत्तम व्याख्याते व मार्गदर्शक आहेत आणि नाट्यव्यवस्थापक व नाट्य-दिग्दर्शन यांतील त्यांचा अनुभव प्रदीर्घ आहे. भारतात दिल्ली, हैद्राबाद, कलकत्ता व मुंबई व भारतबाहेरही ते नाट्यविषयक विविध उपक्रम करीत आहेत.

अंधेरा नगरी—स्वतः मतकरी तिच्याबद्दल नांदीतच म्हणतात.

अंधेरा...

हे एक नगर...एक समाज... एक देश... एक जग...

एक काल्पनिक गाव...

असं गाव जगाच्या पाठीवर कुठं असेल का?

किंवा असं गाव कुठं नसेल ?

कुठंच नसेल. किंवा कदाचित सर्वत्र असेल.

तुमच्या आमच्या—सर्वांच्या भोवती.

तर अशा या अंधेरामधल्या एका ज्यू तरुणाची ही कथा आहे. गावातला मास्तर (रवीन्द्र बेर्डे) आणि त्याची बायको (प्रतिभा मतकरी) यांनी या परक्या रक्ताच्या तरुणाला लहानपणापासून पाळलंय, आपल्या मुलीबरोबरच त्याला वाढवलंय, त्याच्यासाठी झीज सोसलीय. पण या तरुणाचं (दिलीप प्रभावळकर) 'ज्यू' पण त्याच्या प्रगतीच्याच नव्हे तर त्याच्या माणूस म्हणून अस्तित्वाच्याच सतत आड येतंय, त्यातून संघर्ष. आपल्या मुलीशी लग्न करायला मास्तर त्याला परवानगी देत नाहीत. हा संघर्षाचा परमोच्चबिंदू. अखेर ज्यू-द्वेष्टे काळे सैनिक सीमेबाहेरून आक्रमण करून ज्यूंची कत्तल करतात, त्यातच याचाही बळी जातो. तो तरुण प्रत्यक्षात ज्यू नव्हताच; तर मास्तरच्याच विवाहबाह्य संबंधातून झालेला मुलगा होता, हे सत्य फार उशीरा प्रकटतं आणि अविश्वसनीय म्हणून अव्हेरलंही जातं. नांदी भविष्यवाणी ठरते;

पण आणखीही असेल तिथं (अंधेरामध्ये) एक जीव.

साधाभोळा, तरणाबांड, डोळ्यात स्वप्न घेऊन फिरणारा.

तो सगळ्यांमध्ये असेल, पण तरीही कुणाचाच नसेल.

सगळ्यांमध्ये फिरताना उपरा उपरा पडेल. हे त्याचं उपरेपणच हळूहळू वाढेल त्याच्यासोबत सावलीसारखे.

तशी प्रत्येक माणसासोबत कुठली न कुठली सावली फिरतेच. पण याची उपरी सावली गिळून टाकेल यालाच,

कुरतडून टाकील याची स्वप्नं,

आणि पुरतं उमलण्याआधीच अंधारून मिटेल त्याच्या आयुष्याचं सूर्यफूल.

का, तर केवळ त्याचं नव्हतं इतरांप्रमाणे या मातीत मूळ. अथवा नव्हतं तरी कसं म्हणावं, फक्त त्यालाच कधी जाणवली नाही आपलेपणाची चाहूल.

नाहक बळी जाणारे असे अश्राप पण हतभागी जीव कित्येक असतात. या जगाच्या गर्दीत त्यांच्या वेदना फार थोड्यांना कळतात. बाकी बहुसंख्य लोक स्वार्थी, आत्मसंतुष्ट आणि कातडीबचाऊ. अंधेरा नगरीतही अशांना तोटा नाही. वाऱ्याला पाठ देणाऱ्या या अर्धाएक डझन मंडळींची व्यक्तिचित्रण

ही नगरी अंधेराच्या लेखनातली एक जमेची बाजू. कारण ही मंडळी इथं व्यक्तिगत पातळीवर राहतच नाहीत. त्यांचं स्वतंत्र अस्तित्व विरघळून जाऊन 'अंधेरा'चंच एक सलग आणि सुसंगत व्यक्तिमत्त्व त्यातून साकार झाल्यासारखं वाटतं. गावकऱ्यांचा छुपा ज्यू-द्वेष, त्यांची लाचारी, त्यांची स्वार्थांध कातडीबचाऊ वृत्ती आणि त्यांची साहानुभूतीशून्य संशयखोरी या सगळ्या दुर्गुणांतून अंधेराची total personality उभी राहते. मतकरींनी नाटक हेतुपुरस्सर परकीय अनुवादाच्या पातळीवर ठेवलेलं आहे, कदाचित एरवी आपला प्रेक्षक या विशिष्ट वांशिक द्वेषाच्या अनुभवाशी तितका समरस झाला नसता. तथापि इथंच एक मोठी गफलत झालीय् ती अशी की, हे नाटक सामान्य विशिष्टाचं अद्वैतही साधू शकत नाही किंवा धड कुणा एकाची विशिष्ट (particular) किंवा सामान्य (general) अनुभवाचीही—कास धरीत नाही. पण नाटकाचा उत्तरार्ध (किंवा दुसरा अंक म्हणा हवं तर) काहीशा अनावश्यक अपरिहार्यतेनं आणि काहीशा भडक ढोबळपणानं विशिष्टाला शरण गेलेला दिसतो. तर मतकरींना यात नक्की साधायचं होतं ते काय? त्यांना काय एका ज्यू तरुणाची जन्मापासून मरणापर्यंतची गोष्ट सांगायची होती? का एका अंधेरनगरीचं चित्रण करायचं होतं? मला तसं वाटत नाही. खुद्द मतकरींनाही ते अभिप्रेत नसावं असं मानायला जागा आहे. कारण नांदीच्या अखेरीला ते म्हणतातच.

...आणि म्हणूनच हरवलेले आपणही अंधेरा नगरी म्हणूनच तुमची आमची पसरलेली इथे चारी बाजूंना, माझ्या मागे आणि समोरही तिथेच घडत असलेली ही कहाणी कधी काळी, पण पुढेही घडेल अशीच घडत असलेली— दररोज.

दुर्दैवानं सर्वांनाच अपेक्षित असलेली ही अनुभवाची वैश्विकीकरणप्रक्रिया (universalization) नाटकात अभावानेच आढळून येते. एकदोनदा मतकरी ही आशा दाखवतातही. विशेषतः डॉक्टर हे पात्र अंधेरा नगरीच्या निरागस अलिप्ततेविषयी आणि शांतताप्रियतेविषयी ज्या बढाया मारते त्या हटकून १९६२ पूर्वीच्या भारताची आठवण करून देतात आणि नाटक एकदम एका जवळच्या पायरीवर आल्यासारखं वाटतं. तथापि अनुभवाचं हे सामान्यीकरण (generalization) एरवी क्वचितच अनुभवाला येतं. इथला ज्यू तरुण हा ज्यू आणि फक्त ज्यू राहतो. एवढंच नव्हे तर, अखेरच्या सत्यस्फोटामुळे तो ज्यूंमधलीही एक स्पेशल केस बनतो. तो दुनियेतल्या पददलितांचा प्रतिनिधी होऊ शकत नाही. त्यांच्या आणि इतर शोषितांच्या, हजारो पीडितांच्या, निर्वासितांच्या, युद्धबळींच्या, द्वेषाचं भक्ष्य बनलेल्या इतर शतसहस्रांच्या दुःख-यातना-वेदनाभोगांमध्ये कुठं समान धागा सापडत नाही; त्यामुळे आणि विशेषतः उत्तरार्धातल्या 'गोष्ट पुरी करण्याच्या' घाईमुळं नाटक विशिष्टाच्याच पायापायात घुटमळतं; अपेक्षित ती उंची ते गाठू शकत नाही. आणि म्हणूनच मतकरी दावा करतात तशी ही कहाणी भूत-वर्तमान-भविष्य अशी त्रिकालाबाधित होऊ शकत नाही.

विस्कळीतपणा हे 'नगरी अंधेरा'चं दुसरं मोठं अपयश. हा विस्कळीतपणा त्याच्या जवळजवळ सर्वच महत्त्वपूर्ण अंगांमध्ये दिसून येतो. नाटक अनेक छोटचामोठ्या प्रवेशांत विभागलेलं आहे. या प्रवेशांच्या व्यवस्थेमध्ये दिग्दर्शनातला आणि नेपथ्यातला विस्कळीतपणा ठळकपणे खुपतो. नाटक मुख्यतः तीन ठिकाणी घडतं : एक 'बार', एक चौक आणि मास्तरचं घर. या तीन स्थळांची स्टेजप्रॉपर्टी ने-आण करून मांडताना दिसणारा गबाळेपणा, बेशिस्त, कर्णकटु आवाज, सफाईचा अभाव, बोजडपणा हे सगळे दुर्गुण निश्चितपणे रसहानी करणारे होते. कदाचित सरावाने सफाई येऊन यात सुधारणा होईल. (जाता जाता : डॉ. मायर यांची काहीच खास चुणूक किंवा चमक दिग्दर्शनात दिसलेली नाही, हे कदाचित धाडस पत्करूनही नमूद केलंच पाहिजे. अपवाद एकदोनच : उदा. प्रत्येक गावकऱ्यानं एका बाजूला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं राहून दिलेल्या confessional nature च्या स्वगत, कैफियती. पण तिथं मतकरींची लेखणी कमी पडली.) लेखनातल्या विस्कळीतपणाबद्दल बोलायचं तर, मतकरींनी अनेक चांगले धागे काही वेळा नुसतेच लोंबकळत सोडले आहेत, त्यांचा योग्य तो उपयोग करून घेतलेला नाही. वेगळ्या शब्दांत सांगायचं तर नाटकाच्या दोन-तीन 'थीम्स' त्यांनी नीट न हाताळता वाया दवडल्य आहेत. उदाहरणार्थ या नाटकाविषयी स्वतः मतकरींनीच म. टाइम्स, नवशक्ती, केसरी इ. पुण्या-मुंबईच्या दैनिकांत लिहिलेले परिचयलेख वाचले तेव्हा self-identity ही नाटकाची एक 'थीम' असावी अशी माझी कल्पना झाली होती. तशी ती आहेही, पण अपुरी आहे, underdeveloped आहे. हिटलरप्रणीत वंशश्रेष्ठत्वाचं तत्त्वज्ञान आणि त्याचं अपत्य असलेला वंशद्वेष, ज्यू द्वेष. या थीमबाबत तर हा प्रकार खास करून जाणवतो. ही थीम उपरोधानं-उपहासानं रंगवायची संधी नाटकाच्या अखेरीस तरी मतकरींनी सोडायला नको होती असं माझं प्रामाणिक मत आहे. अंधेराच्या सैनिकाच्या कॅरॅक्टरला जो satirical-cum-farcical touch त्यांनी ज्यू-इन्स्पेक्शनच्या प्रसंगात दिला, तोच ज्यू-इन्स्पेक्शनच्या संपूर्ण प्रसंगाला व विशेषतः ज्यू-संशोधक व काळे सैनिक यांना दिला असता तर? प्रभावी विडंबन-उपरोधाची उणीव या नाटकात तरी विशेषत्वाने जाणवते.

लेखन-दिग्दर्शनात 'चार्म' व ताकद नसलेलं हे नाटक काही प्रमाणात तरी तारलं गेलंय् ते अभिनयावर. त्यातला सिंहाचा वाटा जाईल तो तरुणी (मास्तरची मुलगी) ची भूमिका जिवंत करणाऱ्या मीनल जोशी यांच्याकडे. समजून आणि समरसून केलेला अभिनय, किती प्रभावी, जिताजागता आणि हृदयस्पर्शी होऊ शकतो याचा एक वस्तुपाठ त्यांनी दिला. त्यांची काही एक्स्प्रेशन्स संस्मरणीय आहेत. सैनिकाच्या व्यक्तित्वातली गुर्मी आणि मग्रूरीबरोबरच नांदणारा कातडीबचावू डरपोकपणा श्री. अजित देशपांडे यांनी नेमकेपणानं उभा केला. पाद्री (प्रदीप भिडे, दूरचित्रवाणीवरील वृत्तनिवेदक) आणि आई (प्रतिभा मतकरी) या भूमिकाही नेटक्या झाल्या असल्या तरी, उभयता जरुरीपेक्षा थोडे अधिक अलिप्त, थंड किंवा Passive वाटले. अर्थात दोघांचेही बेअरिंग वाखाणण्याजोगे. या साऱ्यांना अपवादही होते. मेस्त्री (वामन परांजपे) यांचे सदोष उच्चार, मास्तर (रवींद्र बेर्डे) यांचा अप्रमाणबद्ध अभिनय आणि डॉक्टर (वसंत सोमण) यांच्यातील वैविध्याचा अभाव हे दोष खटकणारे होते. दिग्दर्शकाचा हात यांच्यावरून पुरेसा फिरलेला नसावा. ज्यू तरुणाची मध्यवर्ती भूमिका

करणारे दिलीप प्रभावळकर यांनी घनघोर निराशा केली. त्यांचा आवाज, विरलेली एक्स्प्रेशन्स, थिजल्यासारख्या थंड आणि awkward हालचाली या सगळ्यांमुळे ते भूमिकेला आणि पर्यायाने नाटकालाही कधीच न्याय देऊ शकले नाहीत. त्याला घरातून पकडून नेतात त्याआधीच्या प्रसंगात त्यांची असमर्थता प्रकर्षाने बोचली.

अशी आहे ही अंधेरा नगरीची कहाणी. त्यात original flavour नाही–नसावी–असं मी म्हणालो ते तिचं विविध आघाड्यांवरचं अपयश पाहूनच. बाय द वे, यातल्या प्रकाश-योजनेत काहीच खास नसलं, तरी ध्वनि-संयोजनात मात्र प्रदीप देशपांडे यांनी बाजी मारली आहे. त्यांचे मार्चिंग इफेक्टस् आणि वारंवार वापरलेली एक ट्यून अविस्मरणीय. अशा या रूपांतरित नाटकाचा पुण्यातला पहिला–आणि आतापर्यंतचा एकमेव–प्रयोग शनिवार दि. १ मे ७६ रोजी सायंकाळी ७॥ वाजता सरस्वती मंदिर प्रशालेच्या सभा-गृहात जेमतेम चाळीस प्रेक्षकांच्या उपस्थितीत संपन्न झाला ! ◻

---

## नवऱ्याला हवी मैत्रीण

---

'नवऱ्याला हवी मैत्रीण' हा 'नाट्य-मंदार'नं रंगभूमीवर आणलेला रमेश मंत्री-लिखित आणि आत्माराम भेंडे दिग्दर्शित–अभिनीत नवा फार्स. रमेश मंत्री हे एक सिद्धहस्त विनोदी लेखक, परंतु त्यांचं अली-कडचं लिखाण अपेक्षापूर्ती करणारं नाही. विशेषतः त्यांचं वृत्तपत्रीय लेखन आणि हिंदी चित्रसृष्टीविषयक लेखन अत्यंत असमाधान-कारक, क्वचित केविलवाणंसुद्धा आहे. 'नवऱ्याला हवी मैत्रीण' ही त्यांची पहिलीच नाट्यकृती. पुण्यात अलीकडेच तिचे दोन-तीन प्रयोग सादर झाले, मुंबईला सतत चालूच आहेत आणि प्रेक्षकांचा प्रतिसाद ही एक कसोटी लावायची ठरली तर, ही फार्सिकल कॉमेडी यशस्वीच म्हणावी लागेल. कारण प्रेक्षक भरपूर होते आणि भरपूर हसतही होते. अर्थात असं असलं तरीही, हा दर्जेदार फार्स नव्हे असं माझं मत मला नोंदवलंच पाहिजे.

याला कारणं आहेतच. मुख्यतः या फार्सचा शिळा विषय रंगतीला मारक ठरण्याजोगा आहे. 'जहांबाज बायकोच्या तावडीत सापड-लेला गरीब बिचारा नवरा, त्याचे हाल आणि उपद्व्याप' हा मराठी विनोदाचा एक पारंपरिक उद्गम (source) आहे. याच sourceचं आणखी किती काळ exploitation होणार आहे ? आजवर केवळ कथाकादंबऱ्यांतच नव्हे, तर अनेक नाटकांत-सुद्धा असे पददलित नवरे आपण पाहिले आहेत. 'लग्नाची बेडी'मधला गोकर्ण आणि 'दिनूच्या सासूबाई राधाबाई'मधले सासरे-बुवा ही मला चटकन् आठवलेली काही उदाहरणं. इतरही सापडू शकतील. हा एक वेचव 'टाइप्'-होऊ पाहतो आहे हे रमेश मंत्रीसारख्यांच्या लक्षात यायला हवं होतं. यातली जहांबाज बायको हासुद्धा एक असाच 'टाइप्' झालेला आहे. हाही मराठी विनो-दाचा एक परंपरागत आडाखा. पु. ल. देशपांडे यांच्या 'तुझे आहे तुजपाशी' मधल्या अति-विशाल महिला गाजल्यानंतर त्यांच्या अनेक आवृत्त्या, वाईंडिंग बदलून आणि क्वचित न बदलताही निघाल्या. रमेश मंत्रींची बायको–अर्थातच त्यांच्या फार्समधली–ही त्यातलीच एक आवृत्ती. अशा या सगळ्या शिळ्या कढीला ऊत आणण्याचं वस्तुतः त्यांच्या प्रतिभेच्या नाटककाराला काहीच प्रयोजन नव्हतं.

चौकटीतला विषय निवडल्यानंतर मग फार्सच्या चौकटीत शोभेलसाच मालमसाला मंत्रींनी जमा केलाय्. त्या बाईंचं अतिविशाल महिलामंडळ, त्यामुळे नवऱ्याला मिळणारं स्वातंत्र्य आणि त्याचा सदुपयोग, घरात वर्चस्व गाजवणारे सासरेबुवा आणि वेळोवेळी अकारण घरात तडफडून बेरंग करणारी फुटकळ पात्रे आणि मुख्य म्हणजे या नव-ऱ्याच्या चार मैत्रिणी, या सगळ्या पात्रांतून मंत्रींनी नाटकाला अपेक्षित वळणावाकणातून नेलंय्. नाटकाच्या प्रवेशरचनेमुळे त्याला एक प्रकारची गतिहीनता आणि ठोकळेबाज साचेबंदपणा आलाय्. म्हणजे असं की, तीनही अंकांतले सर्व प्रवेश हे शुक्रवारीच, दुपारी तीन ते सहा या वेळातच आणि एका दिवाण-खान्यातच घडतात आणि जे जे घडतं तेही बरंचसं ठराविक असतं. त्यामुळे प्रत्येक प्रवेशाची कुवत पहिल्या पाच मिनिटांतच लक्षात येते आणि पुढला भाग, आपले अंदाज कितपत बरोबर ठरतात हे पारखण्यात सहज जातो. उदयोन्मुख ज्योतिषांना ही बरी संधी लेखक दिग्दर्शकांनी आणून दिली आहे.

'आत्माराम भेंडे या गृहस्थांना' आपण मानलेलं आहे. नाट्यविषयक चर्चा-वादंगा-पासून सामान्यतः अलिप्त असणारे श्री. भेंडे रंगभूमीवर प्रत्यक्ष कार्य मात्र निष्ठेनं आणि यशस्वीपणे करीत आले आहेत. विनोदी नाटकांत विशेषतः फार्समध्येच त्यांचा अभि-नय सर्वाधिक खुलतो, असा आक्षेप त्यांच्या-वर घेतला जातो, तथापि त्यात आक्षेपार्ह असं काय आहे ? निदान या नाटकाला तरी त्यांचा अभिनय वरदानासारखा लाभला आहे, इतके ते त्यांच्या मध्यवर्ती भूमिकेत फिट बसलेले आहेत. त्यांची बदलती एक्स्प्रे-शन्स, विशेषतः त्यांचा तो अभिजात मिष्किलपणा दीर्घकाळ नजरेसमोरून जाणार नाही. दिग्दर्शक आणि अभिनेता या दोन्ही नात्यांनी त्यांना 'फार्स' या अवघड नाट्य-प्रकाराची नस अचूक सापडली आहे. फार्स-मध्ये शब्दाइतकंच आंगिक अभिनयाला असलेलं महत्त्व ओळखूनच ते या भूमिकेला सामोरे गेले आहेत आणि म्हणूनच 'नवऱ्याला हवी मैत्रीण' हा माझ्या लेखी भेंड्यांचा अपूर्व एकपात्री प्रयोग ठरला. इतर पात्रे मधूनमधून डिस्टर्ब करीत होती ती बाब अलाहिदा. भेंड्यांनी हे नाटक अक्षरशः वाचवलं आहे. चांगल्या गंभीर भूमिकेइतकी दाद, तितकी प्रतिष्ठा आपल्याकडे चांगल्या फार्सिकल भूमिकेला मिळू शकत नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

या फार्सबाबत आणखी उल्लेखनीय असं काही नाही. दोषदिग्दर्शन मात्र पुष्कळ करता येईल. रमेश मंत्री यांचं लेखन–विशेषतः संवादलेखन–मुख्यतः शब्दांचा द्व्यर्थी वापर, (आकडा लागणं, अडचण, वाटी इ.) अन्य शाब्दिक विनोदप्रकार आणि सूचक वाक्यं यांवरच अवलंबून राहिलेलं आहे. काही 'अडचणीं'च्या सिच्युएशन्स त्यांनी चांगल्या उभ्या केल्या आहेत. तथापि लेखनातला अपरिहार्य तोचतोचपणा खटकल्यावाचून राहत नाही. मंत्रींनी उचलेगिरीही करण्यात अनमान केलेलं नाही. बायकोनं इंग्लिश बोलण्याचा प्रकार यापूर्वी 'तुझे आहे तुजपाशी'च्या कॉस्मॉपॉलिटन महिलांमध्ये

गाजलेला आहे. 'बैठकीला चिमटा काढणं' हा प्रकार शब्दश: 'झोपी गेलेला जागा झाला'मधला. नाटकातल्या दुय्यम पात्रांच्या एन्ट्रीज् आणि एक्झिट्स् याही त्यांना व्यवस्थित सांभाळता आलेल्या नाहीत. फार्समध्ये असं काही–किबहुना काहीही–घडू शकतं म्हणून त्या चालवून घ्यायच्या एवढंच! भेंडे यांचं दिग्दर्शन त्यांच्या अभिनयाइतकं निर्दोष आणि उजळ नाही. पहिल्या व दुसऱ्या अंकांचे शेवट त्यांनी बऱ्यापैकी रंगतदार उभे केलेले आहेत. शेवटच्या अंकातला शेवटचा प्रवेशही तसाच. तथापि बहुश: ते नाटकाच्या लेखानातल्या साचेबंदपणामुळे हतबल झालेले वाटतात. एक मैत्रीण–प्रिया मांजरेकर हिला 'इश्शं'चं दिलेलं पुरुषी टोनिंग किळस वाटण्याइतकं हिडीस आहे. ही प्रतिभा ज्याची असेल त्याला आणि हा प्रकार विनोदी वाटणाऱ्यांना आपला मुजरा! जहांबाज बायकोची भूमिका मनोरमा वागळे यांनी आपल्या नेहमीच्या हातखंडा ढंगानं केली आहे. बाबा वैशंपायन (सासरेबुवा) आणि मिता यंदे (ज्यूली फर्नांडिस, सेक्रेटरी) ठीक. इतर तीन 'मैत्रिणी' (नीलम, अलका पाटील व सौ. सुमन धर्माधिकारी), विशेषत: पहिल्या दोघी सदोष उच्चार व कृत्रिम अभिनयपद्धतीमुळे निराशाजनक. सौ. सुमन धर्माधिकारींच्या अभिनयकौशल्याबाबत शंका नाही, पण ही भूमिका फारशी 'त्यांची' नव्हती एवढंच म्हणता येईल. नाटकाच्या इतर बाजू व्यवस्थित. सेट् तर देखणा मांडला होता.

रमेश मंत्रींचं हे पहिलंच नाटक हंशाच्या दृष्टीनं पाहिलं तर बरंच गेलं, विशेषत: तिसऱ्या अंकात. तथापि त्याचं श्रेय मंत्रींपेक्षा भेंड्यांनाच जास्त द्यावं लागेल असं मला वाटतं. एरवी प्रेक्षक भरपूर हसत राहिले होते, आणि माझ्यासारखे काही थोडे दुर्दैवी जीव त्यांचं हसणं अचंब्यानं पाहत हेवा करीत होते. नव्या (आणि वाढलेल्या) तिकिटात जुनेच खेळ पाहायला सुबुद्ध प्रेक्षकांना फारसं आवडत नाही हे तमाम मेहेरबान नाटककारांस आता तरी जाहीर व्हावे.

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

## २२।५।७६ ते २८।५।७६

**मेष : बचत होईल**

शनि-मंगळ चौथे तर रवी दुसरा आहे. सुखस्थान शनि-मंगळांनी काबीज केले असल्यामुळे तुम्हाला समाधान असे मिळणे जरा अवघडच आहे. मात्र तुमच्यापैकी जे कोणी जागा, घर, बंगला अशा कारणांसाठी वणवण करीत असतील त्यांची वणवण या आठवड्यात इतिहासजमा होणार आहे हीच या आठवड्याची उत्तम बातमी आहे. आई-वडील यांची भेट होईल. जुनी वृद्ध माणसे, नातेवाईक यांचा मुक्काम तुमच्या घरी राहील. तरीसुद्धा तुमची आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या मार्गावरच राहील. मिळकत वाढती राहील. श्रमाचा योग्य मोबदला मिळेल. रेसमध्ये एखाद्या भाग्यवंताचे नशीब उघडू शकेल. नोकरीत सुधारणा राहील. सर्वांचे संबंध सुखासमाधानाचे राहतील. वरिष्ठांच्या विश्वासात जाण्याची संधी मिळेल. शुभ दिनांक २३, २४, २६

**महिलांना :** पदवीधरांना वरिष्ठ दर्जाची नोकरी मिळू शकेल. चालू नोकरीत स्थित्यंतर अथवा बदल.

**विद्यार्थ्यांना :** शिक्षणात उच्च आकांक्षा पुऱ्या होतील. 'परमिशन'च्या दिव्यातून सहिसलामत बाहेर पडाल.

**वृषभ : आनंदाचे क्षण येत आहेत**

केतू-शनीच्या विचित्र योगात सध्या तुमची रास अडकून पडली आहे, त्यामुळे अडचणीतून तुम्ही एकदम मुक्त होणे अजून तरी दूर आहे. पण असे असले तरी वृषभ राशीची माणसे परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी धूर्तपणे झगडत आहेत व त्यात त्यांना यशदेखील येत आहे. हा आठवडा अधिक प्रगतीचा जाईल. कलाक्षेत्रात तुमच्यापैकी काही नशिबवंत झळकतील. ज्यांना पडद्यावर झळकावे असे वाटते किंवा नाटकात काम करावे असे वाटते त्यांनी त्या दिशेने प्रयत्न करायला हरकत नाही. नोकरीची परिस्थिती एकंदरीत सुधारणेची राहील. ऑफिसातील व बाहेरचेही संबंध चांगले राहातील. उत्साह वाढेल. बेकारांना शुभ वार्ता. शुभ दिनांक २२, २४, २५

**महिलांना :** तुमच्या कौशल्याचा प्रत्यय येईल. घरगुती कामात जास्त लक्ष द्याल. संततीसुख उत्तम मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** प्रगतीची नवी दिशा दिसेल. जे करण्याचे ठरवाल ते सफल होईल. अपुरे शिक्षण पुरे होईल.

**मिथुन : कसोटी लागेल**

रवी-शुक्र व्ययस्थानी आहेत याची दखल न घेऊन चालणार नाही. अवांतर छंद बाजूला ठेवा व घरात पत्नीला त्रास देऊ नका. वाचन, चिंतन, मनन करून मन उत्साही ठेवा. हा आठवडा करमणूक घडवणारा आहे. विशेष महत्त्वाचा असा पत्रव्यवहार होईल. नोकरीत आपल्या मागण्या वरिष्ठांपर्यंत पोचवण्यात यश येईल. आजवर ज्या गोष्टी अडचणीच्या वाटत होत्या त्याच आता सुलभ वाटतील. नोकरीत एकंदरीत कसोटीच लागेल. दुहेरी दडपणाखाली काम करावे लागेल. मात्र या सर्वांवर तुम्ही तुमच्या बुद्धिकौशल्याने मात करू शकाल. तुम्ही पैसा मिळवता पण टिकवत नाही तोच प्रत्यय ह्या आठवड्यात येईल. शुभ दिनांक २४, २५, २६.

**महिलांना :** गरज असेल तर नोकरी मिळू शकेल. साहित्यिक, कवी इत्यादींना प्रगतीचा काळ आहे.

**विद्यार्थ्यांना :** शिक्षणासाठी स्वत:ची कमाई करू शकाल. परीक्षा उत्तीर्ण होण्याचा आनंद इतरांना देऊ शकाल.

**कर्क : काळजी नको**

सध्याचा काळ तसा काही तुम्हाला प्रतिकूल नाही. दशमस्थानी असलेला गुरु

तुमच्यावर नजर ठेवून आहे व तो तुम्हाला काही कमी पडू देणार नाही. याचा अर्थ सारे कसे शांत आहे असे समजून तुम्ही झोपा काढाव्यात असे मात्र नाही. कारण शनि–मंगळाची युती नुकतीच होऊन गेलेली आहे व तिचे परिणाम अजून राहणारच आहेत. कौटुंबिक जीवनात हवा तेवढा उत्साह राहणार नाही. असमाधान राहील. मुलांचे कौतुक करण्याचा आनंद मिळू शकेल. नोकरीत महत्त्वाच्या घटना घडतील. गुण दाखवण्याची संधी उपलब्ध होईल. वरिष्ठ जागी काम करणाऱ्यांनी हाताखालच्या लोकांबरोबर सहकार्याची भावना ठेवून वागावे. आर्थिक परिस्थिती साधारण अनुकूल राहील. शुभ दिनांक २३–२५–२६.

**महिलांना** : आशाआकांक्षाना प्रोत्साहन मिळेल. दुय्यम व्यवसाय तेजाळेल. नोकरीत सुख व समाधान राहील.

**विद्यार्थ्यांना** : सुट्टीचा आनंद प्रसन्न वातावरणात घालवू शकाल. कलावंताचा सहवास लाभेल.

## सिंह : कुलदेवतेची कृपा हवी

शनि–मंगळाच्या युतीचे परिणाम आताच दिसू लागणार आहेत. मात्र भाग्यस्थानी असलेला गुरू तुम्हांला सर्व अडचणींवर मात करायला मदत करील. यावेळी कुलदेवतेची भक्ती तुम्हाला उपयोगी पडेल. राशिस्वामी रवी, शुक्राबरोबर दशमस्थानी आहे ही एक जमेचीच बाजू आहे. लोकांत अगर राजकीय सत्तास्पर्धेत कमी झालेले स्थान अचानक परत मिळेल. एखादा गुण असा उघड होईल की, विरोधकदेखील मोठेपण मान्य करतील. नोकरीत आहे त्या परिस्थितीबरोबर जमवून घेण्यात सध्या फायदा आहे. तुमचे गुण वरिष्ठांना पटले तरी, तुम्हाला काही देणे त्यांच्या हाती असणार नाही. कामात मात्र दक्ष राहावे लागेल. चिडखोर स्वभावाला आळा घाला. शुभ दिनांक २३–२६.

**महिलांना** : घरगुती व कौटुंबिक अशा भांडणात रस घेऊ नका. मनाविरुद्ध घडले तरी ही वेळ जाऊ द्या. यावेळी माघार फायद्याची ठरेल.

**विद्यार्थ्यांना** : स्मरणशक्तीवर विश्वास ठेवताना खोल विचार करा. अभ्यासक्रम बदलताना योग्य मार्गदर्शन घ्या.

## कन्या : अडचणीला उतार

खरे म्हणजे शनि–मंगळाची युती तुमच्या लाभस्थानी आली आहे ती तशी तुम्हाला वाईट नाही. पण तुम्ही सतत गोंधळून गेलेले असावं व संधी पुढयात चालून आली तरी, तिचा लाभ घ्यायचा विसरून जाता त्याला दैव तरी काय करणार! तुम्ही लॉटरीत अवश्य भाग घ्यावा. एवढे चांगले ग्रह आहेत की, एखादेवेळी तुमचे दारिद्र्य निघूनदेखील जाईल. तरीपण गरजेच्या वस्तू व त्यासाठी लागणारा पैसा कमी पडणार नाही. नोकरीत कामाचा ताण कितीही वाढला तरी तुमची कार्यक्षमता कमी होणार नाही. कामाचा उरक चांगला राहील. कौटुंबिक सुख व आरोग्यदेखील सुधारेल. अनेक प्रकारच्या अडचणी कमी होतील. प्रवास टाळा. पत्रव्यवहार करताना भाषा चांगली ठेवा. शुभ दिनांक २२–२६.

**महिलांना** : आरोग्याच्या अनेक अडचणींवर या वेळी तुम्ही मात केलेली असेल. सुख व समाधान मिळेल.

**विद्यार्थ्यांना** : आर्थिक बाजू सुधारून शिक्षणात पुढे पाऊल पडेल. अडचणी कमी होतील.

## तूळ : मोठेपणा मिळेल

आठवा रवि-शुक्र प्रतिकूल नाही तसाच तो तेवढासा अनुकूल नाही. स्थावराच्या व्यवहारात मात्र लाभ होईल. शेती करणारांना जमीन मिळेल. अनेक दिवस वादात पडलेले स्थावराचे वा घराचे व्यवहार या आठवडयात पुरे होतील. स्त्रियांकडून पैसे मिळण्याचा योग आहे. सौंदर्यप्रसाधने, तयार कपडे, साडयांचा व्यापार करणाऱ्यांना नफा मिळेल. व्यापार तेजीत चालेल. कलाप्रदर्शन, नाटयप्रयोग व सिनेमाचे प्रदर्शन या आठवडयात खूप फायदा मिळवून देईल. नोकरीधंद्याच्या परिस्थितीत भरीव सुधारणा होईल. कामाचा ताण वाढेल पण अधिकारदेखील वाढतील. बेकारांना शुभदायक काळ आहे. शुभ दिनांक २२–२५–२६.

**महिलांना** : आठवडा प्रगतीचा आहे. हाती घेतलेले कोणतेही काम उत्साहाने पार पडेल. पैसे मिळतील. स्वतःच्या श्रमावर पैसे मिळवू शकाल.

**विद्यार्थ्यांना** : लेखन, वाङमय, कलाप्रदर्शन, नाटयक्षेत्र यांत समरसतेने भाग घ्या. हेतू पूर्ण होतील.

## वृश्चिक : आर्थिक स्वास्थ्य

आठवडा प्रगतीकारक अनुभव देईल असेच ग्रहमान आहे. सातवा रवि–शुक्र संसारात काही मनाजोगे घडवील. नवविवाहितांना प्रणयरम्य जीवनाचे गोड दर्शन घडू शकेल. कवि–लेखक यांची प्रतिभा जागी होईल. संसारी जीवन तसे सुखाचे जाईल. आर्थिक स्वास्थ्य मिळण्याचे योजनाबद्ध कार्य सफल होईल. लॉटरी, रेस यांपासून अनपेक्षित अर्थप्राप्ती होऊ शकेल. धंद्यात अडचणी नाहीत. असलेल्या अडचणी कमी कमी होऊन पुढे पाऊल पडेल. नोकरीत मालक अगर वरिष्ठ यांच्याबरोबरचे संबंध सुधारून कर्तबगारीला वाव मिळेल. प्रतिष्ठा व मोठेपणा चालत येईल. अनेक दिवसांची प्रवासाची इच्छा पुरी होईल. नव्या उद्योगाची बोलणी करण्यासाठी हा आठवडा अनुकूल आहे. शुभ दिनांक २३–२५–२६.

**महिलांना** : एखाद्या संशयपिशाच्चाच्या आहारी न जाता घरात येत असलेले सुख व समाधान समरसतेने उपभोगा. स्वतःचा धंदा सुरू करा.

**विद्यार्थ्यांना** : विद्याक्षेत्रात असलेल्या अडचणी दूर होऊन तुम्ही एखादी परीक्षा क्रेडिट मिळवून पास व्हाल.

## धनू : पुढे पाऊल पडेल

आठव्या शनि–मंगळाने तुम्ही अगदी घाबरून गेला होता. परंतु हा कल्पित त्रासदेखील आता नाहीसा झाला आहे. हा आठवडा सुधारणा घडवून आणणार आहे. तव्येत प्रसन्न राहून आशादायक स्वप्नांचे मनोरे रचण्यात तुम्ही रमून जाल. संसारातील अनेक अडचणींवर मात करून पुढे जाल. प्रवासाचा बेत आखून एखादे क्षेत्र पाहू शकाल. धार्मिक बाजू निर्मळ राहील. हरिदास, कीर्तनकार, प्रवचनकार, वैद्य इत्यादी क्षेत्रांतील व्यक्ती लोकप्रियता मिळवतील. लोकांच्या कुतूहलाचा विषय बनतील. नोकरीत सुधारणेचे नवे युग निर्माण होईल. तुमच्या प्रामाणिक कर्तबगारीच्या प्रत्ययाने वरिष्ठ प्रभावित होतील. आर्थिक परिस्थितीत थोडीफार सुधारणा होईल. शुभ दिनांक २५–२६–२७.

**महिलांना** : वृद्ध स्त्रियांना तीर्थयात्रा घडू शकेल. नवविवाहित स्त्रियांची व्रतवैकल्ये पार पडतील.

**विद्यार्थ्यांना :** फार छान आहे हा सप्ताह. गोड बातमी कळू शकेल. लेखनात लक्ष लागेल.

### मकर : नवचैतन्य लाभेल

शनि-मंगळाच्या धोक्यातून तुम्ही आता बाहेर पडला असून प्रामुख्याने शारीरिक व मानसिक परिस्थिती यावेळी बरीच उत्साही राहणार आहे. अनेक दिवसांचा आजार कमी होऊन किंवा नाहीसा होऊन घरात एक नवे पर्व सुरू होईल. मुलांचे कौतुक मन आनंदी ठेवील. आर्थिक बाजू सुरळीत राहील. बचत झाली नाही तरी गरजेपुरता पैसा सहज मिळेल. नोकरीची परिस्थिती समाधानकारक राहील. सहकारी व हाताखालचे नोकर यांच्याकडून निष्ठेने सहकार्य मिळेल. मात्र तुम्ही स्वतः निष्ठेने वागणे आवश्यक आहे. तुमच्यापैकी कुणी संशोधक, लेखक वा पत्रकार असतील तर, सर्वच बाबतीत अनुकूलता लाभणार आहे. कौटुंबिक संबंध तडजोडीने मिटू शकतील. या वेळी तुम्हाला वाहन-खरेदीचा योग आहे. प्रयत्न करा. शुभ दिनांक २६–२८.

**महिलांना :** गेले काही दिवस तब्येतीच्या ज्या अनेक तक्रारी चालू होत्या त्याला आता उतार पडेल. नोकरी मिळेल. स्वतःचा धंदाही सुरू करू शकतील.

**विद्यार्थ्यांना :** ठरवलेले बेत तडीस जातील. अभ्यास व स्वास्थ्य मनासारखे घडेल.

### कुंभ : उद्योगात प्रगती

हा आठवडा गेल्या आठवड्यापेक्षा जास्त अनुकूल आहे. कोर्टकचेरीत एखादा तंटा वा वाद जर चालू असेल तर तो तडजोडीने मिटू शकेल. या वेळी अनेक बाबतीत तुम्हाला मध्यस्थाची भूमिका घ्यावी लागेल व ती तुम्ही यशस्वीपणे पार पाडाल. तेलबियांचे वायदे, शेअर्स इत्यादींचे ज्यांचे उद्योग आहेत त्यांना प्रामाणिकपणे चार पैसे नफा मिळू शकेल. स्वतःचा एखादा व्यापार वा धंदा सुरू करायला हरकत नाही. आर्थिक मदत मिळेल. बँकेकडून कर्जरूपाने पैसे मिळतील. नोकरीच्या क्षेत्रात फारशी उलाढाल नाही. कामात मात्र दक्ष राहावे. या दक्षतेची वरिष्ठांकडून प्रामाणिकपणे दखल घेतली जाईल. तुमच्यापैकी कुणी सेवानिवृत्त होण्याच्या मार्गावर असतील तर त्यांच्या बाबतीत फेरविचार होऊ शकेल. तब्येत उत्साही राहील. शुभ दिनांक २३–२४–२५.

**महिलांना :** कर्तबगारीचे चीज होईल. नोकरी असो वा धंदा असो, श्रमाचे चीज होईल. प्रवास टाळा.

**विद्यार्थ्यांना :** उत्तम मनःस्वास्थ्य हा या वेळेच्या आठवड्याचा विशेष आहे. नोकरीचा अनुभव मिळू शकेल.

### मीन : लॉटरीत धनलाभ

शनि–मंगळाच्या युतीचे अनुकूल परिणामही होऊ शकतात, असे अनेकांना अनुभवाने पटत आहे. या आठवड्यात तुम्हाला त्याचा प्रत्यय येईल असे ग्रहमान आहे. तिसरा शुक्र–रवी, दुसरा गुरू व पाचवे शनि–मंगळ आर्थिक बाजू भक्कम करणार आहेत. रेसमध्ये रेसशौकिनांना भरपूर लाभ होईल. चांगले बक्षीस मिळू शकेल. तसेच लॉटरीतही धनलाभ होईल असे उच्चीचे ग्रह आहेत. तुमचा कोणत्याही प्रकारचा व्यापार असू द्या, त्यातील अडचणींचा निरास होईल. प्रकाशनात नफा मिळू शकेल. नोकरीत अनेक प्रकारच्या अडचणींवर धैर्याने मात करू शकाल. नियमाप्रमाणे ज्यांना प्रमोशन मिळावयाचे असेल त्यांना ते विनासायास मिळेल. वरिष्ठांबरोबर बोलणी करून त्यांचे मन जिंकू शकाल. शुभ दिनांक २४–२६.

**महिलांना :** प्रतिभा जागृत होईल. लेखनाचे नवे प्रयोग प्रत्यक्षात आणू शकाल. कलावंत महिलांना लोकप्रियता लाभेल.

**विद्यार्थ्यांना :** वासंतिक मार्गदर्शन आगामी काळात उपयोगी पडेल म्हणून त्याचा लाभ घ्या. चळवळी टाळा. □

---

## ग्रामीण समाजातील परिवर्तन : पृष्ठ ७ वरून

भारतीय खेड्यांचे बाह्यस्वरूप पालटत चालले आहे. पण या सर्व बदलांचे उत्स्फूर्तपणे, अंतःप्रेरणेने भारतीय ग्रामवासीय स्वागत करतो का ? हाच खरा आजचा प्रश्न आहे. अद्ययावत वैज्ञानिक साधनांनी भारतीय ग्रामविकास घडवून आणण्याच्या प्रयत्नात ग्रामवासीय मनाने एकरूप झाले आहेत का ? या प्रश्नांना उत्तर हे नकारार्थीच द्यावे लागते. म्हणूनच ग्रामीण समाजपरिवर्तनातील अडचणींचा विचार करणे जरूर आहे.

### (३) ग्रामीण समाजपरिवर्तनातील अडचणी :

**(१) ग्रामवासीयांची मनोवृत्तीच परिवर्तनविरोधी आहे :** भारतीयांचे मन हे सनातनी व परंपरावादी आहे. परंपरेने चालत आलेले आचार–विचार, रूढी, परंपरा यांमधील बदल भारतीयांना रुचत नाहीत. त्यातल्या त्यात ग्रामवासीय हे विशिष्ट परिस्थितीमुळे अधिक धार्मिक व रूढिप्रिय आहेत. त्यामुळे जे रूढी व परंपराविरोधी आहे त्याचे स्वागत ग्रामवासीय मनापासून करत नाहीत. ग्रामवासीय हे पारलौकिक सुखालाच जास्त महत्त्व देत असल्याने भौतिक परिवर्तनात ते विशेष रस घेत नाहीत. त्यामुळे ग्रामीण समाजपरिवर्तनाला अपेक्षित वेग येत नाही. संततिनियमन-प्रचारासाठी भारत सरकारला एवढा खर्च करावा लागतो याचे कारणच हे आहे. अष्टपुत्री भव ! याच मंत्राने भारतीयांना ग्रासून टाकले आहे. निसर्गाविरुद्ध वागणे हे देवाघरचे पाप आहे हीच अंधश्रद्धा यामागे आहे. परंपरेने चालत आलेल्या आचारातसुद्धा भारतीयांना विशेषतः ग्रामवासीयांना बदल करणे इष्ट वाटत नाही. अस्पृश्यतानिवारण-आंदोलन, मंदिरप्रवेश-आंदोलन यशस्वी होत नाही याचे कारण परंपरेने चालत आलेला आचारच होय. ग्रामवासीयांची रूढिप्रियता तर विलक्षण आहे. नवीन विहिरीला पाणी लागावे, म्हणून मानवी अर्भकाचा बळी दिल्याची घटना नुकतीच आंध्रमध्ये घडली. सारांश बाह्यात्कारी बदल घडविण्याचा कितीही जरी प्रयत्न केला तरीसुद्धा जोपर्यंत ग्रामवासीयांची ही मनःप्रवृत्ती बदलत नाही तोपर्यंत या परिवर्तनप्रक्रियेला वेग येऊ शकणार नाही.

**(२) बुद्धिवादाचा अस्वीकार :** भारतीय आपल्या नित्य जीवनात बुद्धिवादाचा स्वीकार करीत नाहीत. त्यामुळे परिवर्तन प्रक्रियेची चिकित्साच ते करू शकत नाहीत. ग्रामवासीयांच्यावर धर्माचा पगडा असल्याने सर्व चराचरावर स्वामित्व गाजविणाऱ्या शक्तीमुळेच सारा विश्वव्यवहार चालतो अशी त्यांची गाढ श्रद्धा आहे. त्यामुळेच ठेविले अनंते तैसेचि राहावे ! याच एका विचाराने साऱ्या ग्रामवासीयांना

झपाटून टाकले आहे. सारी भिस्त या परमेश्वरावर टाकून ग्रामवासीयांचे संपूर्ण जीवनच निष्क्रिय झाले आहे. गेली कित्येक शतके या विचारप्रवाहामुळे ग्रामीण जीवन हे सुस्त अजगराप्रमाणे होते. आजसुद्धा ग्रामवासीय पुनर्रचनेच्या कार्यक्रमाकडे अत्यंत तटस्थतेने पाहत असतात. प्रवाहपतित व परंपराप्रिय ग्रामवासीयांच्यापर्यंत शिक्षणाचे लोण नेऊन त्यांना विज्ञानवादी बनविल्याविना या बदलाचे स्वागत ते करू शकणार नाहीत.

(३) **नवीन शोधांना विरोध :** नवीन शोधांचा स्वीकार माणूस सहजासहजी करीत नाही. नवीन शोध अगर नवीन साधन अत्यंत फायदेशीर जरी असले तरीसुद्धा त्या नवीन साधनांचा अंगीकार प्रयत्नाअभावी होत नाही. भारतीय ग्रामवासीय हे तर अज्ञानी, अडाणी, निरक्षर व परंपराप्रिय आहेत. त्यामुळे जे जे नवीन म्हणून आले त्याला कडाडून विरोध ग्रामवासीयांनी केला आहे. शिक्षणाचा फैलाव इतका झाला असतानासुद्धा स्त्रीशिक्षणाला विरोध आजसुद्धा ग्रामवासीय करतात. ' शिकलेली बायको ' म्हणण्यात एक प्रकारची कुचेष्टा व मस्करी असते. विधवा-विवाह, आंतरजातीय विवाह, अस्पृश्यतानिवारण यांसारख्या सुधारणांना कडाडून विरोध करण्यात ग्रामवासीय अग्रभागीच होते. इतकेच काय पण शेतीच्या उत्पादनातील तंत्रात झालेल्या बदलाचा स्वीकार ते मनापासून करीत नाहीत. शेतीतंत्राबद्दल बोलताना ग्रामवासीयांचा युक्तीवाद असा असतो की, ज्या लाकडी नांगरीने माझ्या पणजोबांनी शेती करून आपला संसार यशस्वी केला, तीच लाकडी नांगरी आज मला अन्न देते आहे. साहजिकच नवीन विचार, नवीन शोध, नवीन तंत्र यांचे स्वागत खुलेपणाने होत नाही.

(४) **ग्रामीण दारिद्र्य :** सामाजिक परिवर्तनातील मोठा अडथळा म्हणजे ग्रामीण दारिद्र्य आहे. अमेरिकेसारख्या संपन्न देशातही ग्रामवासीयांचे जीवनमान निकृष्ट दर्जाचे होते तेव्हा परिवर्तनाचा वेग मंद होता. भारतातील ग्रामीण जीवनमान तर अत्यंत दयनीय आहे. बहुसंख्य शेतकऱ्यांकडे असणारी जमीन अगदीच तोकडी व अपुरी आहे. ४७ टक्के शेतकऱ्यांकडे एक एकराहून कमी जमीन आहे. शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाला अंत नाही म्हटले तरी चालेल. अशा परिस्थितीत नवीन तंत्र, नवीन शोध, नवीन साधनांचा वापर शेतकरी पैशाअभावी करू शकत नाहीत. कुक्कुटपालनासारख्या जोडव्यवसायाचे महत्त्व त्यांना पटते पण नवीन प्रकारांच्या कोंबड्या विकत घेणे त्यांना पेलत नाही, ही वस्तुस्थिती आहे. आठ वर्षांच्या मुलाला शाळेतून काढून गुरे राखण्यास ठेवल्याची अनेक उदाहरणे ग्रामीण क्षेत्रात आढळतील. म्हणून आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात कमी झाल्याविना परिवर्तन कार्यक्रमाला अनुकूल वातावरण निर्माण होणार नाही.

(५) **सामाजिक संस्थांचे प्राबल्य :** ग्रामीण समाज अजूनही परंपरागत कुटुंबसंस्था, जाती व ग्रामसंस्था यांच्या पगड्यातून मुक्त झालेला नाही. आधुनिक विज्ञानाची सर्व क्षेत्रांत घोडदौड चालली असताना या सामाजिक संस्थांची साथ या प्रगतीला न मिळाल्याने ग्रामीण समाजाचे परिवर्तन खंडित होत आहे. युरोप व अमेरिकेमध्ये आधुनिक विज्ञानविकासाप्रमाणे सामाजिक संस्थांच्या रचनेत व कार्यात बदल घडून आला. म्हणून युरोप व अमेरिकेत परिवर्तन द्रुतगतीने घडून आले. पण भारतामध्ये विशेषतः ग्रामीण भागात या संस्थांचे वर्चस्व चिवटपणे टिकून आहे. त्यांच्या कार्यात व रचनेत जसा बदल अपेक्षित आहे, तसा घडून येत नाही. जातीप्रमाणे व्यवसाय, संयुक्त कुटुंबातील व्यक्तीची गळचेपी, ग्रामसंस्थेला योग्य वाटेल; तेच आचरण ग्रामवासीयांच्यात आजही दिसून येते. यासाठीच या ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यक्रमात सामाजिक संस्थांच्या परिवर्तनाला महत्त्व देणे अपरिहार्य आहे.

(६) **आत्मकेंद्रित मन :** सामाजिक परिवर्तनाला खरा अडथळा भारतीय मनाचाच आहे. भारतीय मन हे अत्यंत आत्मकेंद्रित असल्याने खऱ्या अर्थाने ते सामाजिक आहे असे म्हणणे चुकीचे ठरते. साऱ्या क्रियांचा व विचारांचा केंद्रबिंदू व्यक्ती होती; समाज नव्हता. सारे विचार हे स्वतःपुरतेच मर्यादित होते. मोक्षाची काळजी स्वतःपुरती. पापपुण्याचा विचार स्वतःपुरताच. त्यामुळे भारतीय समाज हा, समाज म्हणून कधी जगलाच नाही. आज भौतिक विकास जरी झाला असला तरीसुद्धा ही आत्मकेंद्रित वृत्ती नाहीशी झाली असे म्हणता येत नाही. त्यामुळे ' इतरांचा विचार ' याचाच अभाव असल्याने सामाजिक परिवर्तनात फार मोठा अडसर निर्माण होतो. भारतीय ग्रामीण समाजपरिवर्तन संथ असण्याचे हेही एक कारण आहे. सामाजिक दृष्टीचा अभाव असल्याने समाजविकासाला अनुकूल वातावरणच निर्माण होऊ शकले नाही. P. Spartt यांनी Hindu Culture and personality या ग्रंथात भारतीय व्यक्तित्व आत्मपूजक आहे असे वर्णन केले आहे ते सर्वार्थाने खरे आहे.

(७) **शासकीय उणीवा :** ग्रामीण सामाजिक परिवर्तनाला वेग येऊ शकला नाही याचे कारण शासकीय उणिवातसुद्धा दिसून येते. सामाजिक परिवर्तन व्हावे म्हणून पंचवार्षिक योजना आखल्या. कायद्यामागून कायदे केले. सभा, भाषणे, सिनेमा यांद्वारे त्यांचा प्रचारही केला. पण प्रत्यक्ष अंमलबजावणीकडे मात्र शासनाने द्यावे तितके लक्ष दिले नाही. समाजविकास योजनांचे, अपयश, पंचायती राज्याला आलेले विकृत स्वरूप याचे प्रमुख कारण हेच आहे. ' नियोजन हे मजबूत व निर्दोष ' जरूर असले पाहिजे. पण हे नियोजन योग्यरीत्या कार्यान्वित झाले नाही, तर उदात्त तत्त्वांना ' कागदी वाघां 'चे स्वरूप येते. ग्रामीण समाजाचे परिवर्तन अपेक्षित वेग घेऊ शकले नाही, याचे कारण हे आहे.

(८) **निरपेक्ष लोकसेवकांचा अभाव :** निरपेक्ष लोकसेवकांचा अभाव हेही ग्रामीण समाजाच्या संथ परिवर्तनाचे कारण आहे. लोकसेवेचे असिधाराव्रत घेऊन समाजाला ग्रासणाऱ्या प्रश्नाविषयी चिंतन करणाऱ्या लोकसेवकांची जरूरी सामाजिक संक्रमणाच्या काळात असते. त्यांच्या साहाय्याविना अपेक्षित सामाजिक बदल जलद गतीने होणे अशक्य असते. निःस्वार्थी लोकसेवकांची उणीव आज देशाला तीव्रतेने जाणवते आहे. सामान्य मनुष्याला स्वयंप्रेरित करणे, त्याला स्वतंत्रपणे विचार करायला लावून होत असणाऱ्या बदलाचा अर्थ समजावून सांगणे, त्याच्यात जागृती घडवून आणणे हे काम अगदी जरुरीचे आहे. अशा तऱ्हेचे लोकजागृतीचे काम करणारे निरपेक्ष व निःस्वार्थी लोकसेवक पुढे येत नाहीत तोपर्यंत ग्रामीण समाजपरिपरिवर्तनाला वेग येणे अशक्य आहे.

सारांश, स्वातंत्र्योत्तर काळात नव्या जीवनाच्या आकांक्षा वाढल्या. रूढिग्रस्त व मागासलेल्या भारतीय समाजाला समृद्धीकडे नेण्याचा प्रयत्न सुरू झाला. आर्थिक जीवनात स्थैर्य व सुस्थिती निर्माण करण्यासाठी पंचवार्षिक योजनांचा कार्यक्रम आखला. पण या कार्यक्रमामुळे समाजाचे बाह्य रूप बदलू लागले आहे. पण सामाजिक परिस्थितीचा वेग कमालीचा संथ आहे. म्हणूनच समाजाचे वैचारिक परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न व्हावयास हवा. परिवर्तन कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी व नवीन समाजरचना रूढ करण्यासाठी लोकांचे मनःपूर्वक साहाय्य अवश्य आहे. म्हणूनच या नवसमाजनिर्मितीच्या कार्याला योग्य वळण व नवे तेज प्राप्त होण्यासाठी सामान्य माणसात विचारपरिवर्तन घडून आले पाहिजे. ☐

[ ग्रामीण समाजशास्त्र : लेखक गुरुनाथ नाडगोंडे : प्रकाशक कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे : पृष्ठे २६१ ते २७६ साभार पुनर्मुद्रित. ]